# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai



## 26 वा वार्षिक अहवाल
## 2010-2011

## 26 th ANNUAL REPORT
## 2010-2011



मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करताना, मा. श्रीमती प्रतिभा पाटील, राष्ट्रपति, भारत सरकार सोबत मा. श्री. के. शंकरनारायणन्, राज्यपाल. मा. श्री. शरद पवार, केंद्रिय कृषिमंत्री व अध्यक्ष यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, मा. श्री. पृथ्वीराज चव्हाण, मुख्यमंत्री, मा. श्री. गुरुदास कामत, केंद्रीय दळणवळणमंत्री आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री व मा. श्री. देवीसिंहजी शेखावत.



मा. यशवंतराव चव्हाण व मा. भाऊसाहेब हिरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विशेष टपाल तिकिटाचे उद्घाटन करताना मा. श्रीमती प्रतिभा पाटील, राष्ट्रपति, भारत सरकार सोबत राज्यपाल, मा. श्री. के. शंकरनारायणन्, केंद्रिय कृषिमंत्री मा. श्री. शरद पवार, मुख्यमंत्री, मा. श्री. पृथ्वीराज चव्हाण, केंद्रीय दळणवळण राज्यमंत्री, मा. श्री. गुरुदास कामत, माजी मंत्री मा. श्रीमती पुष्पाताई हिरे.

# २६ वा

# वार्षिक अहवाल

# २०१० - २०११

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

जन. जगन्नाथराव भोसले मार्ग,
मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी क्र. २२०२८५९८, २२८५२०८१, २२०४५४६०, २२८५२३४५.
फॅक्स : २२८५२०८१, २२८५२०८२

**Email : ybchavan@bom.vsnl.net.in**

**Visit us : ybchavanpratishthan.org**

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## वार्षिक अहवाल २०१०-२०११

### अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे विश्वस्त मंडळ, कार्यकारिणी मंडळ, कार्यकारी समिती, प्रतिष्ठानचे विभाग प्रमुख, प्रतिष्ठानच्या विभागीय केद्राचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापन | ३-५ |
| २ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्रातील उपक्रम | ५-९ |
| ३ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या केंद्रात झालेले महत्त्वाचे कार्यक्रम | ९ |
| ४ | यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार व इतर उपक्रम | ९-१० |
| ५ | विशेष कार्यक्रम - | १०-१२ |
| ६ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | १२-१४ |
| ७ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम / उपक्रम | १४-१५ |
| ८ | प्रतिष्ठानमार्फत देण्यात आलेली व मिळालेली अनुदाने | १५ |
| ९ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम / उपक्रम | १५-४७ |
| १० | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची विभागीय केंद्रे | ४७-८४ |
| ११ | प्रतिष्ठानच्या वैधानिक लेखा परीक्षकाचे प्रमाणपत्र | ८५ |
| १२ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची हिशोबपत्रके व संबंधित परिशिष्टे | ८६-९६ |
| १३ | प्रतिष्ठानची प्रकाशने व व्हि.डी.ओ. कॅसेटस् | मागील कवर |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि.नं.एफ.१०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि.नं.एम.एम.एच/बी.ओएम-५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१

**विश्वस्त मंडळ सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. डॉ. रविंद्र बापट | उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. अरुण गुजराथी | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. मोहन धारिया | |
| ७. | मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ८. | मा. श्री. हुसेन दलवाई | |
| ९. | मा. प्रा. पी. बी. पाटील | |
| १०. | मा. श्री. राम प्रधान | |
| ११. | मा. श्री. लक्ष्मण माने | |
| १२. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| १३. | मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे | |
| १४. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| १५. | मा. श्री. अजित निंबाळकर | |

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६. मा. श्री. नितीन करीर,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.

१७. मा. श्री. वि. ल. आचालिया
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग

**कार्यकारिणी मंडळ सदस्य**

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. डॉ. रविंद्र बापट
३. मा. श्री. अरुण गुजराथी
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धो. महानोर
९. मा. श्री. बापूसाहेब काळदाते
१०. मा. श्री. रा. सु. गवई
११. मा. श्री. एन.के.पी. साळवे
१२. मा. श्री. के. बी. आवाडे
१३. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१४. मा. श्री. श्रीनिवास पाटील
१५. मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे
१६. मा. श्री. सा. रे. ऊर्फ आप्पासाहेब पाटील
१७. मा. श्री. अंकुशराव टोपे
१८. मा. श्री. शामराव पा. पाटील
१९. मा. श्री.यशवंतराव गडाख - पाटील
२०. मा. श्री. चंद्रकांत घुले - पाटील
२१. मा. श्री.माणिकराव पाटील, अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिध्द)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२२. मा. श्री. नितीन करीर,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.

**कार्यकारी समिती**

१ मा. श्री. शरदराव पवार
२ मा. डॉ. रविंद्र बापट
३ मा. श्री. अरुण गुजराथी
४ मा. श्री. श. गं. काळे
५ मा. श्री. हेमंत टकले
६ मा. श्री. श्रीनिवास पाटील
७ मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे
८ मा. श्री. अजित निंबाळकर

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

**प्रतिष्ठानचे विभाग**

| | | |
|---|---|---|
| १. मुख्य कार्यालय | प्रशासकीय व वित्त अधिकारी | श्री. एन. ए. भोसले |
| २. यशवंतराव चव्हाण ग्रंथालय | ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी | श्री. अनिल पाझारे |
| ३. कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |
| ४. महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजिका | श्रीमती ममता कानडे |
| ५. नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| ६. कृषी व सहकार व्यासपीठ | निमंत्रक | श्री. बी. डी. पवार |
| ७. सांस्कृतिक विभाग | निमंत्रक | श्री. विनय नेवाळकर |
| | | श्री. सुनिल वालावलकर |
| ८. यशवंतराव चव्हाण सभागृहे | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| ९. रंगस्वर - सृजन | सृजन प्रमुख | सौ. सुप्रिया सुळे |
| १०. वार्तापत्र | मानद संपादक | श्री. दत्ता बाळसराफ |
| ११. यशवंतराव चव्हाण माहिती व संचालक | ब्रिगेडीअर | श्री.सुशील गुप्तन |
| | मुख्य विपनन अधिकारी | श्री. विक्रम वासुदेव |
| १२. शिक्षण विकास मंच | प्रमुख संयोजक | श्रीमती कुमुद बन्सल |
| | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| १३. अपंग हक्क अभियान | समन्वयक | श्री. विजय कान्हेकर |
| १४. वसुंधरा कक्ष (पर्यावरण संवर्धन अभियान) | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| १५. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | विधी सल्लागार | श्री. एम. बी. पवार |

**प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्रांचे मा. अध्यक्ष :**

| | | |
|---|---|---|
| १) विभागीय केंद्र कराड | अध्यक्ष | श्री. जयंत पाटील |
| २) विभागीय केंद्र पुणे | अध्यक्ष | श्री. राम ताकवले |
| ३) विभागीय केंद्र नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| ४) विभागीय केंद्र नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| ५) विभागीय केंद्र औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. नंदकिशोर कागलीवाल |
| ६) विभागीय केंद्र लातूर | अध्यक्ष | श्री. जनार्दन वाघमारे |
| ७) विभागीय केंद्र कोंकण | अध्यक्ष | श्री. राजाभाऊ लिमये |
| ८) विभागीय केंद्र अमरावती | अध्यक्ष | श्री. रा. सु. गवई |

**इतर**

| | | |
|---|---|---|
| १) | मानद वास्तुविशारद | मे. शशी प्रभु अँड असोशिएटस् |
| २) | संविधिक लेखा परीक्षक | मे. सी.व्ही.के. अँड असोशिएटस् |
| ३) | अंतर्गत हिशेब तपासनीस | मे. वैशंपायन आणि पाध्ये<br>चार्टर्ड अकाऊंटंट |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचा सन २०१०-२०११ चा वार्षिक अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

## १. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे व्यवस्थापन :

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा व कार्याचा प्रसार करण्यासाठी प्रतिष्ठानतर्फे विविध प्रकारचे उपक्रम प्रतिवर्षी राबविण्यात येतात. उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी नेमलेल्या कार्यकारी समितीच्या १२ बैठका घेण्यात आल्या व विविध विषयांवर सांगोपाग चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या आर्थिक वर्षात विश्वस्त मंडळाच्या व कार्यकारिणी मंडळाच्या प्रत्येकी पुढीलप्रमाणे ३ बैठका झाल्या. दिनांक २० सप्टेंबर २०१०, दिनांक २५ नोव्हेंबर २०१० व दिनांक १२ मार्च २०११. तसेच कार्यकारी समितीच्या दिनांक ३ एप्रिल, २०१०, ५ मे, २०१०, ५ जून, २०१०, ३ जुलै, २०१०, ७ ऑगस्ट, २०१०, ४ सप्टेंबर, २०१०, १ ऑक्टोबर, २०१०, २ नोव्हेंबर, २०१०, ७ डिसेंबर, २०१०, ३ जानेवारी, २०११, ५ फेब्रुवारी, २०११ व ५ मार्च, २०११ अशा एकूण १२ बैठका झाल्या.

प्रतिष्ठानच्या हिशेबाची तपासणी प्रत्येक महिन्याला अंतर्गत हिशेब तपासनीस मेसर्स वैशंपायन आणि पाध्ये, चार्टर्ड अकाउंटंट यांचेमार्फत करण्यात आली व त्यांचे अहवाल कार्यकारी समितीपुढे ठेवण्यात आले. वार्षिक हिशेबाची तपासणी सांविधिक हिशेब तपासनीस मेसर्स सी.व्ही.के. असोसिएटस्, चार्टर्ड अकाउंटंट यांच्याकडून झाली असून त्याचा अहवालही विश्वस्त मंडळ व कार्यकारिणी मंडळासमोर ठेवण्यात आला. वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास आधीन राहून प्रत्येक विभागीय केंद्रासाठी व मुख्य कार्यालयातील विविध विभागांना खर्चाचे अंदाजपत्रक दिले असून त्यांच्याकडून खर्चाचे तिमाही अहवाल मागवून तपासण्यात आले व कार्यकारी समितीपुढे सादर करण्यात येऊन त्रुटींची पूर्तता करुन घेण्यात आली. प्रतिष्ठानची वेबसाईट ybchavanpratishthan.org असून ती वेळोवेळी अद्ययावत करण्यात येत आहे.

**सभासद संख्या** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची निरनिराळया प्रकारच्या सभासदांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | संस्थापक सदस्य | ४५ |
| २. | आजीव सदस्य | २४३ |
| ३. | संस्था सदस्य | २८ |

महाराष्ट्र शासनाने मा. श्री. नितीन करीर, मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव व मा. श्री. वि. ल. आचालिया, प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग हे दोन प्रतिनिधी विश्वस्त मंडळावर नेमलेले आहेत. त्यापैकी मा. श्री. नितीन करीर, मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव यांची कार्यकारिणी मंडळावरही नियुक्ती केलेली आहे.

## २. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्रातील उपक्रम :

२.१ **अ) मुख्य सभागृह :** यशवंतराव चव्हाण केंद्रातील सभागृहाचा वापर, प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांसाठी तसेच निरनिराळया सामाजिक संस्था, शासनातर्फे आयोजित केलेल्या सभा, संमेलने, चर्चा, परिषदा, चित्रपट, सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी करण्यात आला. सभागृहामध्ये मराठी, हिंदी, गुजराती व इंग्रजी नाटके, संगीतसभा आदि कार्यक्रमही झाले.

**.अनामत रक्कम :-** सर्वसाधारणपणे अनामत रक्कम घेण्यात येणार नाही. परंतु एखाद्या दुर्मिळ व किंमती पुस्तकांसाठी प्रतिष्ठान निश्चित करेल तेवढी रक्कम घेण्यात येईल. एकाचवेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देता येतील.

इ-२) **संस्था सभासदत्व** (Institutional Membership) यासाठी शिक्षण व संशोधन संस्था व सांस्कृतिक संस्था पात्र राहतील. परंतु शिक्षण व संशोधन संस्था ही युजीसी, आय.सी.एस.एस.आर., आय.सी.सी.आर. किंवा आय.सी.एच.आर. यांच्याकडून मान्यता प्राप्त झालेली असावी, तर सांस्कृतिक संस्था ही महाराष्ट्र शासन, केंद्र शासन किंवा मान्यता प्राप्त अधिघोषित विद्यापीठ यांनी मान्यता दिलेली असावी.

**संस्था सभादत्वासाठी :-** प्रवेश फी रु. १,०००/- ना परतावा

**वार्षिक वर्गणी :-** रु. ५,०००/-

**दीर्घ कालावधीसाठी संस्था सभासद :-** एकावेळी ५ वर्षांसाठी वर्गणी रु. २०,०००/- एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देण्यात येतील.

इ-१ व इ-२ येथील सभासदत्व हे संबंधित संस्थेच्या प्रमुखास देण्यात येईल. त्यांना ग्रंथालयाचे ओळखपत्र देण्यात येईल. संस्थेच्या प्रमुखास आवश्यक वाटल्यास ते त्यांच्या एक किंवा दोन कर्मचा-यांना त्यांच्यावतीने पुस्तके घेण्यास / परत करण्यास नामनिर्देशित करु शकतील. नामनिर्देशन अधिकृत पत्राने करावे लागेल. मात्र पुस्तके अबाधितपणे वेळेवर परत करणे व ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करणे याची जबाबदारी संस्था प्रमुखांची असेल. वरील सभासदत्व देण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा पूर्ण अधिकार प्रतिष्ठानला राहील.

२.३ **सर्वसाधारण सभासद :-** सभासदांना एकावेळी एक पुस्तक / ग्रंथ देण्यात येईल ते आठ दिवसात परत करणे आवश्यक आहे. तसेच संदर्भग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करता येईल. संदर्भ ग्रंथ घरी नेता येणार नाही. पुस्तकाची किंमत भरलेल्या अनामत रक्कमेपेक्षा जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकांच्या किंमती एवढी अनामत रक्कम भरुन पुस्तक घरी नेता येईल.

२.४ महाविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी/संशोधक यांना ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी/संदर्भासाठी देण्यात येतात. घरी/ग्रंथालया बाहेर नेण्याकरिता देण्यात येणार नाही. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र यांच्या नियमाप्रमाणे ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाचे संगणकीकरण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे वृत्तपत्रात प्रसिध्द होणा-या महत्वाच्या घडामोडींची कात्रणे ठेवण्यात आली आहेत. सन २०१०-११ मध्ये ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाकडून रुपये ६४,०००/- इतके अनुदान मिळाले आहे. सन २०१०-११ वर्षाकरिता प्रतिष्ठानने एकूण रु. ३ लाख इतकी रक्कम मंजूर केली होती व प्रत्यक्ष खर्च रुपये २,५०,७७२/- इतका झाला आहे. या रकमेतून वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, ग्रंथ, संदर्भ ग्रंथ खरेदी करण्यात आले. त्यामध्ये ५७२ ग्रंथ/पुस्तके खरेदीचा समावेश आहे.

दिनांक ३१.३.२०११ रोजी ग्रंथालयाची सभासद संख्या पुढीलप्रमाणे आहे.

१. २०१०-११ मध्ये सभासद झालेले महाविद्यालयीन विद्यार्थी/संशोधक/सभासद यांची संख्या १२५ व या वर्षात सभासद वर्गणी/अनामत रक्कम म्हणून रुपये १५,६००/- इतकी रक्कम मिळाली आहे.
२. २०१०-११ सर्वसाधारण सभासद संख्या १२७ आहे व या वर्षात सभासद वर्गणी व अनामत रक्कम म्हणून रुपये ४७,६५०/- इतकी रक्कम मिळाली आहे.
३. यापूर्वीचे सभासद धरुन ग्रंथालयाचे एकूण ४४८ सभासद आहेत.

२.३ **अनुबोधपट :** मा. चव्हाणसाहेबांच्या जीवनावर अनुबोधपट तयार करण्याचे काम नामवंत दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांचेकडे सोपविण्यात आलेले असून त्यांनी ग्रंथसामग्री, पत्रव्यवहार, छायाचित्रे, वर्तमानपत्रीय लेखन व मा. यशवंतराव चव्हाण यांच्या सहवासातील समकालीन ज्येष्ठ मान्यवरांच्या मुलाखती घेण्याचे काम महाराष्ट्रातील पूर्ण केलेले आहे. सदर अनुबोधपटासाठी महाराष्ट्र शासनाकडून आर्थिक अनुदान रुपये ३ कोटी (अक्षरी रुपये तीन कोटी मात्र) मिळाले असून चित्रपट निर्मितीच्या कामाला आता वेग येईल असे अपेक्षित आहे. मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावरील चित्रपटाच्या प्रगतीचा आढावा घेणेसाठी नियुक्त केलेल्या समितीच्या वेळोवेळी बैठका घेण्यात येतात. त्यामध्ये चित्रपटाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात येतो. मा. चव्हाणसाहेबांच्या चित्रपटाची पटकथा श्री. अरुण साधू यांनी लिहून पूर्ण केलेली आहे. चित्रपटाच्या पटकथेची संक्षिप्त रुपरेषा तपासण्यासाठी सर्वश्री राम प्रधान, कल्लापाआण्णा आवाडे, विनायकराव पाटील या सदस्यांच्या समितीची नियुक्ती विश्वस्त मंडळाने केलेली आहे. या समितीची बैठक होऊन त्यांनी पटकथेच्या संक्षिप्त रुपरेषेला सहमती दर्शविली आहे. आता चित्रपटाच्या चित्रीकरणास सुरुवात करण्यात आली आहे.

२.४ **मा. यशवंतराव चव्हाण यांचे चित्ररुप चरित्र प्रकाशन :** आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांचे चित्ररुप चरित्र प्रकाशित करण्याचा निर्णय प्रतिष्ठानने घेतलेला आहे. महात्मा गांधी, पं. नेहरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजीव गांधी यांच्या जीवनावर अशा स्वरुपाचे ग्रंथ प्रसिध्द झालेले आहेत. मा. यशवंतराव चव्हाण यांचे चित्ररुप चरित्राचे प्रास्ताविक ज्येष्ठ पत्रकार व महाराष्ट्र टाईम्सचे माजी संपादक मा. श्री. गोविंदराव तळवलकर यांनी लिहीले आहे. या चरित्र ग्रंथामध्ये अंदाजे २५० पृष्ठे असतील. त्यामध्ये मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनांतील महत्वाच्या तीन ठळक कालावधीमधील म्हणजे सन १९१३ ते १९४६ जन्मापासून पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून नियुक्त होण्यापर्यंतचा काळ, १९४६ ते १९६२ महाराष्ट्रातील राजकीय कर्तृत्वाचा व द्वैभाषिक आणि महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदावरील काळ, सन १९६२ ते १९८४ संरक्षण मंत्री म्हणून दिल्लीला गेल्यापासून तो अखेरपर्यंतचा राष्ट्रीय स्तरावरील राजकीय कर्तृत्वाचा काळ. त्या त्या काळातील महत्वाचे प्रसंग, नेते व व्यक्ती यांच्या समवेत क्षण टिपणारे निवडक फोटो या ग्रंथात असतील. तसेच काही महत्वाचे दस्तऐवज, पत्रे वगैरेची छायाचित्रे ग्रंथात समाविष्ट करण्यात आलेली आहेत. पुस्तकात समाविष्ट करावयाची छायाचित्रे / दस्तऐवज कराड येथील संग्रहातून व इतर ठिकाणाहूनही निवडण्यात आलेले आहेत. हा ग्रंथ छपाईसाठी मौज प्रिटींग ब्युरो, मुंबई यांच्याकडे दिलेला आहे व या ग्रंथाचे प्रकाशन मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीदिनी दिनांक २५ नोव्हेंबर २०११ रोजी करावे असा मानस आहे.

२.५ **मा. न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड यांच्या नावाने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कृत न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड पारितोषिक' :** भारताचे भूतपूर्व सरन्यायाधीश मा. न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कृत न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड पारितोषिक' प्रत्येक वर्षी देण्याचे मान्य झाले. त्यानुसार मुंबई विद्यापीठाच्या मार्चच्या एल.एल.एम.च्या अंतिम परीक्षेत विद्यापीठात पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास देण्यात येतो. परंतु यावर्षी मुंबई विद्यापीठाने काही तांत्रिक अडचणीमुळे वरील परीक्षेचा निकाल राखून ठेवल्यामुळे हे पारितोषिक देण्यात आलेले नाही. रुपये १०,०००/- रोख असे पारितोषिकाचे स्वरुप आहे.

२.६ **दि. १ मे २०१० मध्ये महाराष्ट्र राज्य स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाली व मा. यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी २०१३ मध्ये येत आहे याबाबत कार्यक्रम/उपक्रम आयोजित करण्याबाबत समिती स्थापन.:** दिनांक १ मे २०१० मध्ये महाराष्ट्र राज्य स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाली. मा. यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी २०१३ मध्ये येत आहे. महाराष्ट्र राज्याचा

सुवर्णमहोत्सव व मा. यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी औचित्यपूर्णरीतीने साजरी करण्यासाठी प्रतिष्ठानतर्फे कोणकोणते कार्यक्रम/उपक्रम कार्यान्वित करता येतील ते ठरविणे/आयोजन करणे यासाठी प्रतिष्ठानने खालील सदस्यांची समिती नियुक्त केलेली आहे.

मा. श्री. अरुण गुजराथी, कार्याध्यक्ष
मा. श्री. राम प्रधान, विश्वस्त
मा. श्री. श. गं. काळे. सरचिटणीस
मा. डॉ. रवि बापट, कोषाध्यक्ष
मा. श्री. अजित निंबाळकर, विश्वस्त
मा. डॉ. जब्बार पटेल

या समितीने सर्व संबंधितांशी संवाद साधून खालील कार्यक्रमांचे आयोजन केले.

१) महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेणारा परिसंवाद दिनांक ८ मार्च २०११ रोजी महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ (एम.ई.डी.सी.) यांच्या सहकार्याने चव्हाण सेंटर, मुंबई येथे संपन्न झाला. या परिसंवादामध्ये महाराष्ट्राचा आर्थिक विकास आणि वित्तीय संतुलन, प्रादेशिक अनुशेष व असमानता, मानवी विकासातील असमानता, नागरीकरणाच्या समस्या या विषयांवर संबंधित तज्ज्ञांकडून निबंध मागविण्यात आले होते. यावर वरील तारखेला एकूण चार सत्रांमध्ये चर्चा संपन्न झाली. या परिसंवादास महाराष्ट्र राज्य शासनातील कांही संबंधित सचिवही उपस्थित राहीले.

२) 'कायदा - सुव्यवस्था व सुरक्षा' या विषयावर नेहरु केंद्राच्या सहभागाने नेहरु केंद्र, वरळी, मुंबई येथे परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. अतिशय चांगला परिसंवाद संपन्न झाला.

३) दि. १ मे २०१० ते ७ मे २०१० या कालावधीत केंद्र इमारतीमधील सभागृहे महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सव समारोपाच्या कार्यक्रमांसाठी राखून ठेऊन या काळात प्रतिष्ठानच्या रंगस्वरतर्फे उच्च दर्जाच्या कलावंतांच्या सहकार्याने सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमास अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला.

४) दि. १ मे २०१० ते दि. ७ मे २०१० या कालावधीत प्रतिष्ठानच्या सर्व विभागीय केंद्रांना विशेष कार्यक्रम आयोजित करण्यासाठी प्रत्येकी रु. ५०,०००/- इतकी रक्कम एक विशेष बाब म्हणून देण्यात आली. सर्व केंद्रानी त्या त्या विभागात अतिशय चांगले व दर्जेदार कार्यक्रम आयोजित केले.

२.७ **मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विशेष टपाल तिकिटाचे उद्‌घाटन.:** मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विशेष तिकिट जारी करण्याचा प्रस्ताव भारत सरकारच्या पोस्ट खात्याकडे पाठविलेला होता तो प्रस्ताव पोस्ट खात्याने मान्य करुन निळया पार्श्वभूमीवर काढलेले स्टॅम्पच्या आकाराचे चित्र मा. चव्हाणसाहेबांच्या देवनागरी लिपीतील स्वाक्षरीसह पोस्ट विभागाने प्रकाशित करण्याचे मान्य केले. यानुसार मा. यशवंतराव चव्हाण व मा. भाऊसाहेब हिरे यांच्या विशेष टपाल तिकिटाचे उद्‌घाटन महामहिम श्रीमती प्रतिभाताई पाटील मा. राष्ट्रपती, भारत सरकार यांच्या हस्ते मुंबईमध्ये चव्हाण केंद्राच्या सभागृहात दि. २२ डिसेंबर २०१० रोजी झाले. याप्रसंगी मा. राज्यपाल श्री. के. शंकरनारायणन्, केंद्रीय कृषीमंत्री व प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार, मुख्यमंत्री मा. श्री. पृथ्वीराज चव्हाण, केंद्रीय दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री मा. श्री. गुरुदास कामत, मा. श्री. देवीसिंहजी शेखावत, उपमुख्यमंत्री मा. श्री. अजित पवार तसेच माजी मंत्री श्रीमती पुष्पाताई हिरे व माजी राज्यमंत्री मा. श्री. प्रशांत हिरे व हिरे परिवार त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे मंत्रीगण, आमदार, खासदार व प्रतिष्ठानचे

विश्वस्त/कार्यकारिणी मंडळ सदस्य, संस्थापक सदस्य, आजीव सदस्य, महाराष्ट्र शासनाचे व भारत सरकारचे उच्च अधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

टपाल तिकिट प्रकाशनाचे दिवशी प्रतिष्ठानकडून रुपये १,२५,०००/- ची तिकिटे खरेदी करण्यात आली. त्याचप्रमाणे ब्लो-अपच्या १० प्रती व प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांना त्यांच्या संग्रही ठेवण्यासाठी एक अल्बम याप्रमाणे ५०० अल्बम खरेदी करण्यात आले. तसेच उद्घाटनाच्या दिवशी टपाल तिकिट विक्रीसाठी प्रतिष्ठानच्या सर्व विभागीय केंद्रांमध्ये काऊंटर उघडून देण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानुसार सर्व केंद्रावर मा. चव्हाणसाहेबांच्या टपाल तिकिटाची विक्री झाली. प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांना त्यांच्या संग्रही ठेवण्यासाठी वरील अल्बमची एक प्रत भेट म्हणून पाठविण्यात आली.

२.८ **प्रतिष्ठानच्या कर्मचारी व अधिकारी यांचेसाठी स्वतंत्र सेवानियम तयार करण्यासाठी कार्यकारी गटाची नियुक्ती.**: दिनांक २०.९.२००८ रोजी झालेल्या प्रतिष्ठानच्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे कर्मचारी व अधिकारी यांचेसाठी स्वतंत्र सेवा नियम तयार करावे व त्यांना प्रतिष्ठानच्या कार्यकारी समितीने अंतिम स्वरुप द्यावे असा ठराव करण्यात आलेला आहे. त्यानुसार प्रतिष्ठानचे कार्यालयीन आदेश क्र.यचप्र/२६/०८/आस्थापना, दिनांक १८.१२.२००८ अन्वये श्री. एम. बी. पवार, सदस्य सचिव, कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम व विधी सल्लागार यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी गटाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. प्रतिष्ठानच्या कर्मचारी व अधिकारी यांचेसाठीचे स्वतंत्र सेवानियम जवळ जवळ तयार झालेले आहेत.

## ३. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या केंद्रात झालेले महत्वाचे कार्यक्रम :

३.१ **मा. चव्हाणसाहेबांची पुण्यतिथि व जयंती** : मा. चव्हाणसाहेबांच्या २५ व्या पुण्यतिथीनिमित्त दिनांक २५ नोव्हेंबर २०१० रोजी यशवंतराव चव्हाण केंद्र इमारतीच्या मुख्य सभागृहात झालेल्या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे अध्यक्ष व केंद्रीय कृषीमंत्री मा. श्री. शरदराव पवार उपस्थित होते. या कार्यक्रमात 'यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना/व्यवस्थापन प्रशासन राज्यस्तरीय पारितोषिक २०१०' मा. श्री. आप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील यांना प्रदान करण्यात आले व 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१०' श्रीमती महाश्वेता देवी यांना देण्याचे जाहीर करण्यात आले.

मा. यशवंतराव चव्हाण यांचा ९८ वा जयंती समारंभ दिनांक १२ मार्च २०११ रोजी चव्हाण सेंटरच्या मुख्य सभागृहात संपन्न झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय कृषीमंत्री व प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार हे होते. प्रकृति अस्वास्थ्यामुळे श्रीमती महाश्वेतादेवी स्वतः उपस्थित राहू शकल्या नाहीत. या कार्यक्रमात 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१०' त्यांच्या प्रतिनिधी श्रीमती देवश्री मुखर्जी यांनी स्वीकारला. समारंभाच्या पाहुण्यांचे स्वागत कार्याध्यक्ष मा. श्री. अरुण गुजराथी यांनी केले तर प्रास्ताविक विश्वस्त सौ. सुप्रिया सुळे यांनी केले. सन्मानपत्राचे वाचन मा. श्री. शरद काळे, सरचिटणीस यांनी केले. तसेच राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीच्या अध्यक्षा मा. न्यायमूर्ती सुजाता मनोहर यांनी पुरस्कारा संबंधी मनोगत व्यक्त केले.

वरील दोन्ही कार्यक्रमांस प्रतिष्ठानचे विश्वस्त व सदस्य तसेच इतर प्रतिष्ठित मान्यवर मोठया प्रमाणावर उपस्थित होते.

## ४. यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार व इतर कार्यक्रम

४.१ **यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक** : प्रतिष्ठानच्या उद्दिष्टांतील एक भाग म्हणून खालील क्षेत्रात भरीव कार्य करणा-या मान्यवर व्यक्ति वा संस्थेला चक्रीयपध्दतीने पारितोषिक व सन्मानपत्र देण्यात येते.

१) यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना/व्यवस्थापन प्रशासन पारितोषिक
२) यशवंतराव चव्हाण सामाजिक एकात्मता/विज्ञान तंत्रज्ञान पारितोषिक
३) यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास पारितोषिक
४) यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संस्कृती/कला व क्रीडा पारितोषिक

२०१०-२०११ यावर्षाचे पारितोषिक 'यशवंतराव चव्हाण कृषी - औद्योगिक समाजरचना / व्यवस्थापन प्रशासन' या क्षेत्रासाठी होते. गेली अनेक वर्षे कृषी - औद्योगिक क्षेत्रामध्ये मोलाची कामगिरी केलेल्या मा. श्री. आप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील यांना मा. चव्हाणसाहेबांच्या २५ व्या पुण्यतिथिदिनी, २५ नोव्हेंबर २०१० रोजी केंद्रीय कृषीमंत्री व अध्यक्ष मा. श्री.शरदराव पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. २ लाख रुपये रोख व सन्मानपत्र असे या पारितोषिकाचे स्वरुप आहे.

४.२ **यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार** : मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय एकात्मता, लोकशाहीमूल्ये, सामाजिक-आर्थिक विकास या क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करणा-या नामवंत व्यक्तीला 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार व सन्मानपत्र' देण्यात येते. रक्कम रुपये ५ लाख व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. सुयोग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी मा. न्यायमूर्ती (निवृत्त) श्रीमती सुजाता मनोहर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे. या समितीमध्ये (१) मा. श्री. चार्ल्स कुरिआ, प्रख्यात आर्किटेक्ट व राष्ट्रीय नागरी आयोगाचे भूतपूर्व अध्यक्ष, (२) मा. डॉ. आरमायटी देसाई, माजी अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, (३) मा. डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी महानिदेशक वैज्ञानिक तथा औद्योगिक अनुसंधान परिषद, (४) मा. डॉ. रुपा शहा, माजी कुलगुरु, एस.एन.डी.टी. विद्यापीठ (५) मा. डॉ. राजन् एम. वेळुकर, कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, (६) मा. डॉ. नरेंद्र जाधव, सदस्य, योजना आयोग याचा समावेश आहे.

या निवड समितीच्या शिफारशीनुसार मा. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथी दिनी दि. २५ नोव्हेंबर २०१० मध्ये जाहीर करण्यात आलेला यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार श्रीमती महाश्वेता देवी यांच्या प्रतिनिधी श्रीमती देवश्री मुखर्जी यांना मा. चव्हाणसाहेबांच्या ९८ व्या जयंतीदिनी दिनांक १२ मार्च २०११ रोजी मा. श्री. शरदराव पवार, केंद्रीय कृषीमंत्री व प्रतिष्ठानचे अध्यक्ष यांच्या हस्ते तसेच प्रतिष्ठानचे विश्वस्त व सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानपूर्वक देण्यात आला. सन्मानपत्राचे वाचन विश्वस्त सौ. सुप्रिया सुळे यांनी केले. रोख रक्कम रुपये ५ लाख व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

## ५. विशेष कार्यक्रम / उपक्रम :

५.१ **'यशवंत' आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - दिनांक २० ते २६ जानेवारी २०११** :- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तर्फे प्रत्येक वर्षी दिनांक २० ते २६ जानेवारी या दरम्यान 'यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' आयोजित करण्याचे ठरले असून त्यानुसार दरवर्षी पुणे येथे होत असलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात जे चित्रपट दाखविले जातात त्यापैकी निवडक चित्रपटांचा यशवंत चित्रपट महोत्सवात समावेश करण्यात आला. हे निवडक चित्रपट मुंबईतील जनतेला पहावयास मिळावेत या दृष्टीने चव्हाण केंद्रामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे चित्रपट दाखविण्यात आले. या उपक्रमास **'यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव'** असे नांव देण्यात आलेले आहे. या चित्रपटांचा लाभ मुंबईतील रसिक प्रेक्षकांनी घेतला.

५.२ **इन्स्टिटयूट फॉर डिफेन्स स्टडीज ॲन्ड ॲनॅलिसेस, नवी दिल्ली यांच्यामार्फत मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यान** :- इन्स्टिटयूट फॉर डिफेन्स स्टडीज ॲन्ड ॲनॅलिसेस, नवी दिल्ली या संस्थेची स्थापना मा. यशवंतराव चव्हाण भारताचे संरक्षणमंत्री असताना सन १९६५ मध्ये त्यांनी केलेली आहे. याचे औचित्य साधून सदर संस्थेने प्रत्येक वर्षी नवी दिल्ली येथे प्रत्येक

वर्षी यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यान आयोजित करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार यावर्षी दि. २२ नोव्हेंबर २०१० रोजी प्रो. सुनील खिलनानी, स्टार फाऊंडेशन प्रोफेसर व डायरेक्टर ऑफ दि साऊथ एशिया स्टडीज प्रोग्राम अॅट जॉन हॉपकिन्स युनिव्हर्सिटी यांचे 'दि ग्रेट पॉवर गेम : इंडिया इन दि न्यू वर्ल्ड' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. व्याख्यानास प्रतिष्ठानचे विश्वस्त मा. श्री. राम प्रधान व मा. श्री. अजित निंबाळकर उपस्थित होते. व्याख्यान मा. के. सुब्रमण्यम्, माजी संचालक, आय.डी.एस.ए. यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. वरील संस्थेला प्रतिष्ठानने कायम स्वरुपी रुपये दहा लाख दीर्घकालीन मुदत ठेवीत गुंतविण्यासाठी दिलेले असून त्यातून मिळणा-या व्याजातून प्रत्येक वर्षी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यान आयोजित करण्यात येणार आहे.

५.३ **'कृष्णाकांठ' या पुस्तकाचा इंग्रजी भाषेत अनुवाद** :- मा. यशवंतराव चव्हाण यांनी आपले आत्मचरित्र ३ खंडामध्ये लिहिण्याचा संकल्प केला होता. त्यापैकी 'कृष्णाकांठ' हा पहिला खंड पूर्ण झाल्यावर त्यांचे २५ नोव्हेंबर १९८४ ला निधन झाले. 'कृष्णाकांठ' या पहिल्या खंडाला साहित्यसम्राट न. चि. केळकर यांच्या नावाने देण्यात येणारा पुरस्कार मिळाला होता. सन १९१३ ते १९४६ काळातील कौटुंबिक घडामोडी, स्वातंत्र्य चळवळ व देशात व महाराष्ट्रात प्रभावी ठरलेले सामाजिक व राजकीय विचार याविषयी मा. चव्हाणसाहेबांनी प्रसन्न व पारदर्शक शैलीने लिहिलेले ते आत्मचरित्र आहे. त्यांच्या एकूण व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीवर प्रकाश टाकणारा हा ग्रंथ इंग्रजी भाषेत अनुवादित होऊन महाराष्ट्राबाहेरील वाचकांपर्यंत पोचावा यादृष्टीने या ग्रंथाचा इंग्रजी अनुवाद श्रीमती गायत्री पगडी यांनी केला आहे. सदर इंग्रजी अनुवादाचे पुस्तक मा. चव्हाणसाहेबांच्या जन्मशताब्दी वर्षात प्रकाशित करण्यात येत आहे.

५.४ **पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्यावतीने मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावरील दुर्मिळ कागदपत्रे व छायाचित्रांचे प्रदर्शन.**:- पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्यावतीने मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावरील दुर्मिळ कागदपत्रे व छायाचित्रांचे प्रदर्शन प्रतिष्ठानच्या केंद्र इमारतीमध्ये दि. १४ मार्च २०११ ते १७ मार्च २०११ पर्यंत आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन मा. श्री. पृथ्वीराज चव्हाण, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी केले. याप्रसंगी उप मुख्यमंत्री मा. श्री. अजित पवार, मा. श्री. संजय देवतळे, सांस्कृतिक राज्यमंत्री, मा. श्रीमती फौजिया खान, सांस्कृतिक राज्यमंत्री उपस्थित होते. या प्रदर्शनाचा लाभ मुंबईतील जनतेने घेतला.

५.५ **ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा - २०१०** :- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व फेस्कॉम यांच्या संयुक्त विद्यमाने चव्हाण केंद्राच्या मुख्य सभागृहामध्ये दिनांक २४ ऑक्टोबर २०१० रोजी (सकाळी ९.०० ते दुपारी ३.३० वाजेपर्यंत) बांद्रा ते डहाणू या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभासदांसाठी एका मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा. श्री. शरद काळे हे होते. श्री. मधु मंगेश कर्णिक हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अंदाजे ४०० ज्येष्ठ नागरिक समारंभाला उपस्थित होते. समारंभामध्ये खाली दर्शविलेल्या दोन महिला व दोन पुरुष ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला.

१. कुमारी नीला कौशिक पंडित, वय ८४ वर्षे, अंधेरी
२. सौ. सुलभा गणेश फळणीकर, वय ८३ वर्षे, विलेपार्ले
३. श्री. गोपाळराव तुकाराम कुकडे, वय ८५ वर्षे, दहिसर

४. श्री. गोविंद लाडोबा परब, वय ९१ वर्षे, अंधेरी

या व्यतिरिक्त प्रतिष्ठानने यापूर्वीच्या सत्कारमूर्तिना या मेळाव्यासाठी आमंत्रित केले होते. त्यानुसार पूर्वीचे ११ सत्कारमूर्ती मेळाव्यास उपस्थित होते.

५.६ **यशवंतराव चव्हाण** विशेष **युवा क्रीडा पुरस्कार** २०१० :- श्रीमती कविता राऊत यांनी आशियाई क्रीडा स्पर्धेत अभिमानास्पद कामगिरी केल्याने त्यांना विशेष पुरस्कार म्हणून रुपये ५१,०००/- सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन नवमहाराष्ट्र युवा अभियानतर्फे गौरविण्यात आले.

## ६. यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी :-

. या वर्षी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या एआयटीने वेगवेगळे शैक्षणिक उपक्रम राबवले. विशेषतः पीजीडीएसी आणि पीजीडीएसीए, नव्याने उगम पावणा-या व विकसित होणा-या माहिती तंत्रज्ञानाची गरज लक्षात घेऊन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या एआयटीने विशेष रचनात्मक आणि विकसित अभ्यासक्रम राबवला.

**प्रशिक्षण :-**

एआयटीने २०१०-२०११ या प्रशिक्षण वर्षात खालील अभ्यासक्रम राबवले.

| | | |
|---|---|---|
| अ) सी-डॅक कोर्सेस | - | ४३ |
| ब) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान एआयटीचे विशेष कोर्सेस | - | ४५ |
| क) संयुक्त प्रशिक्षण कोर्सेस | - | ३ |

**नवीन उपक्रम :-**

**सुट्टयांतील वर्ग** :- उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत तरुण विद्यार्थ्यांना लक्षात घेऊन विविध नवीन उपक्रम चालू केले. तसेच नुकत्याच १० वी, १२ वी पास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष वर्ग चालविले.

**जागृती मोहिम :-** संगणकाविषयीच्या जागृती मोहिमेचा एक भाग म्हणून लहान मुलांसाठी विशेष वर्ग चालविले. यात सहभागी झालेल्या मुलांना संगणकाविषयी माहिती देण्यात आली.

**मोफत सीईटी :-** वेगवेगळया उच्च उभ्यासक्रमासाठी असणा-या प्रवेश परीक्षांमध्ये चांगले यश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन देण्यात आले. यास विद्यार्थ्यांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला.

**टेक संगम** :- सी-डॅक मार्फत टेक संगम नावाचा नवा उपक्रम विविध कॉलेजमध्ये राबविण्यात आला.

**सॉफ्ट स्किल :-** व्यावसायिक संभाषण/संवाद आणि सॉफ्ट स्किल यामधील तज्ज्ञांचे प्रशिक्षण हे विद्यार्थ्यांना खूपच मार्गदर्शक ठरत आहे.

**वेबसाईट आणि फेसबुक** :- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या एआयटीची स्वतःची अशी एक लोकप्रिय वेबसाईट आहे. www.vcpait.org. चे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे एआयटी फेसबुक या सोशल नेटवर्कींग साईटवर सुध्दा उपलब्ध आहे. त्यामुळे जुन्या विद्यार्थ्यांसहीत सर्व उत्सुक व्यक्तीशी संवाद साधता येतो.

कार्पोरेट क्षेत्रातील उच्च पदस्थ व कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्याचा उपक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या एआयटीने चालू ठेवला आहे. या प्रशिक्षणाचा लाभ एमएससीबी (प्रशिक्षण आणि परीक्षा), ईएसआयसी (प्रशिक्षण आणि परीक्षा), एनएसई एसआयबी या संस्थानी घेतला आहे.

**विशेष सवलत :-**

- एआयटीमध्ये पात्र आर्थिक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विशेष सवलत दिली जाते.
- ज्येष्ठ नागरिक व विशेष प्राविण्य असलेल्या व्यक्तींना सवलत दिली जाते.
- आपल्या सैनिकांना त्यांच्या कामाविषयीचं त्यांचं समर्पण आणि त्याग याविषयी आभार म्हणून त्यांना स्वतःला आणि परिवारालाविशेष दरांमध्ये प्रशिक्षण दिली जाते.
- कांही पात्र उमेदवारांना आपण टप्प्याने शुल्क भरण्याची सवलत देतो.
- पोलीस आणि त्यांचे कुटुंबिय यांना त्यांच्या गरजेप्रमाणे विशेष प्रशिक्षण देतो.

**जनजागृती :-** एआयटीच्या परिसंवादातील सहभाग.

अ) **ठाणे व्यवसाय परिसंवाद :-**

नवमहाराष्ट्र युवा अभियानने आयोजित केलेल्या ठाणे करिअर व्हीजनमध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची एआयटी सहभागी झाली. तिथे आम्हाला तरुण सहभागी मित्रांना भेटण्याची संधी मिळाली, त्यात त्यांची आयटी प्रशिक्षणाबद्दलची आवड व उत्साह दिसून आला.

ब) **बदलापूर व्यवसाय परिसंवाद :-**

नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टने आयोजित केलेल्या बदलापूर करिअर व्हीजनमध्ये एआयटीने सहभाग घेतला. तेथे डॅक विषयी खूप चांगल्याप्रकारे जाणून घेणे विषयी विचारणा करण्यात आली.कांही विद्यार्थ्यांनी प्री-डॅक कोर्ससाठी नोंदणी सुध्दा केली. आम्ही मास्टर प्रोग्रॅम विषयी माहिती दिली आणि त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला.

क) **मुंबई शैक्षणिक समारोह :-**

रविंद्र नाटय मंदिर, प्रभादेवी येथे राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसने आयोजित केलेल्या मुंबई शैक्षणिक समारंभात एआयटीने सहभाग घेतला. तेथे चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामध्ये मास्टर प्रोग्रॅम विषयी माहिती दिली. कांही जणानी पायाभूत अभ्यासक्रमाविषयी विचारणा केली. आपल्या केंद्रा विषयी एक जागृकता निर्माण झाली.

ड) **ग्वॉल्हेर येथील महाविद्यालयांना भेट :-**

ग्वॉल्हेर येथील विविध महाविद्यालयांना भेटी दिल्या आणि तेथील प्राचार्यांना एआयटीमध्ये असणा-या आयटी प्रशिक्षणाविषयी माहिती दिली. आपल्या जुन्या विद्यार्थ्यांमार्फत प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची एक बैठक आयोजित केली गेली. हस्तपत्रके आणि पुस्तिका यांचे वाटप करण्यात आले.

. मल्टीकोर टेक्नॉलॉजी या विषयावर एआयटीमध्ये श्री. आशिष शोम यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

एस.एन.डी.टी. महाविद्यालय, सिध्दार्थ महाविद्यालय आणि आर. जे. महाविद्यालय येथे भेटी आणि सादरीकरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

दिवसे दिवस कमी होणा-या नोक-यामध्ये एआयटी प्लेसमेंट टिमला आपल्या विद्यार्थ्यांसाठी चांगल्या नोक-या मिळाल्या. जागतिक मंदीच्या प्रभावात सुध्दा एआयटीच्या ९५ टक्के विद्यार्थीना आय.टी. उद्योगात चांगल्या ठिकाणी योग्य नोक-या मिळाल्या. विद्यार्थ्यांना चांगल्या संस्थांमध्ये मुलाखती देण्याची पुरेसी संधी दिली गेली त्या संस्था खालील प्रमाणे.

१. सायबेग सॉफ्टवेअर लिमिटेड.
२. सीएससी लिमिटेड.
३. मॅगमा डिझाईन ॲटोमेशन इंडिया प्रा. लिमिटेड.

४. एचडीएफसी बँक.
५. फायनान्शीअल टेक्नॉलॉजीस (इंडिया) लिमिटेड.
६. पोलॅरीज सॉफ्टवेअर लॅब लिमिटेड.
७. नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड.
८. कॅप्गेमिनी इंडिया.
९. एनएसई इन्फोटेक सर्व्हीसेस लिमिटेड.
१०. अलोहा टेक्नॉलॉजीस प्रा. लिमिटेड.
११. हाऊस ऑफ कोड.
१२. जीई इंडिया इंडस्ट्रीज प्रा. लि.
१३. गोदरेज इंफोटेक लिमिटेड.

**संरचना** :- माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी विद्यार्थ्यांना त्यांना हव्या असलेल्या सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देणे. मुंबाई बाहेरुन शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या राहण्याच्या सोईबद्दल मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांकरिता दर्जेदार प्रशिक्षण देण्यास व्यवस्थापन प्रतिबंद आहे. या कामासाठी प्रबोधिनी पुढील वर्षासाठी तेवढयाच आत्मविश्वासाने तयार आहे.

## ७. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम/उपक्रम :

७.१ **प्रथम - मुंबई शिक्षण उपक्रम** :- मुंबईत शहरात झोपडपट्टीवासियांच्या मुलांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून बालवाडया चालविणे, संगणकांचे प्रशिक्षण देणे, झोपडपट्टीतील स्थानिक रहिवाशांमधून उपक्रमाकरिता शिक्षक - शिक्षिका तयार करणे इत्यादी महत्वपूर्ण कामे प्रथम - मुंबई शिक्षण उपक्रम मार्फत डॉ. माधव चव्हाण व श्रीमती फरिदा लांबे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठया प्रमाणावर केली जातात. संस्थेच्या उपक्रमास प्रतिष्ठानकडून सहकार्य करण्यात येते.

७.२ **युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स** :- युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या भारतीय विभागाचे सहकार्य प्रतिष्ठानच्या उपक्रमांना लाभत असून महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग व सहकार या सामाजिक क्षेत्रांच्या भरीव वृध्दीसाठी ते फार महत्वाचे आहे. युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स इन इंडियाद्वारे निरनिराळया क्षेत्रात प्रकल्प उभारण्यासाठी आर्थिक मदत कशी उपलब्ध करुन घेता येईल, याची माहिती प्रसिध्द केली जाते. या संस्थेस प्रतिष्ठानने केंद्र इमारतीच्या तिस-या मजल्यावर जागा दिली आहे.

७.३ **महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ** :- महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ या संस्थेची स्थापना प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी सन १९५७ मध्ये केली. ही संस्था महाराष्ट्राचा आर्थिक व औद्योगिक विकास वेगाने आणि संतुलितपणे होण्यासाठी संशोधनाचे कार्य करते. महाराष्ट्रामध्ये उद्योग सुरु करण्यासाठी इच्छुक असणा-या उद्योजकांना सांख्यिकीय माहिती पुरविणे, योग्य निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयांची माहिती देणे, चिकित्सक पध्दतीने अधिकृत आकडेवारी पुरविणे तसेच महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या उद्योगसंधीविषयी माहिती देण्याचे काम ही संस्था करते. संस्थेतर्फे उद्योजकांसाठी परिसंवाद, परिषदा व कार्यशाळा आयोजित केल्या जातात. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व सदरची संस्था परस्पर सहकार्याने काम करतात. या उपक्रमासाठी महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाला केंद्र इमारतीतील तिस-या मजल्यावरील जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

७.४ **बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन (बॉम्बे फर्स्ट)** :- बॉम्बे फर्स्ट ही संस्था बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रिज आणि बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन या संस्थांच्या पुढाकाराने व औद्योगिक / वाणिज्य क्षेत्रातील अनेक आस्थापनांच्या आर्थिक पाठबळावर १९९५ मध्ये अस्तित्वात आली. या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येचे आव्हान स्वीकारुन येथील पायाभूत सुविधामध्ये विकास करुन नागरिकांच्या राहणीमानाची पातळी उंचावणे, काम करण्याच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे आणि भांडवली गुंतवणूकदारांना आकर्षित करणे हे आहे. मुंबई शहराच्या विविध प्रश्नांवर विचार करण्यासाठी शासन, महानगरपालिका व इतर स्वयंसेवी संस्था यांचे समन्वयक म्हणून ही संस्था कार्य करते. संस्थेचा वाढता व्याप लक्षांत घेऊन प्रतिष्ठानने या संस्थेला केंद्र इमारतीतील तिस-या मजल्यावर जागा दिली आहे.

## ८. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई मार्फत देण्यात आलेले अनुदान :-

८.१ **सेंटर फॉर इंटरनॅशनल स्ट्रॅटेजिक ॲन्ड डेव्हलपमेंट स्टडीज, पुणे** :- या संस्थेने 'भारतीय राज्य व्यवस्थेमधील महाराष्ट्राचा सहभाग' या विषयावर दिनांक ६ व ७ मे, २०१० रोजी पहिले राष्ट्रीय संम्मेलन आयोजित केले होते. त्यानंतर त्यांनी दुसरे राष्ट्रीय संमेलन मार्च २०११ मध्ये घेतले. संमेलनात सादर करण्यात येणा-या निबंधांमधील निवडक निबंधाचे पुस्तक रुपाने प्रकाशित करण्यात येणार आहे. संस्थेचे वरील कामाचा विचार करुन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने रुपये २५,०००/- अनुदान दिले आहे.

८.२ **प्राज्ञ पाठशाळा, वाई, जिल्हा सातारा** :- 'साहित्याचे तर्कशास्त्र' या मा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्यविषयक लेख व भाषणांच्या संपादित ग्रंथ प्रकाशनास प्राज्ञ पाठशाळा, वाई यांना रु. ८८,०००/- देणगी देण्यात आली. प्रतिष्ठानच्या आर्थिक सहाय्याने छापल्याचा ठळक उल्लेख करुन ३० प्रती विनामूल्य प्रतिष्ठानला पाठविण्यात आल्या.

८.३ **सार्वजनिक उत्सव समिती, नवी दिल्ली** :- सार्वजनिक उत्सव समिती, नवी दिल्ली ही संस्था मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रत्येक वर्षी नवी दिल्ली येथे यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह कार्यक्रम आयोजित करीत आहे. यावर्षी त्यांनी दिनांक २६ नाव्हेंबर २०११ ते २८ नोव्हेंबर २०११ पर्यंत व्याख्याने, परिसंवाद व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईतर्फे रुपये ५०,०००/- इतकी आर्थिक मदत केली आहे.

८.४ **इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, मुंबई शाखा** :- इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, मुंबई शाखा यांच्यामार्फत दरवर्षी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यान आयोजित केले जाते. यावर्षी प्रतिष्ठानचे विश्वस्त मा. श्री. राम प्रधान यांचे 'पॉलीटिक्स ऑफ गव्हर्नन्स' या विषयावर दि. २५ मार्च २०११ रोजी चव्हाण सेंटरमध्ये आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमास महाराष्ट्र शासनातील उच्च अधिकारी तसेच प्रतिष्ठानचे पदाधिकारी उपस्थित होते. यासाठी प्रतिष्ठानने वरील संस्थेस रुपये १५,०००/- आर्थिक सहाय्य दिले.

## ९. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम / उपक्रम :-

९.१ **कृषी व सहकार व्यासपीठ** :- कृषी व सहकार व्यासपीठाचे कामकाज पुणे येथे श्री. अंकुशराव काकडे यांचे मार्गदर्शनाखाली चालते. जरुरीनुसार वेळोवेळी श्री. मोहन धारिया आणि डॉ. भागवतराव पवार यांचे मार्गदर्शनाचा लाभही

मिळतो. व्यासपीठाचे दैनंदिन कामकाज श्री. शं. त्रि. भिडे पहातात. याकामी त्यांना प्रा. प्र. त्र्यं. पंडित, श्री. सुनिल कदम आणि श्री. रवि सरनाईक यांची मदत होते.

१.१ **कृषी विभाग** :- राज्य शासनाने मा. श्री. अजित निंबाळकर यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने पाण्याचे ठोक जलदर निश्चिती संबंधाची रुपरेषा प्रसिध्द करुन त्यावर अभिप्राय मागविले होते. यावर 'प्रयास' या संस्थेने छोटे पुस्तक प्रसिध्द करुन आक्षेपही दिले होते. त्यावर व्यासपीठाने एक टिपण तयार करुन ते श्री. मोहन धारिया यांना सादर केले व त्यांचेशी चर्चाही करण्यात आली. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने पुण्यामध्ये ठोक जलदर निश्चितीबाबत एक दिवसाचे खुले चर्चासत्र आयोजित केले होते. त्यांत व्यासपीठाच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला. आपले अभिप्रायही प्राधिकरणाला कळविण्यात आले. त्याशिवाय शेतक-यांना (शेतक-यांचे पाणी वापर सहकारी संस्थाना) पाणी मोजून द्यावे. कालव्यातील पाण्याची गळती व चोरी रोखण्यासाठी जरुर तर सॅटेलाईट तंत्रज्ञानाचा फायदा घ्यावा असेही सुचविणेत आले. त्याशिवाय मा. श्री. अजित निंबाळकर, अध्यक्ष, जलसंपत्ती प्राधिकरण यांना अर्धशासकीय पत्र दि. ८ जुलै २०१० ने श्री. अंकुशराव काकडे यांचे सहीने माहिती अधिकार कायद्याचे कलम ४ बी(३) व ४ बी(७)प्रमाणे ठोक जलदर निश्चितीसाठी प्राधिकरणाने जे निकष निश्चित केले आहेत त्याचा प्रशासकीय, शास्त्रीय व अर्थशास्त्रीय आधारही स्पष्ट करणे जरुरीचे असल्याचे विदित केले. 'ॲग्रोवन' दैनिकामध्ये शेतक-यांना पाणी मोजून द्या, या श्री. भिडे यांच्या तीन लेखांना एप्रिल, २०१० मध्ये प्रसिध्दी देण्यात आली.

१.२ **व्यासपीठ संयोजकांना लेखन पारितोषिक** :- 'बळीराजा' या कृषीविषयक मासिकाचे कार्यालयात दर महिन्याचे दुस-या शनिवारी कृषी तज्ज्ञांची व शेतक-यांची बैठक आयोजित करुन कृषीविषयक विषयांवर चर्चा केली जाते. कृषी व सहकार व्यासपीठाचे संयोजक श्री. एस. टी. भिडे त्यामध्ये सहभाग घेतात व 'बळीराजा' मासिकांत लेखनही प्रसिध्द करतात. २००९-१० मधील लेखासाठी त्यांना 'बळीराजा' मासिकातर्फे 'समाजविकास' या विषयावरील लेखासाठी कै. शंकरराव किर्लोस्कर यांचे स्मरणार्थ असलेले यावर्षीचे द्वितीय पारितोषिक देणेत आले.

१.३ **ॲग्रो इंडस्ट्रीअल पॉलिसी** :- महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रियल पॉलिसी प्रसिध्द केली होती, त्यावर व्यासपीठाचे श्री. भिडे यांनी एक टिपण तयार करुन दि. २३.७.२०१० रोजी डेव्हलपमेंट कमीशनर इंडस्ट्रीज, मुंबई यांना सादर केले. तयार केलेल्या टिपणावर चर्चा करण्यासाठी डॉ. भागवतराव पवार यांचे अध्यक्षतेखाली व्यासपीठाची एक बैठक दि. ३१.८.२०१० रोजी आयोजित केली होती. सचिव, कृषी, महाराष्ट्र शासन यांनी या विषयावर कृषी अधिकारी व उद्योग खात्याचे अधिकारी यांची एक सभा घेतली होती. त्यास अनुसरुन श्री. नानासाहेब पाटील, सचिव, कृषी, महाराष्ट्र शासन यांनाही व्यासपीठाच्या सूचनांचा अहवाल दि. ३.१०.२०१० रोजी सादर करणेत आला.

१.४ **महाराष्ट्र राज्य सेंद्रीय शेती व निविष्ठा धोरण** :- कृषि व सहकार व्यासपीठ आणि 'बळीराजा' मासिक यांचे संयुक्त विद्यमाने दि. ९.१०.२०१० रोजी 'बळीराजा' मासिकाचे कार्यालयात वरील विषयावर चर्चासत्राचे आयोजन करणेत आले होते. सदर चर्चेचे अनुषंगाने प्रतिष्ठानचे संयोजक श्री. भिडे यांनी एक लेख तयार केला. सदर लेख श्री. अंकुशराव काकडे यांचे पत्र दि. १५.१०.२०१० ने डॉ. सुधीरकुमार गोयल, सचिव, (सहकार) महाराष्ट्र शासन यांना सादर करणेत आला. सदर लेखास 'ॲग्रोवन' या दैनिकांत व 'अफार्म' चे मासिकात पसिध्दी मिळाली.

१.५ **मार्केट रेडीओ केंद्र :-** दि. ७.१२.२०१० रोजी डॉ. भास्कर गायकवाड यांचा 'कम्युनिटी रेडीओ शेतीसाठी वरदान' हा लेख 'ॲग्रोवन' दैनिकांत प्रसिध्द झाला होता. त्या अनुषंगाने शेतक-यांना बाजार भाव व अन्य तदनुषंगिक अद्यावत् माहिती उपलब्ध होऊन आपला शेतीमाल बाजारपेठेत योग्य वेळी पाठविता येतो. यासाठी अशी रेडीओ केंद्रे प्रगत देशांत बाजार समित्या चालवितात. ही बाब लक्षांत घेऊन प्रशासक कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे यांना असे रेडीओ केंद्र चालविणेसंबंधी विचार व्हावा असे दि. ७.१२.२०१० चे पत्राने कळविण्यात आले. मा. पणन संचालक यांना याबाबत मार्गदर्शन करणेबाबतही कळविणेत आले आहे.

१.६ **पाणी समस्या आणि उपाय :-** प्रा. प्रभाकर पंडित यांचा 'पाणी समस्या आणि उपाय' हा पारितोषिक प्राप्त निबंध 'ॲग्रोवन' या दैनिकांत चार भागांत प्रसिध्द करणेत आला.

१.७ **पीक विमा योजना :-** दि. २२.२.१०११ रोजी उपग्रह प्रतिमांवर आधारित पीक विमा योजना या विषयावर श्री. भिडे यांनी तयार केलेल्या टिपणांवर व्यासपीठाचे सभेत चर्चा करणेत आली. त्या विषयीचा एक प्रस्ताव दि. २३.२.२०११ रोजी मा. मंत्री (कृषि) राज्य व केंद्र शासन यांना अनुक्रमे श्री. अंकुश काकडे व श्री. मोहन धारिया यांचे सहीने सादर करणेत आला. श्री. भिडे यांचा या विषयावरील लेख डॉ. भागवतराव पवार, संपादक, 'शरद कृषि' यांनी सदर मासिकांत प्रसिध्द केला.

१.८ **बाजार समितीतील कटती :-** शेतीमाल बाजार समितीमध्ये, शेतक-याने शेतीमाल विकावयास आणला असताना त्यातून वजनांत घट/कटती वा अन्यप्रकारे शेतक-यांचे नुकसान होईल अशाप्रकारे कटती घ्यावयाची नसते. मात्र नाशिक जिल्हयात जानेवारी, फेब्रुवारी २०११ चे दरम्यान कांद्याची मोठी आवक होऊन हा कटतीचा प्रश्न ऐरणीवर आला. बाजार समितीतील खरेदी विक्री व्यवहारावर व्यापा-यांचे संपामुळे आपत्ती ओढवली. त्यावर श्री. भिडे यांचे कटती आणि कायदा या प्रश्नावर प्रकाश टाकणारे खालील दोन लेख 'ॲग्रोवन' दैनिकात प्रसिध्द झाले.

१) शेतीमाल राखण्याची जबाबदारी कोणाची ? ॲग्रोवन दैनिक दि. ११.२.२०११

२) म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावतो. अग्रोवन दैनिक दि. १२.२.२०११

१.९ **इंडो जर्मन पाणी प्रकल्प :-** इंडो जर्मन पाणी प्रकल्पामध्ये लोक सहभागाला महत्व देणेत आले असून धरण व कालवे तयार करणे व पाणी वापर सहकारी संस्थेचे माध्यमातून पाणी देण्यापर्यंतच्या नियोजनावर भर दिलेला आहे. त्यावर 'आमची माती आमचा प्रकल्प' व 'जर्मन प्रकल्पाचे वाटेने जाऊ या' हे दोन लेख दि. १७ व १८ फेब्रुवारी २०११ रोजी 'ॲग्रोवन' दैनिकांत व्यासपीठाचे संयोजकांचे नांवे प्रसिध्द झाले.

## १.२ सहकार विभाग :-

२.१ **सहकार खात्याची पुनर्रचना :-** शासन निर्णय क्र. १५०९/प्र.क्र.४१७/५-सी दि. १०.२.२०१० ने मा. सहकार आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली सहकार खात्याचे पुनर्रचनेबाबत शिफारशी करण्यासाठी एक समिती गठीत केली. सदर समितीचे सभासद सचिव श्री. तिटकारे यांनी श्री. भिडे यांना पत्र पाठवून आपले विचार कळविणेस सुचविले होते. त्यावर त्यांनी एक टिपण तयार केले. त्याबाबत व्यासपीठाचे दि. २५.३.२०१० चे सभेत सविस्तर चर्चा झाली व अहवाल सहकार खात्यास सादर करणेत आला.

त्याशिवाय सदर अहवाल नागरी सहकारी बँकांचे राज्यस्तरीय नाशिक येथील परिषदेचे अनुषंगाने प्रसिध्द करण्यात आलेल्या स्मरणिकेमध्येही प्रसिध्द करणेत आला. तसेच या विषयावर प्रो. आर. व्ही. नाडकर्णी, श्री. व्ही. पी. वर्तक, श्री. मुकुंद बर्वे, (लेखा परीक्षक) इत्यादींचे आलेले अभिप्रायही उपनिबंधक सहकारी संस्था (आस्थापना) व सहकार आयुक्तांचे कार्यालय यांना सादर करणेत आले.

२.२ **सहकार कायदा तज्ञ समिती** :- महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. संकीर्ण १०१०/प्र.क्र. ३९१/२-सी दि. ०७.४.२०१० नुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मध्ये व्यापक सुधारणा सुचविणेसाठी मा. सहकार आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली १० तज्ञांच्या समितीची नेमणूक केली. त्यामध्ये सेवानिवृत्त सहनिबंधक सहकारी संस्था व कृषि व सहकारी व्यासपीठाचे संयोजक श्री. श. त्रिं. भिडे यांची सदस्य म्हणून नेमणूक केली. त्यांनी वेळोवेळी झालेल्या तज्ञ समितीचे सभांना हजर राहून आपली मते मांडली. अनेक सूचनाही आत्मनिर्भर सहकारी संस्थांचा कायदा असण्याचे अनुषंगाने केल्या. या विषयावर श्री. अंकुशराव काकडे यांचे खालील तीन लेख 'ॲग्रोवन' दैनिकांत प्रसिध्द झाले आहेत.

१) सक्रिय सभासदांना महत्त्व येणार ! दि. १२.१०.२०१०

२) पत संस्थांसाठी हवे नियामक मंडळ ! दि. १३.१०.२०१०

३) सर्व संस्थांसाठी समान न्याय ! दि. १४.१०.२०१०

श्री. भिडे यांचा एक लेखही 'ठेवीदाराना हवाय मतदानाचा अधिकार' हा 'ॲग्रोवन' दैनिकांत दिनांक ५.१.२०११ रोजी प्रसिध्द झाला. त्याचप्रमाणे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये करावयाच्या सूचना या विषयावर व्यासपीठाचे दि. २९ जुलै २०१० चे बैठकीमध्ये चर्चा करण्यात येऊन सभेतील चर्चेचे अनुषंगाने एक अहवाल मा. सहकारी आयुक्त यांना दि. २.८.२०१० चे पत्राने सादर करण्यात आला. श्री. प्र. गो. कोरान्ने (भा.प्र.से.) यांनी पाठविलेले वरील विषयाचे टिपण सहकार आयुक्तांना पाठविणेत आले. त्यांना असेही कळविणेत आले की, डॉ. पद्माकर दुभाषी, माजी सचिव, केंद्र शासन, प्रा. नीळकंठ रथ, अध्यक्ष, इंडियन स्कूल ऑफ पॉलीटिकल इकॉनॉमी आणि प्रा. आर. व्ही. नाडकर्णी यांना तज्ञ समिती पुढे आपले विचार मांडणेस आमंत्रित करुन त्याचे सहकार कायदा सुधारणा विषयक विचार जाणून घ्यावेत.

२.३ **सहकारी संस्था लेखा परीक्षण** :- सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करण्यासाठी प्रमाणित लेखापरीक्षकाची नेमणूक करण्यात येते. त्या नेमणुकीमध्ये गैरप्रकार होतो असा प्रवाद आहे. तो टाळण्यासाठी मुंबई विभागाचे माजी सहनिबंधक सहकारी संस्था यांनी सर्वांनाच सर्वसाधारणपणे सारखेच लेखा शुल्क उपलब्ध होईल आणि अशा नेमणुका निर्हेतुकपणे यादृच्छिक पध्दतीने होतील अशी व्यवस्था केली होती. त्याची माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गर्व्हनर श्रीमती थोरात यांना पाठविली होती व सहकार आयुक्तांनाही दिली होती. त्याबाबत रिझर्व्ह बँकचे आर.पी.सी.डी. विभागाकडून दि. २८.७.२०१० रोजी कारवाईबाबत चीफ जनरल मॅनेजर अर्बन बँकस् डिपार्टमेंट यांना कळविणेत आले आहे. मा. सहकार आयुक्त यांनीही लेखापरीक्षणांसंबंधी सविस्तर परिपत्रक प्रस्तुत केले आहे. (जा.क्र. स.आ./अनिलेप/वाटप व्यवस्था/सुधा.परि/३५८/११ दि. ११.४.२०११ यामधील अट क्र. ४ मध्ये प्रमाणित लेखापरीक्षकांना सर्वसाधारणपणे सारखेच लेखा शुल्क उपलब्ध होणेचे दृष्टीने सूचना निर्गमित केल्या आहेत)

२.४ **कलम १५४ खालील निबंधकांचे अधिकार** :- महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम १०१(१) व १०१(२) खाली निबंधकांनी दिलेल्या वसुली दाखल्याबाबत सर्रासपणे कलम १५४ खाली त्याचा पुनर्विचार करता येईल का ? की हे अधिकार खास

शासनानेच तारतम्याने वापरावयाचे आहेत ? याबाबत एव्हरेस्ट को. ऑपरेटिव्ह हौसिंग संस्था विरुध्द महाराष्ट्र शासन सिव्हील अपिल नं. १/१९६६ दि. १८.१.१९६६ चे निकालाचा आधार घेऊन शासनाकडे उपनिबंधक मुंबई (३) यांनी प्रश्न उपस्थित केला होता. सदर प्रकरणावर व्यासपीठाचे २०.११.२०१० रोजीचे सभेत चर्चा करण्यात आली. उपनिबंधकांनी याबाबत काढलेले अनुमान योग्य वाटत नाही असा निर्वाळा सदर सभेत चर्चेअंती घेणेत आला. तसाच निर्णय शासनाने मंत्रालयात घेतल्याचे आता समजते.

२.५ **सहकारी प्रशिक्षणास सहाय्य :-** श्री. मोहन धारिया यांचे सहीने सेंट्रल सेक्टर स्कीम फॉर को.ऑपरेटीव्ह एज्युकेशन ही योजना १२ व्या पंचवार्षिक योजनेतही चालू ठेवावी असा प्रस्ताव मा. श्री. शरद पवार, कृषी मंत्री, केंद्र शासन यांना दिनांक ११.१०.२०१० चे पत्राने सादर करणेत आला होता. त्यास उत्तर म्हणून मा. कृषिमंत्री यांनी अशा योजनासाठी केंद्र शासन मदत व एज्युकेशन फंड (बहुराज्य सहकारी संस्था कायदा) यामधून ११व्या पंचवार्षिक योजने अखेर रु. ३५०/- कोटीचा कॉर्पस फंड व्याजासह उपलब्ध होईल, त्याचप्रमाणे आता सहकारी प्रशिक्षणासाठी फी आकारली जात आहे, त्यातूनही प्रशिक्षण खर्चासाठी रकमा उपलब्ध होतील. तेव्हा अगदीच जरुर वाटल्यास १२ व्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करताना योजना आयोग, राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण संस्था इत्यादींशी त्यावेळी विचार विनिमय करुन निर्णय घेता येईल असे अर्धशासकीय पत्र क्र. आर-११०१६/४/२०१०-सी.ई.टी दि. १२ नोव्हेंबर २०१० ने कळविले आहे.

२.६ **क्रियाशील सभासदत्व :-** मा. सहकार आयुक्त श्री. राजगोपाल देवरा यांना श्री. अंकुशराव काकडे यांचे सहीने दि. २ नोव्हेंबर २०१० रोजी खालील प्रस्ताव सादर केला आहे. क्रियाशील सभासदत्वाची तरतूद, सहकार कायदा तज्ज्ञ समितीने बिगर कृषि सहकारी पत संस्थांपुरतीच सुचविणेत आली आहे. ती संकल्पना सर्व सहकारी संस्थांसाठी उपयुक्त असून लागू होण्यासारखी आहे. केंद्र शासनाने मा. श्री. शिवाजीराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या सहकार उच्चाधिकार समितीनेही तशी शिफारस केली आहे. केंद्र शासनाने ती मान्यही केली आहे. संचालक मंडळ पात्रतेसाठी सभासदांना तशा प्रकारची तरतूदही काही सहकारी संस्थांचे उपविधीत आहे. ही गोष्ट लक्षात घेता सहकारी संस्थानी क्रियाशील सभासदत्वाबाबतची तरतूद आपल्या उपविधीत करावी अशा परिपत्रकीय सूचना सहकार खात्याकडून निर्गमित व्हाव्यात.

२.७ **के.वाय.सी. प्रणाली :-** सहकार खात्याने सहकारी पतसंस्थांचे सभासदासाठी के.वाय.सी. (ग्राहक माहिती) प्रणाली लागू केली आहे. या विषयावर व्यासपीठाचे २९.१.२०११ चे सभेत चर्चा करण्यात आली. रिझर्व्ह बँकेने या संबंधाने सुचविलेले बँकांसाठीचे आदेश लक्षांत घेऊन त्या अनुषंगाने मा. सहकार आयुक्त यांना सदर प्रणाली प्रभावी परंतु सर्वसामान्याना त्रासदायक न होण्याचे दृष्टीने श्री. अंकुश काकडे यांचे सहीने दि. ३१.१.२०११ रोजी ७ सूचनांचा प्रस्ताव सादर केला आहे.

२.८ **आदर्श गृहनिर्माण सहकारी संस्था :-** आदर्श गृहनिर्माण सहकारी संस्थेबाबत शासनाने नेमलेल्या एन्क्वॉयरी कमिशनचे प्रसिध्दी पत्रकास (नोटीफिकेशन) अनुसरुन कृषि व सहकार व्यासपीठाची एक सभा दिनांक ५.२.२०११ रोजी घेणेत आली. त्या सभेतील चर्चेचे अनुषंगाने एक निवेदन संयोजक व्यासपीठ व अन्य सभासद यांचे सहीने कमिशनरला सादर करणेत आले.

२.९ **सहकार समीक्षा :-** सहकार समीक्षा या विषयावर कृषि व सहकार व्यासपीठ, नॅशनल कौन्सिल फॉर को. ऑपरेटिव्ह ट्रेनिंग, नवी दिल्ली व वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान पुणे यांचे संयुक्त विद्यमाने एक राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्राचे

आयोजन करण्याचे ठरले. त्यासाठी राष्ट्रीय स्तरावर सहकारी संस्था तसेच अन्य राज्यातील निवडक सहकारी संस्था यांना वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान यांनी तर महाराष्ट्रातील शिखर सहकारी संस्था व अन्य निवडक चांगल्या सहकारी संस्थांना व्यासपीठाने निमंत्रण पाठवून दि. १८ मार्च २०११ रोजी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. पण राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण संस्थान, नवी दिल्ली यांचे प्रतिनिधी व अन्य यांचे आग्रहानुसार चर्चासत्र पुढे ढकलावे लागले.

२.१० **माहितीचा अधिकार कायदा** :- मुंबई उच्च न्यायालय निर्णय रिट पिटीशन क्र. ८३८२/२००८ दि. ८ डिसेंबर २००८ नुसार माहिती अधिकार कायद्याची व्याप्ती मोठया प्रमाणात, सहकारी संस्थाबाबत कमी झाल्या कारणाने सदर निर्णयातील परिच्छेद चार (पान क्र. ६) वर सुचविलेप्रमाणे महाराष्ट्र शासनाने जरुर ते नोटीफिकेशन काढावे अगर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ ची व्याप्ती वाढवावी असा प्रस्ताव शासनाचे प्रधान सचिव, (सहकार) यांना मा. बापूसाहेब खैरे यांचे सहीने दिनांक ४.३.२०१० रोजी पाठविला होता. यासंबंधाने श्री. प्रल्हाद कुचरे माहिती अधिकार, कक्ष अधिकारी, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रशासन प्रबोधिनी (यशदा) यांचेशी झालेल्या चर्चेस अनुसरुन 'यशदा' या माहिती अधिकाराविषयी शासनाच्या संपर्क अभिकरणामार्फतही सदर प्रस्तावाचा पाठपुरावा व्हावा यासाठी त्यांना दिनांक २३.४.२०१० रोजीच्या अर्धप्रशासकीय पत्राने विनंती करणेत आली.

२.११ **यशवंतरावांचे समाजकारण** :- दि. १८.११.२०१० रोजी 'यशवंतरावांचे समाजकारण' या विषयावर श्री. रा. ना. चव्हाण, मा. यशवंतरावांचे समकालीन यांचे संकलित लिखाणाचे पुस्तक पुणे येथे प्रकाशित करणेत आले. यावेळी प्रा. जयंत लेले हे कॅनडामधील प्राध्यापक हजर होते. त्यांनी आपल्या भाषणांत यशवंतरावांची महती विशद करुन आपण वेळोवेळी घेतलेल्या एकूण ४२ तासांच्या मुलाखतीचा अंदाजे ८०० पानी मजकूर आपल्याकडे उपलब्ध आहे. त्यावर मी सवड मिळेल त्यानुसार यशवंतरावांचे विचार पुस्तकरुपाने प्रसिध्द करणार आहे असे स्पष्ट केले. रा. ना. चव्हाणांचे व श्री. लेले यांचे लिखाणास मदत करणेबाबतचा एक प्रस्ताव मुख्यालयास सादर केला आहे.

२.१२ **यशवंतराव चव्हाणांचे पोस्टल तिकिट वितरण** :- यशवंतराव चव्हाण व भाऊसाहेब हिरे यांचे स्मृतिप्रीत्यर्थ केंद्र शासनाने प्रत्येकी रु. ५ चे पोस्टाचे तिकीट काढले आहे. त्या तिकीट वितरणाचा पुण्यातील कार्यक्रम दि. २३.१२.२०१० रोजी विशाल सहयाद्री सभागृहात आयोजिला होता. सदर कार्यक्रम पोस्टल अधिका-यांचे अध्यक्षतेखाली झाला. कार्यक्रमास महापौर पुणे, श्री. मोहनसिंग राजपाल, आबा बागूल, वंदना चव्हाण, श्री. जयराम देसाई, श्री. भिडे, पंडित व अन्य अनेक पोस्टाचे अधिकारी व अनेक कार्यकर्ते हजर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक म्हाडा पुणेचे अध्यक्ष श्री. अंकुशराव काकडे यांनी कले. सूत्रसंचालन श्री. देसाई यांनी केले. आभार प्रदर्शन पोस्टल अधिका-यांनी केले.

## ९.२ महाराष्ट्र महिला व्यासपीठ :-

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने महिलांची शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, कार्यक्रम योजनांच्या माध्यमातून कृतिशील प्रयत्न केले जातात. संयोजिका श्रीमती रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका श्रीमती ममता रमेशचंद्र कानडे महाराष्ट्र महिला व्यासपीठाचा कारभार सांभाळत असतात. त्यांना महाराष्ट्र महिला व्यासपीठाची कार्यकर्ती श्रीमती शोभा लोंढे हिचे सहकार्य असते.

२.१ महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि कॉलेज ऑफ होम सायन्स, निर्मला निकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'गृहव्यवस्थापन प्रशिक्षण' कार्यशाळा बॅच क्रमांक तीन व महाराष्ट्र महिला व्यासपीठ, नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि महाराष्ट्र सोसायटी वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण' कार्यशाळा बॅच क्रमांक दोन यांचे 'प्रमाणपत्र वितरण' कार्यक्रम गुरुवार दिनांक ३० सप्टेंबर २०१० रोजी सकाळी १०.३० वाजता चव्हाण सेंटर येथील चौथा मजला, सांस्कृतिक हॉलमध्ये झाला. या कार्यक्रमांत प्रमुख पाहुणे सौ. सुप्रिया सुळे यांचे स्वागत श्रीमती ममता कानडे व श्री. रमेश प्रभु यांनी केले. या कार्यक्रमांत कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतन यांच्या प्रतिनिधी डॉ. विशाखा उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्या सौ. सुप्रियाताई सुळे यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रशिक्षणार्थी श्रीमती प्राची लहानकर, श्रीमती भारती शार्दळ, श्री. सदानंद सावंत, श्रीमती मंदाकिनी पवार इत्यादींनी मनोगत व्यक्त केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा. श्री. शरद काळे यांनी मार्गदर्शन केले. प्रमाणपत्र वितरण मा. सौ. सुप्रिया सुळे / मा. श्री. शरद काळे / डॉ. सुधीर गोएल इत्यादींच्या हस्ते करण्यात आले.

२.२ सोमवार ते शुक्रवार दिनांक २७ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर २०१० या कालावधीत दुपारी २.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत 'इंग्रजी संभाषण कला' प्रशिक्षण या विषयाची कार्यशाळा चव्हाण सेंटर येथील बेसमेंट हॉलमध्ये सुरु केली. अत्यंत कमी फीमध्ये ही कार्यशाळा घेण्यात आली.

२.३ दिनांक १२.११.२०१० रोजी दुपारी ३.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत काळाचौकी, कॉटनग्रीन येथील महानगरपालिका शाळेत बचत गटातील महिलांकरिता स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात अंदाजे ५० महिलांनी सहभाग घेतला. हा कार्यक्रम श्रीमती मंदाकिनी पवार यांच्या सहभागाने झाला. श्रीमती ममता कानडे यांनी कार्यक्रमांचे प्रास्ताविक केले. श्रीमती रेखा नार्वेकर यांनी महिलांना सक्षम बनून संसारात आर्थिक सहभाग देण्याबाबत मार्गदर्शन केले. श्रीमती मधुरा देसाई यांनी बचत गटातील महिलांना बँकेतून कशाप्रकारे कर्ज मिळू शकते. तसेच मुंबई सहकारी बोर्ड लि., मुंबईच्या कार्यासंदर्भात माहिती दिली. सौ. दिप्ती पटेल यांनी महिलांना अगरबत्ती, चॉकलेट व फिनेल इत्यादी वस्तू घर बसल्या बनवून विकणे, याबाबत मार्गदर्शन केले व महिलांकडून वरील साहित्य बनवून घेतले.

२.४ दिनांक २४.११.२०१० रोजी दुपारी ३.०० ते ६.०० सायंकाळी वाजेपर्यंत वरळी बी.डी.डी. चाळीतील बचत गटातील महिलांकरिता स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात अंदाजे ४० महिला सहभागी होत्या. हा कार्यक्रम श्रीमती नेत्रा नागेश यांच्या सहभागातून घेण्यात आला. श्रीमती ममता कानडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. श्रीमती मधुरा देसाई यांनी बचत गटातील महिलांना बँकेतून कशाप्रकारे कर्ज मिळू शकते. तसेच मुंबई सहकारी बोर्ड लि., मुंबईच्या कार्यासंदर्भात माहिती दिली. श्रीमती शोभा लोंढे यांनी महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे सुरु केलेल्या विविध प्रशिक्षणाची संदर्भात माहिती दिली. श्रीमती नेत्रा नागेश यांनी सर्वांचे स्वागत केले. सौ. दिप्ती पटेल यांनी महिलांना सरबते, लिक्विड सोप व साबण पावडर इत्यादी वस्तू घर बसल्या बनवून विकणे याबाबत मार्गदर्शन केले व महिलांकडून सदर साहित्य बनवून घेतले. सर्वांनी राष्ट्रगीत म्हणून कार्यक्रमाची सांगता केली.

२.५ दिनांक २९.११.२०१० रोजी दुपारी ३.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत लोअर परेल (लालबाग) येथील बचत गटातील महिलांकरिता स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमात अंदाजे ६० महिला सहभागी

होत्या. श्रीमती ममता कानडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तसेच महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे सुरु केलेल्या कोर्स संदर्भात माहिती दिली. श्रीमती रशिदा अमीर व श्री. सुधाकर पवार यांनी गॅसची व स्वत:ची सुरक्षा याबाबत मार्गदर्शन केले. व्यासपीठाच्या कार्यकर्त्यांनी महिलांना त्याविषयी प्रश्न केले. प्रश्नांची उत्तरे ज्या महिलांनी बरोबर दिली त्यांना बक्षिस देण्यात आली. महिलांना चॉकलेट, परफ्युम (अत्तरे) व फिनेल इत्यादी वस्तू घर बसल्या बनवून विकणे याबाबत मार्गदर्शन केले व महिलांकडून बनवून घेतले. तसेच बचत गट स्थापन करुन महिलांनी व्यवसाय करण्याबाबत माहिती दिली. त्याचप्रमाणे बचत गटातील महिलांना बँकेतून कशाप्रकारे कर्ज मिळू शकते याबाबत मार्गदर्शन केले.

२.६ दिनांक १०.१.२०११ रोजी नवमहाराष्ट्र युवा अभियान, महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि महाराष्ट्र सोसायटी वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा' तिसरी बॅच सुरु झाली. ही कार्यशाळा दुपारी २.३० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत सोमवार, बुधवार व शुक्रवार असे तीन दिवस तीन महिन्यांची कार्यशाळा घेण्यात आली.

२.७ दि. ८.३.२०११ रोजी दुपारी २.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि कुमुद विद्यामंदिर, देवनार यांच्या संयुक्त विद्यमाने कुमुद विद्यामंदिर, देवनार, गोवंडी (पूर्व) येथे महिला जाणीव जागृतीचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमात सहभाग पालक महिला व सदिच्छा महिला बचत गटातील महिला व इतर अंदाजे एकूण २०० महिलांचा सहभाग होता. शाळेतील किशोरवयीन मुलींनी स्वागत गीत व 'स्त्री मुक्तीची ही ललकारी भिडते गगनाला' असे गीत गायले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यासपीठाच्या संयोजिका होत्या. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रीमती हेमा परंडवाल यांनी केले. प्रत्यक्ष कृतीमध्ये महिलांकडून मेणबत्त्या बनवून घेतल्या. श्रीमती मीनाताई पाटील यांनी जागतिक महिला दिनाचे महत्व पटवून दिले. महिलांनी स्वत:चा विकास करण्याबाबत महत्वाच्या ब-याच उदाहरणांसहीत मार्गदर्शन केले. श्रीमती लता बोंगिरवार यांनी महिला दिन कार्यक्रमातील महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. श्रीमती वीणा यार्दी यांनी महिलांनी स्वत:च्या गरजा व आरोग्य याबाबत लक्ष देण्यात यावे. समाजातील लहान मुले, स्त्री-पुरुष, वृध्द या सर्व घटकांचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी दैनंदिन आहाराचे महत्व ओळखणे खूप महत्वाचे आहे. कोणत्या वयात कोणते आहार घ्यावेत याबाबत मार्गदर्शन केले.

२.८ मंगळवार दिनांक २९ मार्च २०१० रोजी कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतन येथे सकाळी ९.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबीर घेण्यात आले होते. अंदाजे ६५ महिलांची रक्त व इतर तपासणी करण्यात आली.

२.९ महाराष्ट्र महिला व्यासपीठ हे समाजातील विविध घटकांसाठी वेगवेगळे कार्यक्रम नेहमीच घेत असतात. स्त्री व पुरुषांची सामाजिक उन्नती व त्यांच्या आरोग्याची काळजी हे विशेष करुन जपले जाते. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक २९ मार्च २०११ रोजी कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतन येथे आरोग्य शिबीर घेण्यात आले. त्या शिबीरामध्ये एकूण ६० महिला सहभागी झाल्या होत्या.

## ९.३ नवमहाराष्ट्र युवा अभियान :-

३.१ **पुणे - त्रैमासिक आढावा बैठक :-** दि. ८ एप्रिल, २०१० रोजी नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या निमंत्रक सौ. सुप्रिया सुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत त्रैमासिक आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी अभियानाच्या नवीन पदाधिका-यांची

नियुक्ती, युवा धोरण व शासकीय समितीच्या कार्याची वाटचाल, गतवर्षातील उपक्रम, आगामी उपक्रम याविषयी चर्चा करण्यात आली. या बैठकीसाठी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे पदाधिकारी उपस्थित होते.

३.२ **मुंबई - युवा धोरण : शासकीय समितीची पहिली बैठक :-** दि. ३० एप्रिल २०१० रोजी महाराष्ट्र राज्य युवा धोरण शासकीय समितीची पहिली बैठक संपन्न झाली. राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. अशोकराव चव्हाण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री मा. ना. डॉ. सुरेश शेट्टी, क्रीडा व शालेय शिक्षण विभागाचे सचिव डॉ. संजीवकुमार, संचालक श्री. वसंतराव वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती. नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे श्री. विश्वास ठाकूर, श्री. दत्ता बाळसराफ, श्री. निलेश राऊत, श्री. निलेश पुराडकर यांनी सूचना मांडल्या. शासनातर्फे तयार करण्यात आलेल्या टिप्पणीमध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियानाचा विशेष उल्लेख करण्यात आला.

३.३ **औरंगाबाद - पुणे - मराठवाडा ते पश्चिम महाराष्ट्र युवा अभिसरण मोहीम :-** दि. ९ ते १७ मे २०१० दरम्यान युवा अभिसरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सातारा, सांगली या पाच जिल्हयांमध्ये त्या ठिकाणचे सांस्कृतिक, राजकीय, साहित्यिक, धार्मिक, ऐतिहासिक, भौगोलिक, औद्योगिक वैविध्यांची ओळख होण्यासाठी तसेच त्या विभागामधील युवांसोबत संवाद होण्यासाठी व पश्चिम महाराष्ट्राचा विकास ज्या कारणांमुळे झाला, त्या बाबींचा अभ्यास करण्याकरिता या अभिसरण मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. मोहिमे दरम्यान पत्रकार श्री. दिलीप वाघमारे, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ यांनी कार्यशाळेमध्ये युवांशी संवाद साधला. निमंत्रक सौ. सुप्रिया सुळे यांनी युवांचे अनुभव जाणून घेतले. कार्यक्रमात ५० युवा सहभागी होते.

३.४ **नाशिक - असाही एक महाराष्ट्र : छायाचित्र प्रदर्शन :-** नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे आयोजित 'असाही एक महाराष्ट्र' या श्री. संदेश भंडारे यांच्या छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन नाशिक येथे प्रसिध्द लेखक मा. दिनानाथ मनोहर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी नाशिक केंद्राचे पदाधिकारी श्री. गुरुमित बग्गा, श्री. विनायक रानडे, श्री. शिवाजी तुपे, श्रीमती मुक्ता बालिगा आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमात ५०० युवकांचा सहभाग होता.

३.५ **कोल्हापूर - व्हिजन करिअर फेअर :-** नवमहाराष्ट्र युवा अभियान व ना. हसन मुश्रीफ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूर शहरात दि. २१ ते २३ मे दरम्यान ए टू झेड व्हिजन करिअर फेअर व करिअर व्याख्यानमाला २०१० चे आयोजन करण्यात आले होते. सासने ग्राऊंड, न्यू शाहूपुरी येथे झालेल्या या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार दि. २१ मे रोजी सायंकाळी राष्ट्रवादी काँगेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा. श्री. मधुकरराव पिचड यांच्या हस्ते झाले. प्रदर्शनाचे स्वागताध्यक्ष कामगार मंत्री ना. श्री. हसन मुश्रीफ होते. उद्घाटन कार्यक्रमासाठी प्रसिध्द मराठी अभिनेता श्री. अंकुश चौधरी, आमदार श्री. उदय सामंत, आमदार श्री. के. पी. पाटील, श्री. संभाजीराजे छत्रपती, युवा नेते श्री. महेश तपासे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष श्री. धैर्यशील माने, जिल्हा परिषद सदस्य संग्रामसिंह कुपेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात १२००० युवक सहभागी होते.

३.६ **चिपळूण - व्हिजन करिअर फेअर :-** नवमहाराष्ट्र युवा अभियान व प्रेरणा प्रतिष्ठान, चिपळूण यांच्या संयुक्त विद्यमाने चिपळूण येथे दि. २४ ते २६ मे २०१० दरम्यान व्हिजन करिअर फेअर व व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. व्हिजन करिअर फेअरचे उद्घाटन कीडा व युवक कल्याण राज्यमंत्री मा. ना. भास्कर जाधव यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विजय मेहता होते. यावेळी प्रसिध्द निवेदक श्री. सुधीर

गाडगीळ, माजी आमदार श्री. नाना जोशी, माजी आमदार श्री. रमेश कदम, श्रीमती युगंधरा राजेशिर्के, श्री. शेखर निकम, नगराध्यक्ष श्री. अजमल पटेल, बदलापूरचे उपनगराध्यक्ष श्री. श्रीधर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात १०००० युवांचा सहभाग होता.

३.७ **बदलापूर - व्हिजन करिअर फेअर** :- नवमहाराष्ट्र युवा अभियान व ज्ञानप्रभा शिक्षण मंडळ, ग्रंथसखा वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने बदलापूर येथे दि. ११ ते १३ जून, २०१० दरम्यान व्हिजन करिअर फेअर व व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार श्री. किसन कथोरे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून सिनेअभिनेता श्री. सुबोध भावे, नाटय व सिनेदिग्दर्शक श्री. चंद्रकांत कुलकर्णी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात १५००० युवांचा सहभाग होता.

३.८ **औरंगाबाद - असाही एक महाराष्ट्र : छायाचित्र प्रदर्शन** :- शुक्रवार ते रविवार दि. १८ ते २० जून २०१० या दरम्यान मुंबई - विभागीय केंद्र, औरंगाबाद व मराठवाडा साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने प्रसिध्द छायाचित्रकार श्री. संदेश भंडारे यांचे असाही एक महाराष्ट्र या छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद येथे करण्यात आले होते. उद्‌घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विजय वाघमारे यांच्या हस्ते फित कापून झाले. यावेळी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक श्री. रा. रं. बोराडे होते. मंचावर प्रा. जयदेव डोळे, श्री. नंदकिशोर कागलीवाल, श्री. सचिन मुळे, श्री. सुहास तेंडुलकर, श्री. पुंडलिक अतकरे यांची उपस्थिती होती. तिन्ही दिवस प्रदर्शनाला औरंगाबादवासीयांनी उत्स्फूर्त भेट देऊन दाद दिली. कार्यक्रमात ५०० युवकांचा सहभाग होता.

३.९ **सांगली - व्हिजन करिअर फेअर** :- नवमहाराष्ट्र युवा अभियान, सांगली - मिरज - कुपवाड महानगरपालिका व रिसोर्सेस या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सांगली येथे दि. १८ ते २० जून २०१० दरम्यान व्हिजन करिअर फेअर व व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. व्हिजन करिअर फेअरचे उद्‌घाटन सिनेअभिनेत्री श्रीमती माधवी कुलकर्णी, श्री. श्रीनिवास पाटील, श्री. सुरेश आवटी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमात १५,००० युवक सहभागी झाले होते

३.१० **ठाणे - व्हिजन करिअर फेअर** :- नवमहाराष्ट्र युवा अभियान व समन्वय रोजगार सेल यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ ते ३० जून २०१० दरम्यान ठाणे येथे व्हिजन करिअर फेअर व करिअर व्याख्यानमाला २०१० चे आयोजन करण्यात आलेले होते. या व्हिजनचे उद्‌घाटन मा. खा. संजीव नाईक यांच्या हस्ते झाले. उद्‌घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विधान परिषदेचे उपसभापती मा. श्री. वसंत डावखरे होते. प्रसिध्द मराठी अभिनेते श्री. मकरंद अनासपुरे, मा. आ. सुभाष भोईर, श्री. जितेंद्र जोशी प्रमुख अतिथी होते. माजी महापौर श्री. अशोक राऊळ व समन्वय रोजगार सेलचे श्री. निरंजन डावखरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात १०००० युवकांचा सहभाग होता.

३.११ **सोलापूर - युवा धोरण परिषद** :- नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दि. ३० जून २०१० रोजी सोलापूर येथे युवा धोरण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेचे उद्‌घाटन विभागीय समन्वयक श्री. महेश गादेकर यांनी केले. यावेळी श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. प्रशांत जोशी, श्री. दिनेश शिंदे, डॉ. अमित नागरे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षणाचा दर्जा, पर्यावरण, युवांमधील वाढती गुन्हेगारी, शिक्षणातील त्रुटी, युवांचा सामाजिक-राजकीय क्षेत्रातील सहभाग, युवतींचे सक्षमीकरण अशा विविध विषयांवर युवांनी परिषदेमध्ये ठाम मते मांडली. कार्यक्रमास १२०० युवा उपस्थित होते.

३.१२ **औरंगाबाद अभिसरण नियोजन मराठवाडा स्तरीय बैठक** :- नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे आयोजित आगामी अभिसरण मोहिमेच्या नियोजनासाठी रविवार दि. ११ जुलै २०१० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय, औरंगाबाद येथे मराठवाडा विभागीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे पदाधिकारी उपस्थित होते.

३.१३ **पुणे - त्रैमासिक आढावा बैठक** :- नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे सोमवार दि. १२ जुलै २०१० रोजी अभियानाच्या निमंत्रक मा. सौ. सुप्रिया सुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत त्रैमासिक आढावा बैठकीचे आयोजन निसर्ग कार्यालय, पुणे येथे करण्यात आले होते. बैठकीसाठी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक व इतर पदाधिकारी उपस्थित होते. बैठकी दरम्यान दि. ५ एप्रिल ते ४ जुलै २०१० या दरम्यान नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन करण्यात आले.

३.१४ **मुंबई - सहयोगी संस्थांची बैठक** :- दि. १३ जुलै रोजी राज्य युवा धोरणातील सहयोगी संस्थांची बैठक यशवंतराव चव्हाण केंद्रामध्ये आयोजित करण्यात आली. युवा धोरणाच्या अंमलबजावणी संदर्भात युवांचा दबाव गट तयार करणे, चर्चासत्र घडवून आणणे, महाविद्यालयीन व विद्यापीठ संसद निवडणुकीसंदर्भात लिंगडोह समितीच्या शिफारशी इंग्रजी, मराठी, हिंदी भाषेतून इंटरनेटद्वारे खुल्या करणे, संयुक्त विद्यमाने उपक्रम राबविणे आदी मुद्दयांवर चर्चा करण्यात आली.

३.१५ **नाशिक - पर्यावरण शिक्षण शिबिर** :- नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दि. २३ ते २५ जुलै २०१० दरम्यान नाशिक विभागीय केंद्राच्या सभागृहात तीन दिवसीय निवासी पर्यावरण शिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या कार्यकर्त्यांमध्ये पर्यावरणविषयक जाणीव जागृती व्हावी, पर्यावरण संवर्धन कार्यामध्ये युवांचा सहभाग वाढावा हा या शिबिराचा उद्देश होता. शिबिराचे उद्‌घाटन नाशिक विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर यांच्या हस्ते झाले. यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, संघटक श्री. निलेश राऊत तसेच शिबिरामध्ये मार्गदर्शन करण्यासाठी पर्यावरण तज्ज्ञ श्री. पार्थ व श्रीमती दिप्ती बापट उपस्थित होते. शिबिराचा समारोप यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे सरचिटणीस मा. श्री. श. गं. काळे यांच्या हस्ते करण्यात आला. शिबिरामध्ये ३५ युवांनी सहभाग घेतला.

३.१६ **मुंबई संघटनात्मक फेरबदल** :- नवमहाराष्ट्र युवा अभियानांतर्गत अलीकडेच संघटनात्मक फेरबदल करण्यात आले. यानुसार श्रीमती वैशाली मोटे (सहसमन्वयक), श्री. विजय कसबे, श्री. नितीन काळेल, श्री. दिनेश शिंदे, श्री. शिवाजी गावंडे, श्री. सचिन जाधव, श्री. सुबोध जाधव (सर्व राज्य समन्वयक), डॉ. अमित डोंगरे, श्री. उमाकांत जगदाळे, श्री. निलेश पुराडकर, श्रीमती मिनल जगदाळे (राज्य सहसंघटक) यांची नियुक्ति करण्यात आली.

३.१७ **युवा स्वातंत्र्यज्योत रॅली** :- नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे मागील चार वर्षांपासून स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन करण्यात येते. युवांमध्ये स्वातंत्र्याविषयी जाणीव अधिक दृढ व्हावी हे उद्दिष्ट समोर ठेऊन या वर्षी एकूण बारा शहरांमध्ये एकाच वेळी युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे दि. १४ ऑगस्ट २०१० रोजी आयोजन करण्यात आले होते.

३.१८ **मुंबई** : रॅलीचे उद्‌घाटन आमदार श्री. भाई जगताप यांच्या हस्ते झाले. पोर्तुगीज चर्च येथील प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन त्यांनी रॅलीला संबोधित केले. सेनापती बापट पुतळा, शिवाजी महाराज पुतळा (शिवाजी पार्क),

स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक येथे त्या थोर विभूतीना अभिवादन करुन चैत्यभूमी येथे भारतीय घटनेच्या सरनाम्याचे सामूहिक वाचन करुन रॅलीचा समारोप झाला.

३.१९ **नवी मुंबई :** नवी मुंबई येथे विभागीय सहसंघटक श्री. नितीन काळेल, श्री. उमेश खाडे, शहर संघटक श्री. राहुल पवार यांनी युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन केले. यावेळी सौ. कुसूम बाळसराफ, श्री. सुरेश सावंत यांनी उपस्थित युवांना मार्गदर्शन केले. यावेळी रॅलीला नवी मुंबईतील युवांची मोठी उपस्थिती होती.

३.२० **नागपूर :** स्वातंत्र्य पुतळा, गांधी स्मारक तलाव येथे रॅलीचे उद्‌घाटन करण्यात आले. स्मारकास पुष्प अर्पण करुन स्वातंत्र्य सैनिकांच्या हस्ते ज्योत पेटविण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले. श्री. सलील देशमुख, श्री. अभिजीत राऊत,श्री. शैलेश माणिककुवर, श्री. गिरीश महाजन यांनी परिश्रम घेतले.

३.२१ **औरंगाबाद :** क्रांती चौक येथे रात्री ११ वाजता सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. संदीप भाजीभाकरे यांच्या हस्ते मशाल पेटवून या रॅलीची सुरुवात झाली. यावेळी नगरसेवक श्री. समीर राजूरकर, नगरसेवक श्री. विजेंद्र जाधव, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक श्री. निलेश राऊत, विभागीय समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. रॅलीमध्ये विविध संस्था-संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक, युवा व विद्यार्थी मोठया संख्येने सहभागी झाले होते.

**लातूर :-** लातूर येथे विभागीय समन्वयिका श्रीमती आशा भिसे, जिल्हा संघटक प्रा. सचिन सूर्यवंशी, विभागीय सहसंघटक श्री. निशांत वाघमारे यांनी युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन केले होते. या रॅलीला लातूर शहरातील युवांचा मोठा प्रतिसाद लाभला.

**नाशिक :-** 'महाराष्ट्रातील प्रसारमाध्यमे व प्रसारमाध्यमांतील महाराष्ट्र' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. आयबीएन लोकमतच्या ब्युरो चीफ श्रीमती दिप्ती राऊत यांनी मार्गदर्शन केले. एचपीटी महाविद्यालयात आयोजित परिसंवादाला विभाग प्रमुख प्रा. वृंदा भार्गव, श्रीमती दिपाली मानकर यांची उपस्थिती होती.

**उस्मानाबाद :-** महिला मंडळाच्या मैदानापासून रॅलीची सुरुवात झाली. यावेळी स्वातंत्र्यसैनिक श्री. शिवाजी पडवळ, ॲड. विवेक घोगरे यांची उपस्थिती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, शिवाजी महाराज पुतळा, पालिकामार्गे तुळजाभवानी स्टेडियमवर फेरीचे विसर्जन करण्यात आले.

**सोलापूर :-** सोलापूर येथे विभागीय समन्वयक श्री. महेश गादेकर, विभागीय संघटक श्री. दिनेश शिंदे, सहसंघटक श्री. सागर चव्हाण, प्रा. निशा वाघमारे, जिल्हा संघटक श्री. प्रविण वानखेडे यांनी युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन केले. यावेळी सोलापूर शहरातील युवांनी रॅलीमध्ये मोठया संख्येने सहभाग नोंदविला.

**चिपळूण (जिल्हा रत्नागिरी) :-** चिपळूणमध्ये विभागीय संघटक श्री. अभिजीत खानविलकर, जिल्हा संघटक श्री. सिध्देश लाड यांनी युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन केले. रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

**लांजा (जिल्हा रत्नागिरी) :-** लांजामध्ये श्री. अभिजीत राजेशिर्के व सहका-यांनी युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन केले. युवांनी मोठया संख्येने सहभाग नोंदविला.

**यवतमाळ** :- आझाद मैदान, शहीद स्मारकापासून रॅलीला सुरुवात झाली. रॅली सुरु होण्यापूर्वी श्री. महेश पवार यांनी भूमिका स्पष्ट केली. 'वंदे मातरम, इन्कलाब जिन्दाबाद, भारत माता की जय' अशा घोषणा देत मशाल बस स्टॅन्ड चौकात आली. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाचे पूजन करण्यात आले आणि भारतीय संविधानाच्या सरनाम्याचे सामूहिक वाचन करण्यात येऊन रॅलीचा समारोप झाला.

**अहमदनगर** :- प्रेमदान चौक ते प्रोफेसर कॉलनी चौक या मार्गावर रॅलीचे आयोजन करण्यात आले. जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. श्रीकृष्ण प्रकाश, श्री. पंकज शिरसाठ, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अजय पवार आदींची उपस्थिती होती. रॅलीमध्ये स्वातंत्र्य सैनिक, युवा व नागरिकांनी सहभाग नोंदविला.

**बदलापूर (जि. ठाणे)** :- बदलापूर शहरात श्री. अनिल चाळके व सहका-यांनी युवा स्वातंत्र्यज्योत रॅली आयोजित केली होती. युवांनी मोठया संख्येने यात सहभाग नोंदविला.

**बदलापूर (जिल्हा ठाणे) - युवती महोत्सव** :- नवमहाराष्ट्र युवा अभियान, कोरो - मुंबई व आदर्श महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ व २८ ऑगस्ट २०१० दरम्यान बदलापूर येथे युवती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्‌घाटन सारेगमप फेम गायिका श्रीमती उर्मीला धनगर व महोत्सवाच्या स्वागताध्यक्षा श्रीमती स्वप्ना पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक श्री. नीलेश राऊत, राज्य सहसंघटक श्रीमती मीनल जगदाळे, राज्य विशेष निमंत्रित श्रीमती सुषमा खिल्लारे यांची उपस्थिती होती. यावेळी विविध खेळांचे व व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे १३ ते ३५ वयोगटातील किशोरी व युवतींमध्ये शिक्षण, उच्चशिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार विकासाच्या अनुषंगाने तसेच त्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्याच्या जागृतीबाबत युवती महोत्सवांचे आयोजन करण्यात येत आहे. कार्यक्रमात ७०० युवतींनी सहभाग नोंदविला.

**औरंगाबाद - नाशिक - युनिकोड वर्कशॉप** :- दि. २७ ऑगस्ट रोजी औरंगाबाद व २८ ऑगस्ट रोजी नाशिक येथे युनिकोड कार्यशाळा संपन्न झाली. मराठी अभ्यास केंद्र, ठाणे येथील प्रा. दीपक पवार, प्रा. राममोहन खानापूरकर, प्रा. नितीन निमकर यांनी युनिकोड प्रणालीची माहिती दिली. मराठी भाषेचा माहिती व तंत्रज्ञानात वापर झाल्याने ज्ञानभाषेचे स्वरुप प्राप्त होईल असा विश्वास मान्यवरांकडून व्यक्त करण्यात आला. पीपीटीद्वारे युनिकोड प्रणालीची गरज, स्वरुप, वैशिष्टये, फायदे, वापर यांचे सादरीकरण करण्यात आले. दोन्हीही ठिकाणी कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

**औरंगाबाद - युवती महोत्सव** :- विभागीय केंद्र औरंगाबादतर्फे जेएनईसी महाविद्यालय, एम.जी.एम. परिसर, औरंगाबाद येथे सोमवार व मंगळवार दि. ४ व ५ ऑक्टोबर २०१० दरम्यान युवती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सोमवार दि. ४ ऑक्टोबर २०१० रोजी आर्यभट्ट हॉलमध्ये आयोजित युवती महोत्सवाचे उद्‌घाटन शालेय शिक्षण राज्यमंत्री मा. ना. फौजीया खान यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार व विचारवंत डॉ. बापुसाहेब काळदाते होते. मंचावर श्री. मधुकरअण्णा मुळे, श्री. अंकुशराव कदम, प्राचार्य प्रताप बोराडे यांची उपस्थिती होती. महोत्सवात विविध विषयांवर परिसंवाद व मुलाखतींचे आयोजन करण्यात आले. विविध खेळांचे स्टॉल्सही उभारण्यात आले होते. कार्यक्रमात २००० युवतीनी सहभाग घेतला.

**पुणे - त्रैमासिक आढावा बैठक** :- नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दि. २१ ऑक्टोबर २०१० रोजी अभियानाच्या निमंत्रक मा. सौ. सुप्रिया सुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत त्रैमासिक आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत दि. ५ जुलै ते २० ऑक्टोबर २०१० दरम्यान आयोजित व आगामी उपक्रमांसंबंधी चर्चा करण्यात आली.

**नसरापूर (ता. भोर, जिल्हा पुणे) - मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबीर** :- नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि साधू वासवाणी मिशन, पुणे संचालित के. के आय. हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ ऑक्टोबर २०१० रोजी नसरापूर, तालुका भोर, जिल्हा पुणे येथे मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये एकूण १३५ रुग्णांची तपासणी करण्यात आली आणि २४ रुग्णांवर मोतिबिंदूची मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली.

**कोकण ते मराठवाडा युवा अभिसरण मोहीम** :- नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे आयोजित युवा अभिसरण मोहिमेच्या दुस-या टप्प्यांतर्गत दि. १० ते १८ नोव्हेंबर २०१० दरम्यान कोकण ते मराठवाडा असे आयोजन करण्यात आले. मोहिमे दरम्यान पनवेलचे तहसिलदार डॉ. संदीप माने, पर्यावरण तज्ज्ञ श्री. सत्यजीत चव्हाण, साहित्यिक प्राचार्य रा. रं. बोराडे, लेखक प्रा. प्रल्हाद लुलेकर, प्राचार्य प्रदीप जब्दे यांनी कार्यशाळांमधून मराठवाडयातील युवांशी संवाद साधला. कोकणातील नैसर्गिक समृध्दी व वैविध्य पाहून आणि कोकणी माणसाच्या साध्या जीवनशैलीमुळे मराठवाडयातील युवा भारावून गेले. कार्यक्रमात ५० युवा सहभागी होते.

**नागपूर - युवा धोरणाचा मसुदा सादर** :- नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या शिष्टमंडळाने हिवाळी अधिवेशनाच्या दरम्यान राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री मा. ना. पद्माकर वळवी यांना दि. ८ डिसेंबर २०१० रोजी युवा धोरण जाहीर करण्यासंदर्भात निवेदन सादर केले. या प्रसंगी ना. वळवी यांनी राज्याचे युवा धोरण लवकरच जाहीर करु आणि नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे सादर केलेल्या मसुद्यातील मुद्यांचा अंतर्भाव या मसुद्यात करण्यात येईल असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले. यावेळी शिष्टमंडळामध्ये श्री. निरंजन डावखरे, श्री. विजय कान्हेकर, श्री. नीलेश राऊत, श्री. अभिजीत राऊत, श्री. सुबोध जाधव, श्री. शैलेश माणिककुवर, श्री. गिरीश महाजन यांचा समावेश होता.

**मुंबई - राज्यस्तरीय युवा पुरस्कारांची घोषणा** :- यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा, क्रीडा व विशेष युवा क्रीडा पुरस्कारांची घोषणा दि. १५ डिसेंबर २०१० रोजी करण्यात आली. सन २०१० वर्षाकरिता यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार (युवक) श्री. महेश पवार - यवतमाळ, (युवती) ॲड. पल्लवी रेणके - सोलापूर, यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय क्रीडा पुरस्कार (युवक) श्री. रणजीत पवार - औरंगाबाद (जिम्नॅस्टिक), (युवती) श्रीमती तारामती मतिवाडे - कोल्हापूर (यॉटिंग), यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय विशेष युवा क्रीडा पुरस्कार श्रीमती कविता राऊत - नाशिक (ॲथलेटिक्स) यांना जाहीर करण्यात आला.

**पिरंगुट (ता. मुळशी, जिल्हा पुणे) - मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबीर** :- नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि साधू वासवाणी मिशन, पुणे संचालित के. के. आय. हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ डिसेंबर २०१० रोजी पिरंगुट, तालुका मुळशी, जिल्हा पुणे येथे मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये एकूण ७९ रुग्णांची तपासणी करण्यात आली आणि २२ रुग्णांवर मोतिबिंदूची मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली.

**मुंबई - नवमहाराष्ट्र दिवाळी अंक पारितोषिक :-** नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त नवमहाराष्ट्र दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेमध्ये उद्याचा मराठवाडा - प्रथम पारितोषिक (रु. ५,०००/-), परिवर्तनाचा वाटसरु - द्वितीय पारितोषिक (रु. ४,०००/-), कृष्णाकांठ - तृतीय पारितोषिक (रु. ३,०००/-) या दिवाळी अंकांना मिळाले. स्पर्धेमध्ये ४० अंकानी सहभाग घेतला.

**मुंबई - यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा :-** नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे यशवंतराव चव्हाण नियतकालिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन व नियतकालिक स्पर्धेमध्ये (रामनारायण रुईया महाविद्यालय, मुंबई) - प्रथम पारितोषिक (रु. ३,०००/-), शिवविजय (छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा) - द्वितीय पारितोषिक (रु. २,०००/-), प्रेरणा (नूतन महाविद्यालय, सेलू) - तृतीय पारितोषिक (रु. १,५००/-) या नियमकालिकांना जाहीर करण्यात आले. या स्पर्धेत १०० महाविद्यालयांनी भाग घेतला.

**मुंबई - पिनॅकल क्लबसोबत संयुक्त उपक्रम :-** नवमहाराष्ट्र युवा अभियान व पिनॅकल क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने डिसेंबर महिन्यामध्ये काही गिर्यारोहण उपक्रम व स्पर्धा मुंबई जिल्हयातील विविध ठिकाणी राबविले जातात. सदर संस्थेसोबतचा हा उपक्रम मागील दहा वर्षापासून सुरु आहे. या उपक्रमाला साहसी व हौशी गिर्यारोहकांकडून चांगला प्रतिसाद मिळतो.

**यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार वितरण सोहळा :-** नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे राष्ट्रीय युवा दिनी म्हणजेच दि. १२ जानेवारी २०११ रोजी शिवछत्रपती रंगभवन, सोलापूर येथे यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार वितरण सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी ज्येष्ठ नेते व माजी आमदार श्री. युनूस शेख, सोलापूरचे उपमहापौर श्री. विष्णू निकंबे, अभियानाचे संयोजक, विभागीय समन्वयक आदींची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आदरणीय यशवंतराव चव्हाण, राष्ट्रमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना मान्यवरांनी पुष्प अर्पण केले. विभागीय संघटक श्री. दिनेश शिंदे यांनी भूमिका विशद केली. संयोजक श्री. दत्ता बाळसराफ हे प्रास्ताविक करताना म्हणाले की, राज्यातील रचनात्मक कार्यामध्ये कार्यरत असलेल्या युवांना हेरणे आणि त्यांच्या संघर्षाच्या काळात त्यांना मदतीचा हात देणे, त्यांना प्रोत्साहन देणे हा हेतू असल्याने यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कारांचे वेगळेपण अधोरेखित होते. विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केलेल्या ज्येष्ठ व्यक्तींचा सत्कार होणे ही त्या सत्कारमूर्तीची गरज नसून ती समाजाकडून त्या व्यक्तिप्रति व्यक्त झालेली उतराईची भावना असते. अशा वेळी या पुरस्कारांचे त्या व्यक्तीपेक्षा समाजासाठी अधिक महत्त्व ठरते. म्हणूनच व्यक्तीच्या संघर्षाच्या, घडण्याच्या काळात म्हणजेच तरुणपणी पुरस्कारांची, मदतीची, प्रोत्साहनाची गरज ख-या अर्थाने त्या व्यक्तीसाठी अधिक असते. म्हणूनच असे युवा शोधून त्यांचा गौरव करण्याची प्रतिष्ठानची भूमिका आहे. राज्यातील प्रादेशिकतावादासह इतर समस्यांवर शाश्वत तोडगा काढायचा असेल तर युवांची भूमिका महत्त्वाची ठरले म्हणूनच युवाविषयक कार्यात नवमहाराष्ट्र युवा अभियानाने पुढाकार घेतला आहे असे त्यांनी स्पष्ट केले.

ॲड. पल्लवी रेणके व श्री. महेश पवार यांना सामाजिक क्षेत्रातील रचनात्मक कार्याकरिता यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय सामाजिक युवा पुरस्कार (प्रत्येकी अकरा हजार रुपये, मानपत्र व स्मृतिचिन्ह) आणि श्रीमती तारामती मतिवाडे व श्री. रणजीत पवार यांना अनुक्रमे यॉटिंग व जिम्नॅस्टिक क्रीडा प्रकारातील नेत्रदीपक कामगिरीकरिता यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा क्रीडा पुरस्कार (प्रत्येकी अकरा हजार रुपये, मानपत्र व स्मृतिचिन्ह) प्रदान करण्यात आला. पुरस्कार प्रदानापूर्वी

प्रत्येक पुरस्कारार्थीच्या मानपत्राचे वाचन करण्याऐवजी त्यांच्या कार्यावर आधारित माहितीपट दाखविण्यात आले. पुरस्कार स्वीकारल्यानंतर सर्वच पुरस्कारार्थींनी मनोगतं व्यक्त केली. यावेळी श्रीमती कविता राऊत यांचे प्रशिक्षक श्री. विजेंद्र सिंह यांचा विशेष सत्कार करण्यात आला. मनोगत व्यक्त करताना मा. सिंह म्हणाले की, महाराष्ट्रामध्ये मोठी गुणवत्ता आहे. या राज्यातील मुले जगात अव्वल स्थानी जाऊ शकतात. मात्र त्यांना योग्य वेळी हेरले पाहिजे. आभार प्रदर्शन श्री. नीलेश राऊत यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाला नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

**नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वेबसाईटचे उद्‌घाटन :-** दि. १२ जानेवारी २०११ रोजी शिवछत्रपती रंगभवन, सोलापूर येथे नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या www.navmaharashtra.org या वेबसाईटचे उद्‌घाटन माऊस क्लिक करुन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सदर वेबसाईट ही मराठीतील पहिले 'युथ पोर्टल' असून राज्यातील युवांना अभिव्यक्तीकरिता हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. याद्वारे नोकरी व शिक्षणविषयक संधींचीही माहिती युवांना होणार आहे. सोबतच नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या सर्वच उपक्रमांची माहिती, फोटो, व्हिडीओ, बातम्या उपलब्ध होणार आहेत. वेबसाईट तयार करणा-या आय-स्मार्ट टेक्नॉलॉजी, पुण्याचे श्री. कैलास निमसे, श्री. प्रदीप मुळे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच अभिसरण मोहिमेच्या गीताचेही प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या गीताचे गीतकार व संगीतकार मराठवाडयातील प्रसिध्द कवी श्री. वैभव देशमुख हे आहेत. श्री. चिंटू भोसले यांनी हे गीत गायले असून संगीत व्यवस्थापन श्री. विशाल खुराणा यांचे आहे.

**दिवाळी अंक व महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा पारितोषिक वितरण :-** दि. १२ जानेवारी २०११ रोजी शिवछत्रपती रंगभवन, सोलापूर येथे नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे २०१० साली आयोजित करण्यात आलेल्या दिवाळी अंक व महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धांचे पारितोषिक वितरण या सोहळयात करण्यात आले. नवमहाराष्ट्र दिवाळी अंक स्पर्धेमध्ये उद्याचा मराठवाडा - प्रथम पारितोषिक (पाच हजार रुपये व प्रमाणपत्र), परिवर्तनाचा वाटसरु - द्वितीय पारितोषिक (चार हजार रुपये व प्रमाणपत्र), कृष्णाकांठ - तृतीय पारितोषिक (तीन हजार रुपये व प्रमाणपत्र) या दिवाळी अंकांना प्रदान करण्यात आले. विजेत्या दिवाळी अंकांचे प्रतिनिधींनी पुरस्कार स्वीकारले.

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेमध्ये रामनारायण रुईया महाविद्यालय, मुंबईच्या रुईयाइट नियतकालिकाला प्रथम (रुपये तीन हजार व प्रमाणपत्र), छत्रपती शिवाजी कॉलेज, साताराच्या शिवविजय नियतकालिकाला द्वितीय (दोन हजार रुपये व प्रमाणपत्र), नूतन महाविद्यालय, सेलूच्या प्रेरणा नियतकालिकाला तृतीय (दीड हजार रुपये व प्रमाणपत्र) पारितोषिक प्रदान करण्यात आले. विजेत्या महाविद्यालयाच्या प्रतिनिधींनी पुरस्कार स्वीकारले.

**युवती महोत्सव, भूम, जिल्हा उस्मानाबाद :-** नवमहाराष्ट्र युवा अभियान व विश्वराज फाऊंडेशन, गिरवली यांच्या संयुक्त विद्यमाने युवती महोत्सव दि. १७ व १८ जानेवारी २०११ रोजी एस.पी. कॉलेज, भूम, जिल्हा उस्मानाबाद येथे आयोजन करण्यात आलेले होते. युवतींमध्ये शारीरिक व मानसिक आरोग्यासंदर्भात तसेच व्यक्तिमत्व विकासासंदर्भात जागरुकता व आत्मविश्वास निर्माण व्हावा हा या महोत्सवाचा उद्देश होता.

दि. १७ जानेवारी २०११ रोजी युवती महोत्सवाचे उद्‌घाटन भूम-परंडा मतदार संघाचे आमदार श्री. राहुल मोटे यांच्या

हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी मंचावर नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या राज्य सहसमन्वयक श्रीमती वैशाली मोटे, उस्मानाबादच्या पोलीस उपअधीक्षक श्रीमती दीपाली घाडगे, राज्य संघटक श्री. नीलेश राऊत व इतर पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

यावेळी प्रमुख अतिथींचा सत्कार करण्यात आला. श्रीमती वैशाली मोटे यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख अतिथी पोलीस उपअधीक्षक श्रीमती दीपाली घाडगे म्हणाल्या की, आजच्या युवतींमध्ये आत्मविश्वास हळूहळू निर्माण होत आहे. विविध क्षेत्रामध्ये विशेषतः पोलीस खात्यामध्येही युवती मोठया प्रमाणात रुजू होत आहेत. पोलीस खात्यामध्ये महिला पोलीसांची वाढत असलेली संख्या खात्याची प्रतिमा बदलण्यास सहायक ठरणार आहे. पोलीस खात्याला अधिक संवेदनशील बनविण्यामध्ये महिला पोलीस महत्वाची भूमिका बजावतील. भारत महासत्ता बनवण्याकडे वाटचाल करतो आहे. यात युवतींनीही आपापल्या परीने महत्वपूर्ण योगदान दिले पाहिजे. कारण युवांमध्ये जवळपास निम्मी लोकसंख्या युवतींची आहे.

अध्यक्षीय समारोप करताना आमदार श्री. राहुल मोटे म्हणाले की, युवती महोत्सवामध्ये अधिकाधिक युवतींनी सहभाग घ्यावा आणि स्वतःच्या स्वप्नांना सत्यात उतरविण्यासाठी मार्गदर्शन मिळवावे. आपल्याला नेमके काय करायचे आहे हे ठरवून वाटचाल करावी. युवतींनी सर्वच क्षेत्रात महत्वाची पदे भूषविली आहेत, भूषवित आहेत. लिंगभाव समानता येण्यासाठी युवतींनी एकजूट होऊन प्रयत्न केले पाहिजेत असे प्रतिपादन त्यांनी केले.

दुपारच्या सत्रामध्ये स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. मीना जिंतूरकर यांनी 'युवतींचे शारीरिक व मानसिक आरोग्य' या विषयावर युवतींशी संवाद साधला. व्याख्यानानंतर युवतींनी विचारलेल्या प्रश्नांना श्री. जिंतूरकर यांनी समर्पक उत्तरे दिली.

दि. १८ जानेवारी २०११ रोजी यशस्विनी अभियानाच्या राज्य समन्वयक श्रीमती अस्मिता पाटील यांनी यशोगाथा सत्रामध्ये युवतींशी संवाद साधला. समारोपाच्या सत्रात श्रीमती रेणुका कड यांनी युवतींशी संवाद साधला. दोन दिवसीय युवती महोत्सवामध्ये युवतींनी कोणकोणत्या खेळांमध्ये सहभाग नोंदविला, कोणते चित्रपट पाहिजे, एकंदरीत महोत्सवाविषयी युवतींना काय वाटले, याविषयी त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. बहुतांश युवतींनी ग्रामीण भागात संधी कमी मिळत असल्याचे आणि कुटुंबाकडून पुरेसे प्रोत्साहन मिळत नसल्याचे सांगितले.

युवती महोत्सवामध्ये दोन्हीही दिवस एक मिनिट गेम, सापशिडी, स्वयंवर, रुखवत, इंटरनेट, प्रजनन आरोग्य, व्यक्तिमत्व विकास, एच.बी. टेस्टिंग, संगीत खुर्ची, पोत्यांचा खेळ, पाच रुपयांमध्ये बँक अकाऊंट आदी खेळांचे स्टॉल्स उभारण्यात आले होते. या सर्व स्टॉल्सना युवतींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेषतः सापशिडी, स्वयंवर, संगीत खूर्ची व पोत्यांचा खेळ या स्टॉल्सवर युवतींनी गर्दी केली. मोठया प्रमाणावर युवतींनी एच.बी. लेव्हल तपासून घेतली. या स्टॉलवर एच.बी. लेव्हल कमी असणा-या युवतींना लोहयुक्त गोळयांचे मोफत वाटप करण्यात आले. तसेच पाच रुपयांमध्ये बँक अकाऊंट या स्टॉलवर बव्हंशी युवतींनी स्वतःच्या नांवे बँकेचे खाते काढून घेतले. या व्यतिरिक्त एका हॉलमध्ये युवती सक्षमीकरणासंदर्भात फिल्म दाखविण्यात आल्या. फिल्म्स दाखविल्यानंतर श्रीमती सुषमा खिल्लारे यांनी युवतींशी फिल्ममध्ये दाखविण्यात आलेल्या विषयावर संवाद साधला, मार्गदर्शन केले. युवतींनीही प्रश्नोत्तराद्वारे चर्चेमध्ये सहभाग नोंदविला. युवती सक्षमीकरणासाठी स्वतःपासून सुरुवात करण्याचा संकल्प व्यक्त करुन युवती महोत्सवाचा समारोप करण्यात आला.

**राज्य युवा धोरण शासकीय मसुदा राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. पृथ्वीराज चव्हाण यांना सादरः-** महाराष्ट्र राज्याच्या क्रीडा व युवा कल्याण विभागाच्या शासकीय मसुदा समितीच्यावतीने तयार करण्यात आलेल्या राज्याच्या युवा धोरणाचा अंतिम मसुदा शनिवार दि. ५ फेब्रुवारी २०११ रोजी राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. पृथ्वीराज चव्हाण यांना सादर करण्यात आला. यावेळी

नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या निमंत्रक मा. सौ. सुप्रिया सुळे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री मा. श्री. पद्‌माकर वळवी, आरोग्यमंत्री मा. डॉ. सुरेश शेट्टी, युवा धोरण उपसमितीचे अध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर, क्रिकेटपटू श्री. दिलीप वेंगसरकर, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, संघटक श्री. नीलेश राऊत, प्रा. लता नारायण, श्री. नीलेश पुराडकर, श्री. अभिजीत खानविलकर, डॉ. सचिन जाधव, श्री. उमाकांत जगदाळे, श्री. दीपक केसरकर, श्री. सुरेश पाटील आदींची उपस्थिती होती.

या प्रसंगी मुख्यमंत्री मा. ना. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, राज्यातील युवांच्या विकासाकरिता हे धोरण उपयुक्त ठरेल. युवा धोरणाची अंमलबजावणी पुढील काळात महत्वपूर्ण ठरणारी आहे. युवा धोरण जाहीर होण्यासाठी नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या निमंत्रक मा. सौ. सुप्रिया सुळे यांनी घेतलेले प्रयत्न अतिशय मोलाचे आहेत. राज्यातील युवांच्या विकासाकरिता विविध योजना लवकरच जाहीर केल्या जातील असे आश्वासन त्यांनी दिले. क्रीडा व युवक कल्याण मंत्री मा. ना. पद्‌माकर वळवी यांनी सांगितले की, युवा धोरणाचा मसुदा तयार होत असताना यासाठी नियुक्त उपसमित्यांची भूमिका अतिशय महत्वपूर्ण होती. उपसमित्यांच्या अध्यक्षांनी पुरेसा वेळ दिल्यामुळे युवा धोरणाचा मसुदा सर्वकष, सकस होण्यास मदत मिळाली आहे.

**अभिसरण विभागीय बैठक** :- नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे रविवार दि. ६ मार्च २०११ रोजी नाथ सीडस्, औरंगाबाद येथे अभिसरण उपक्रमासंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीकरिता विभागीय केंद्र, औरंगाबादचे अध्यक्ष श्री. नंदकिशोर कागलीवाल, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, समन्वयक श्री. विजय कान्हेकर, विभागीय समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर, संघटक श्री. नीलेश राऊत व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

संघटक श्री. नीलेश राऊत यांनी बैठकीमध्ये आगामी अभिसरण उपक्रमासंदर्भात नियोजन कसे करावे, याविषयी पीपीटी सादरीकरण करुन माहिती दिली. दि. २५ मे ते २ जून २०११ दरम्यान मराठवाडा ते मुंबई विभाग, दि. ५ ते १३ जून २०११ दरम्यान कोकण ते उत्तर महाराष्ट्र विभाग आणि दि. १६ ते २४ जून २०११ दरम्यान विदर्भ ते पश्चिम महाराष्ट्र विभाग याप्रमाणे अभिसरण उपक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या संदर्भात अर्ज मागविण्याची प्रक्रिया, अर्जांची छाननी व निवड, विविध तालुक्यांचे नियोजन व जिल्हा, तालुका समन्वयकांनी करावयाची पूर्वतयारी याविषयी सविस्तर माहिती या सादरीकरणातून देण्यात आली.

**स्किल डेव्हलपमेंट प्रोग्राम** :- नवमहाराष्ट्र युवा अभियान व युवातर्फे मंगळवार, दि. २९ मार्च २०११ रोजी यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी निमंत्रक मा. सौ. सुप्रिया सुळे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. ना, राजेश टोपे, मा. खा. डॉ. भालचंद्र मुणगेकर, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक मा. जे. डी. भुतांगे, एकमेसीएलचे व्यवस्थापकीय संचालक श्री. विवेक सावंत आदी मान्यवर या कार्यशाळेसाठी उपस्थित होते. कार्यशाळेसाठी विविध संस्थांचे सुमारे ५० प्रतिनिधी उपस्थित होते.

## ९.४ कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम :-

१९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमाप्रमाणे अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम' या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करीत असून ते आपली सेवा या योजनेसाठी देत आहेत.

**फोरममार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारचे काम केले जाते :-**

१. समाजातील गोर-गरीब व तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत तोंडी सल्ला देणे.
२. प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नांसंबंधी सखोल अभ्यास करुन गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.
३. काही वेळा पत्रव्यवहाराद्वारे गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.
४. पक्षकारांच्या तंटयामध्ये सामोपचाराने तडजोड घडवून आणणे.
५. विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन कायद्याचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.
६. विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यानुसार बनविण्यात आलेल्या नियमांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन नियमांचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.
७. कायद्यांची विशेष माहिती करुन देण्यासाठी तज्ज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.
८. सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी विधी साक्षरता कार्यशाळांचे आयोजन करणे.
९. विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे. तसेच अशा विद्यार्थ्यांसाठी वकिलांची व्यावसायिक नीतिमत्ता या विषयावर परिसंवादांचे आयोजन करणे.

**फोरमच्या बैठका :-** कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजनेच्या अंमलबजावणीबाबत विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुस-या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात.

**ज्येष्ठ नागरिक संघांच्या प्रतिनिधींची बैठक :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्यातर्फे दरवर्षी ऑक्टोबर महिन्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा चव्हाण केंद्रामध्ये आयोजित केला जातो. ऑक्टोबर २०१० मध्ये भरविण्यात येणा-या मेळाव्यासंबंधी विचार करण्यासाठी दिनांक ४ सप्टेंबर २०१० रोजी समाज कल्याण केंद्र, दामोदर म्हात्रे मार्ग, दहिसर (पश्चिम) येथे सायंकाळी चार वाजता बांद्रा ते डहाणू या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. अंदाजे ८० प्रतिनिधी बैठकीला उपस्थित होते. अंदाजे ४२ बाबीसंबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले. सदर बैठक श्रीमती स्वाती आघारकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

**कायदेविषयक सल्ला केंद्र :-** गोरगरीब व सामान्य लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० च्या नंतर प्रतिष्ठानच्या ग्रंथालयामध्ये कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र चालविले जाते.

**मोफत समुपदेशन व तडजोड केंद्र :-** दर मंगळवारी सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळांत समुपदेशन व समेट केंद्राचे आयोजन केले जाते. दोन वादग्रस्त पक्षकारांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न या केंद्रामध्ये केला जातो. या कामाला गती देण्यासाठी विशेष प्रयत्न चालू आहेत.

**आपल्या कायद्याची माहिती करुन घ्या (Know your Law Lecture Series) :-** या व्याख्यानमाले अंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यांतून एकदा कायदे पंडितांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. सध्या इमारतींचे पुनर्विकास व माहितीचा अधिकार या कायद्यावर व्याख्याने आयोजित करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

**वकीलांची व्यावसायिक नीतिमत्ता या विषयावर चर्चासत्र :-** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबविले जातात. त्यापैकी वकीलांच्या व्यावसायिक नीतिमत्ता (Professional Ethics of Lawyers) याबाबत जाणीव करुन देण्यासाठी चर्चासत्राचे

आयोजन केले जाते. विधी शाखेतील विद्यार्थ्यांना याचा चांगला उपयोग होतो. सध्या फोरम व न्यू विधी महाविद्यालय, माहिम येथे अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

**विधी साक्षरता कार्यशाळा** :- लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधीत असलेल्या कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळया घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ - पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सदस्य, सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त, सार्वजनिक संस्थांचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

**निबंधांना बक्षिसे** :- विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये भाग घेणा-या विद्यार्थ्यांसाठी फोरमची एक खास योजना आहे. त्या योजनेनुसार झालेल्या कार्यशाळेबाबत अथवा कार्यशाळेत शिकविण्यात आलेल्या एका किंवा अनेक विषयाबाबत विद्यार्थ्यांना निबंध लिहिता येतात व त्या निबंधाच्या गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या स्वरुपात बक्षिसे दिली जातात.

**कार्यशाळेमध्ये शिकविलेले कायदे** :- विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती करुन देण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश होता. (१) भारतीय संविधान, (२) विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७, (३) हुंडाबंदी अधिनियम १९६१, (४) भारतीय दंड संहिता १८६० (५) ग्राहक संरक्षण कायदा १९८६, (६) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (७) हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ व इच्छा पत्र कायदा, (८) गुंतवणुकीसंबंधीचे नियम, (९) कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५, (१०) माहितीचा अधिकार कायदा २००५, (११) हिंदू विवाह कायदा १९५५, (१२) मुस्लीम कायदा, (१३) पोटगी संबंधीचे कायदे, (१४) महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३, (१५) हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६, (१६) हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम १९५६, (१७) संपत्ती हस्तांतरण अधिनियम १८८२, (१८) विशेष विवाह अधिनियम १९५४, (१९) बाल विवाह बंदी अधिनियम २००५, (२०) महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम १९८८, (२१) न्यायालयांची बहुस्तरीय व्यवस्था (तालुका न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतची माहिती), (२२) स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिबंध) अधिनियम १९८६, (२३) विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५, The Persons with Disabilities (Equal opportunities, Protection of Rights and Full Participation) Act, 1995 (२४) स्वमग्न असलेल्या, मस्तिष्क घात झालेल्या, मतिमंद व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९, (The National Trust for Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act, 1999) (२५) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (The Immoral Traffic (Prevention) Act, 1956 (२६) राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१, (२७) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, (२८) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॉपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७, (२९) महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९, (३०) महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणा-या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत

अधिनियम १९८२, (३१) मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध), (३२) मुस्लिम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम १९८६, (३३) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्रविकास) अधिनियम १९७१, (३४) भारतीय वारसा हक्क कायदा १९२५, (३५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, (३६) मुंबई मुद्रांक कायदा १९५८, (३७) गृहनिर्माण संस्थांचे विनियम, (३८) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९, (३९) मुस्लिम व्यक्ती विषयक विधी (शरियत) प्रयुक्ती अधिनियम १९३७, (४०) नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, (४१) भारतीय मुद्रांक कायदा १८९९, (४२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, (४३) प्रसूती विषयक लाभ अधिनियम १९६१, (४४) सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०, (४५) अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, (४६) मोटर वाहन अधिनियम १९८८, (४७) जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९, (४८) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, (४९) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९, (५०) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, (५१) माता पिता व ज्येष्ठ नागरिक यांची पोटगी व कल्याण अधिनियम २००७, (५२) मुंबई पोलीस अधिनियम, १९५०.

**संशोधनाचे काम** :- वर सांगितल्याप्रमाणे फोरमतर्फे विधी संशोधनाचे कामसुध्दा केले जाते. महाराष्ट्र हुंडाबंदी नियम २००३ यामध्ये सुधारणा सुचविण्यासाठी संशोधन पूर्ण झाले असून, त्याबाबतचा अहवाल महाराष्ट्र शासनाला पाठविण्यात आला आहे.

**आगामी कार्यक्रम** :- राज्यातील पोलीस अधिका-यांसाठी खास विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यासंबंधी प्रस्ताव विचाराधीन आहे.

## ९.५ रंगस्वर - सांस्कृतिक विभाग :-

प्रतिष्ठानच्या रंगस्वरतर्फे नाटय, चित्रपट, गायन आदि कार्यक्रम होतात. रंगस्वरची वार्षिक वर्गणी पती पत्नीसाठी रु. २०००/-, वैयक्तिक रु. १२००/-, अपंगासाठी रु. ५००/- भरुन रंगस्वरचे सभासद होता येते. रंगस्वरच्या सदस्यांना तसेच प्रतिष्ठानच्या आजीव सदस्यांनाही कार्यक्रमाचा आस्वाद घेता येतो. सांस्कृतिक विभागासाठी सरचिटणीस श्री. शरद काळे, उपाध्यक्ष डॉ. रविंद्र बापट यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येते. श्री. विजय देसाई, व्यवस्थापक, सभागृह कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील असतात.

जानेवारी २०११ मध्ये 'यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे' आयोजन करण्यात आले. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या मुंबई येथील सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम रंगस्वरच्या वतीने नियमितपणे सादर केले जातात. सर्व सभासद व रसिकांसाठी विनामूल्य प्रवेश दिला जातो.

## ९.६ सृजन :-

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर विभागातर्फे शालेय विद्यार्थ्यांच्या विकासाकरिता सृजन हा अभिनव उपक्रम चालविण्यात येतो. सृजनच्या माध्यमातून समाजातील मान्यवर व्यक्तींच्या सर्जनशीलतेचा अविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्त कलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

सृजन संकल्पना आणि संयोजन मा. सौ. सुप्रियाताई सुळे यांची असून यामध्ये सन्माननीय सल्लागार म्हणून सुप्रसिध्द चित्रकार श्री. डग्लस जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग हे काम पहातात. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी सृजन

कार्यशाळा ९.०० वाजता चव्हाण सेंटरमध्ये आयोजित करण्यात येते. श्री. विद्याधर खंडे त्यांना सहाय्य करतात. सृजनतर्फे घेण्यात आलेले विविध कार्यक्रम.

| अ.क्र. | दिनांक | विषय | प्रशिक्षक |
|---|---|---|---|
| १ | ३ जानेवारी | स्टडी डेव्हलपमेंट | अरुण नाईक |
| २ | ७ फेब्रुवारी | रिसायकल मटेरिअल | विवेक टेटविलकर |
| ३ | ६ जून | ड्रॉईंग | डग्लस जॉन |
| ४ | ४ जुलै | ओरिगॅमी | सम्यका अहिरे |
| ५ | १ ऑगस्ट | क्ले | स्वाती गांगल आणि अमरजीत सिंह |
| ६ | ५ सप्टेंबर | कॅलिग्राफी | शुभानंद जोग |
| ७ | ३ ऑक्टोबर | सिव्हील डिफेंस | सिव्हील डिफेंस डिपार्टमेंट |
| ८ | ७ नोव्हेंबर | फोटोग्राफी | सुधाकर ओळवे |

**५ सप्टेंबर २०१० :-** सृजनचे सल्लागार श्री. शुभानंद जोग यांनी कॅलीग्राफी या विषयावर सृजनची कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत त्यांनी मुलांना बोरुने मराठी व इंग्रजी अक्षराची ठेवण, रचना इ. गोष्टी शिकविल्या. त्याचबरोबर भारतीय भाषांमधील 'एक' अक्षरांची ओळख करुन दिली.

**३ ऑक्टोबर २०१० :-** नागरी संरक्षण दल या विषयावर मुलांकरिता कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत शांततेच्या आणि आणीबाणी प्रसंगी नागरिकांनी कशाप्रकारे आपली वागणूक ठेवावी यावर नागरिक संरक्षण दलाने माहिती दिली. त्याचबरोबर दुर्घटनेच्या वेळी प्रथमोपचार कसा करावा, आपत्तीत सापडलेल्या व्यक्तींची सुटका कशी करावी याची प्रात्यक्षिके दाखविली. समाजात नागरिकांना परस्परांच्या सहकार्याने आलेल्या संकटांना धीराने कसे तोंड द्यावे याचेही प्रात्यक्षिक देण्यात आले.

**७ नोव्हेंबर २०१० :-** टाइम्स ऑफ इंडियाचे फोटोग्राफर श्री. सुधाकर ओलवे आणि त्यांच्या सहका-यांनी मुलांना कॅमे-याची ओळख करुन प्रत्येक ग्रुपमध्ये एक कॅमेरा देऊन त्या मुलांचा फोटो घेण्यास सांगितला. ज्या मुलांनी योग्य फोटो घेतले त्या मुलांकडून चव्हाण सेंटरच्या आवारातील फुलाचे फोटो घेण्याचे प्रात्यक्षिक करुन घेतले. सृजन २०१० या कार्यक्रमाची सांगता डिसेंबर महिन्यात 'पार्टी' म्हणून साजरा करण्यात आली. या पार्टीमध्ये सुप्रसिध्द जादूगार श्री. मधुकर पेडणेकर यांचा जादुच्या प्रयोगाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना जादूचे प्रयोग, छोटया-छोटया जादू कशा रीतीने करता येतील हे शिकविण्यात आले होते. या कार्यक्रमास सृजनच्या संकल्पनाकार खासदार सौ. सुप्रियाताई सुळे उपस्थित होत्या.

**९ जानेवारी २०११ :-** या कार्यक्रमाची सुरुवात श्री. विवेक टेटविलकर यांच्या 'टाकाऊतून टिकाऊ' या कार्यक्रमातून झाली. टेटविलकर यांनी रद्दी कागदांचा वापर करुन नारळाच्या वाटया, रद्दी पेपर आणि कागदाचे छोटे कपटे बनवून दाखविले.

## ९.७ शिक्षण विकास मंच :-

शिक्षण विषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी प्रतिष्ठानने शिक्षण विकास मंचची स्थापना केली आहे. हा मंच गेल्या तीन वर्षांपासून कार्यरत आहे. सौ. सुप्रिया सुळे या शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक म्हणून, तर डॉ. कुमुद बंसल या मुख्य संयोजक

आणि डॉ. वसंत काळपांडे हे विशेष सल्लागार म्हणून जबाबदारी सांभाळतात. श्रीमती बसंती रॉय यांचेही मोलाचे सहकार्य याकामी होत असते. श्री. दत्ता बाळसराफ हे शिक्षण विकास मंचाचे संयोजक आहेत तर श्री. सुरेश पाटील हे समन्वयक म्हणून काम पहातात. शिक्षण विकास मंचच्या कामात वेळोवेळी गरजेनुसार राज्यातील शिक्षण तज्ज्ञांची मदत घेण्यात येते.

शिक्षण विकास मंचने पुढील तीन ठळक कार्यक्रम हाती घेतले आहेत.

१. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील नवोपक्रमांबाबतचे पुस्तक.

२. विस्तार कार्य, आणि

३. राष्ट्रीय शिक्षण दिन

या आर्थिक वर्षात दिनांक १ एप्रिल २०१० पासून वरील कार्यक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी यासाठी मुंबई येथे डॉ. कुमुद बंसल यांच्या अध्यक्षतेखाली आठ बैठका मुंबई, पुणे व मुर्टी येथे आयोजित केलेल्या होत्या. तसेच तीन कार्यशाळा पुणे येथे विविध विषयांवर आयोजित केलेल्या होत्या. तसेच सात बैठका मुर्टी आणि भुतोंडे येथे झाल्या. या दोन केंद्राच्या कार्यकक्षेतील २२ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना तीन वेळा भेटी दिल्या. याशिवाय विविध स्वरुपाची माहिती मिळविण्यासाठी आणि संदर्भ शोधण्यासाठी इंटरनेट, ग्रंथालयातील पुस्तके यांचा वापर, अधिकारी आणि तज्ज्ञ यांच्याशी दूरध्वनीवरुन आणि प्रत्यक्ष संपर्क साधून चर्चा करणे, कार्यकमांशी संबंधित विविध व्यक्ती आणि संस्था यांच्याशी पत्रव्यवहार करुन त्यांचा पाठपुरावा करणे, दत्तक घेतलेल्या प्राथमिक शाळांसाठी आवश्यक असलेली पुस्तके आणि इतर साहित्य निश्चित करणे ही कामे करण्यात आली. शिक्षण विकास मंचने हाती घेतलेल्या सर्व कार्यक्रमांचे अभ्यासपूर्ण असे आराखडे तयार केले आहेत. अहवाल, लेख तयार केले आहेत आणि सर्वेक्षण/मूल्यमापन यासाठी साधनेही विकसित केली आहेत. आतापर्यंत झालेल्या कामाचा तपशीलवार आढावा पुढील परिच्छेदांमध्ये दिलेला आहे. राज्यात प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात काम करणारे निवडक ५० अधिकारी आणि शिक्षक यांची गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षण या विषयावर एक कार्यशाळा आयोजित करण्याचे प्रस्तावित होते.

**७.१ विस्तार कार्य :-**

१. पुणे जिल्हयातील बारामती तालुक्यातील मुर्टी या केंद्राला जोडलेल्या १३ आणि भोर तालुक्यातील भुतोंडे केंद्राला जोडलेल्या ९ शाळा अशा एकूण २२ शाळा शिक्षण विकास मंचने दत्तक घेतल्या आहेत. दोन्ही केंद्रातील शाळांना आतापर्यंत प्रत्येकी दोन वेळा भेटी देण्यात आल्या

२. वरील कार्यक्रमात शाळांचे सर्वेक्षण करुन प्रयोगशाळा साहित्य आणि वाचनालयासाठी पुस्तके पुरवणे आणि कृतीतून अध्ययन याबाबींना प्राधान्य द्यायचे ठरले होते. या दोन्ही केंद्रात इयत्ता पाचवी ते सातवीचे वर्ग असलेल्या केवळ दोनच शाळा असल्यामुळे केवळ इयत्ता पहिले ते चौथी या इयत्तांवरच लक्ष केंद्रित करावे असे ठरले. इयत्ता पहिले ते चौथीपर्यंत विज्ञान शिकवण्यासाठी कोणतेही जादा शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याची गरज नाही. त्यामुळे प्रयोगशाळेसाठी कोणतीही जादा तरतुद आवश्यक नाही. मात्र मुलांसाठी गोष्टींची आणि माहितीपर अशी पुस्तके देण्याची गरज आहे. तसेच पहिलीपासून इंग्रजी विषय असल्यामुळे सोप्या इंग्रजीतील पुस्तके देणेही आवश्यक आहे.

३. या शाळांची वाचनासाठीच्या पुस्तकांची गरज लक्षात घेऊन या दोन केंद्रातील शाळांसाठी प्रत्येकी ६९ मराठी आणि २२ इंग्रजी अशा ९१ पुस्तकांची खरेदी केली आहे. यांत विंदा करंदीकर, जी. ए. कुलकर्णी, पु. ल.

देशपांडे, सई परांजपे, रत्नाकर मतकरी, शांता शेळके, इंदिरा संत अशा नामवंत लेखकांचाही समावेश आहे. या बरोबरच चांदोबा, चंपक आणि टिंकल ही मासिके आणि खेळाचे साहित्य पुरवण्यात येत आहे.

४. शिक्षकांबरोबरच्या चर्चेत कृतीतून अध्ययन या विषयावर तीन दिवसांची कार्यशाळा आयोजित करावी असे ठरले. या कार्यशाळेत शिकणारे शिक्षक आणि शिकवणारे ही स्वतः शिक्षकच राहतील असेही ठरले. त्यानुसार दिनांक ४ ते ६ मे, २०१० या कालावधीत आयोजित केलेल्या कार्यशाळेत शिक्षकांनी मराठी, इंग्रजी, गणित, विज्ञान, भूगोल, नागरिकशास्त्र हे विषयक खेळ, प्रकल्प, गटकार्य, वर्तमानपत्रांचा वापर, फ्लॅशकार्डचा वापर, नकाशावाचन, नाटयकरण, मुलाखती, प्राणी, पक्षी आणि वनस्पती यांचे निरीक्षण पानांचे संग्रह, सर्वेक्षण इ. माध्यमातून कसे शिकवता येतील याबाबत नियोजन केले. या कार्यशाळेसाठी एकही बाहेरचा तज्ज्ञ नव्हता हे कार्यशाळेचे प्रमुख वैशिष्ट्य होते.

५. दिनांक २६ जुलै रोजी जिल्हा परिषदेचे सभापती (बांधकाम व आरोग्य समिती) श्री. संभाजी होळकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री. शेंडकर, गटविकास अधिकारी, बारामती, पंचायत समिती श्री. गोर्डे, श्री. सावंत यांच्याशी चर्चा झाली. या चर्चेत भुतोंडे भागात एका होडीचा प्रस्ताव सभापती (बांधकाम व आरोग्य समिती) यांनी मंजूर केल्याचे सांगितले.

६. दुस-या भेटीत शिक्षकांबरोबरच मुर्टी आणि भुतोंडे या केंद्रातील ग्रामस्थांसोबतही चर्चा झाली. या भेटीत भुतोंडेवाजेघर या एस.टी. बसच्या वेळा आणि मार्ग बदलणे आणि भुतोंडे येथे पूर्वी सुरु असलेले प्राथमिक आरोग्य केंद्र पुन्हा सुरु करणे या दोन बाबींचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

७. **दि. ३ व ४ सप्टेंबर २०१० -** राष्ट्रीय शिक्षण दिन २०१० रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या 'उपक्रमःवेचक-वेधक' या पुस्तकाच्या संपादनासाठी जे. पी. नाईक सेंटर, पुणे येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीसाठी डॉ. वसंत काळपांडे, श्री. इरगोंडा पाटील, श्री. शरद काथवटे, श्री. दत्ता बाळसराफ, श्री. बी. एम. नाईकरे, श्री. सुरेश पाटील इ. उपस्थित होते.

८. **दि. ७ सप्टेंबर २०१० :-** 'शाळांची परिणामकारकता' या विषयावर राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे परिषद घेण्यात आली. या परिषदेच्या पूर्वतयारीसाठी पुण्यातील निसर्ग मंगल कार्यालय येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीसाठी पुणे आणि कोल्हापूर जिल्हयातील निवडक शाळांमधील मुख्याध्यापकांना बोलविण्यात आले होते. या बैठकीसाठी राज्याचे माजी शिक्षण संचालक आणि शिक्षण विकास मंचाचे सल्लागार, डॉ. वसंत काळपांडे, विभागीय केंद्र, पुणे येथील शिक्षण उपसंचालक श्री. मगर, श्रीमती बसंती रॉय, श्रीमती अंबूजम अय्यर इ. मान्यवर उपस्थित होते. या बैठकीत ३० मुख्याध्यापकांनी भाग घेतला.

९. **दि. २४ सप्टेंबर २०१० : उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार २०१० निवड समितीची बैठक :-** ११ नोव्हेंबर २००९ पासून शिक्षण विकास मंचने भारताचे पहिले शिक्षण मंत्री मा. मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त केंद्र शासनाच्या निर्णयाप्रमाणे राष्ट्रीय शिक्षण दिन आयोजित करण्यास सुरुवात केली. २००९ मध्ये आयोजित झालेल्या राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या कार्यकमानिमित्त मुलांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ या विषयावर परिषद आयोजित केली होती. राष्ट्रीय शिक्षण दिन २००९ च्या कार्यक्रमापासून मंचामार्फत त्या त्या वर्षी प्रकाशित होणा-या एका उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथाला पुरस्कार देण्यात यावा असे ठरले व तशी सुरुवातही झाली. २००९ च्या पुरस्कारासाठी श्रीमती सुचेता पडवळकर यांनी

लिहिलेल्या 'शिक्षण प्रवाहाच्या उगमापाशी' या मनोविकास प्रकाशनने प्रकाशित केलेल्या पुस्तकाची निवड केली. त्या वर्षी लेखक आणि प्रकाशक या दोघांनाही गौरवपत्र प्रदान करुन त्यांचा सत्कार करण्यात आला. मागील वर्षाचा अनुभव विचारात घेऊन ही योजना आणखी चांगल्या प्रकारे अंमलात आणता यावी यादृष्टीने राज्यातील सर्व प्रकाशकांना या योजनेची माहिती देऊन पत्राद्वारे २०१० साठीच्या शैक्षणिक विषयावरील पुस्तके पाठवण्याची विनंती करण्यात आली. आलेल्या पुस्तकांपैकी शिक्षणाशी सरळ संबंध असलेले उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार समितीपुढे ठेवण्यात यावीत असे ठरले. पुरस्काराचे स्वरुप लेखकाला ५००० रुपये रोख, गौरवचिन्ह आणि गौरवपत्र असे असावे असे ठरले. तसेच उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार समिती पुढीलप्रमाणे स्थापन करण्यात यावी असे ठरले. डॉ. वसंत काळपांडे, श्रीमती बसंती रॉय, श्री. श्रीधर लोणी, श्रीमती श्रुती पानसे.

१०. **समितीच्या सभा :** समितीच्या दोन सभा झाल्या. पहिली सभा दि. २४ सप्टेंबर २०१० रोजी जे. पी. नाईक सेंटर, कोथरुड, पुणे येथे झाली. या सभेला श्रीमती बसंती रॉय यांच्या व्यतिरिक्त सर्व सदस्य उपस्थित होते. या सभेत शालेय किंवा शिक्षक प्रशिक्षणासाठीच्या अभ्यासक्रमांसाठी लिहिलेली पाठयपुस्तके, संदर्भ म्हणून या अभ्यासक्रमांसाठी वापरण्यात येणारी पुस्तके, गाईडवजा पुस्तके, नियम किंवा कायदा यावर स्पष्टीकरणात्मक मॅन्युअल स्वरुपाची पुस्तके, तात्कालिक संदर्भ असलेली पुस्तके विचारात घेण्यात येऊ नयेत असा निर्णय घेण्यात आला. ज्या पुस्तकामुळे शिक्षकांच्या, पालकांच्या शिक्षणक्षेत्रातील कार्यकर्त्यांच्या विचारांना नवीन दिशा मिळू शकेल. त्यांना कृती करायला प्रेरणा मिळू शकेल अशा पुस्तकांचा विचार करण्यात यावा असे ठरले. या निकषांनुसार ४२ पुस्तकांची छाननी केल्यानंतर ९ पुस्तके विचारासाठी निवडण्यात आली. ही पुस्तके समितीच्या चारही सदस्यांनी वाचून पुढच्या सभेत आपापली मते मांडावीत आणि त्यापैकी एका पुस्तकाची निवड करावी असे ठरले.

पुढची सभा ४ ऑक्टोबर २०१० रोजी जे. पी. नाईक सेंटर, कोथरुड, पुणे येथे झाली. या सभेला चारही सदस्य उपस्थित होते. समन्वयासाठी श्री. माधव सूर्यवंशी उपस्थित होते. प्रत्येक सदस्याने आपण वाचलेल्या पुस्तकावर अभिप्राय दिले. सभेत सर्व सदस्यांनी निवड केलेल्या ९ पुस्तकांपैकी सर्व पुस्तके चाळली. दि. २४ सप्टेंबर २०१० रोजी झालेल्या सभेत ठरलेले निकष विचारात घेऊन ज्योत्स्ना प्रकाशनाच्या श्री. आनंद ठाकूर यांच्या 'शिकवण्याजोगे काय आहे' या पुस्तकाची निवड करावी असे समितीने एकमताने ठरवले. श्री. अरुण ठाकूर यांचे हे पुस्तक भारतातील ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. कृष्णकुमार यांच्या शिक्षणविषयक भाषणांचा आणि लेखांचा संग्रह असलेल्या 'व्हॉट इज वर्थ टिचिंग' या मूळ इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद आहे. उत्स्फूर्तता हरवलेल्या आपल्या शिक्षण व्यवस्थेत चैतन्य निर्माण करण्याचा हा एक प्रयत्न आहे. विचारांना नवीन दिशा देणा-या आणि त्या दिशेने कृतिप्रवण करणारे हे पुस्तक शिक्षक, पालक आणि शिक्षणक्षेत्रातील सर्व कार्यकर्त्यांनी वाचावे असेच आहे.

प्रत्येक शाळेसाठी खेळाचे, त्याचप्रमाणे इतर कोणते शैक्षणिक साहित्य लागणार आहे याचा केंद्र प्रमुखाकडून प्रस्ताव मागवून घेण्यात येण्याबाबत विचार झाला. राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शासन व परिषदेसाठी बोलवण्यात येणारे प्रतिनिधी यांच्यासाठी पत्राचे मसुदे तयार करण्याची

जबाबदारी डॉ. वसंत काळपांडे यांनी स्वीकारली. 'माझ्या स्वप्नातील शाळा' या विषयावर मुंबईतील माध्यमिक शाळांमधील सुमारे २० निवडक विद्यार्थ्यांचा परिसंवाद श्रीमती बसंती रॉय आणि श्री. दत्ता बाळसराफ यांनी श्री. अजित भुरे यांच्या मदतीने बसवला. या वर्षीसुध्दा उत्कृष्ट शैक्षणिक पुस्तकाला गौरवपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच पुस्तकाच्या लेखकाला रोख रु. ५०००/- एवढी रक्कम देण्यात आली. लेखक आणि प्रकाशक या दोघांनाही स्मृतिचिन्ह देण्यात आले. स्मृतीचिन्हाची निवड श्रीमती बसंती रॉय यांनी केली.

११. **दि. ११ नोव्हेंबर २०१० : राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त आयोजित 'शाळांची परिणामकारकता' या विषयावरील परिषद :** भारताचे पहिले शिक्षण मंत्री अब्दुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ११ नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून आयोजित करण्यात आला होता. त्या निमित्त सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० यावेळेत परिषद घेण्यात आली. या परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामविकास मंत्री मा. जयंत पाटील तसेच शालेय शिक्षण राज्यमंत्री मा. श्रीमती फौजीया खान उपस्थित होत्या. शिक्षण विकास मंचाच्या प्रमुख संयोजिका श्रीमती कुमुद बन्सल यांनी मान्यवरांचे स्वागत केले. निमंत्रक मा. सौ. सुप्रिया सुळे या काही अपरिहार्य कारणांमुळे सदर परिषदेस उपस्थित राहू शकल्या नाहीत. त्यांच्या संदेशाची चित्रफित यावेळी दाखविण्यात आली. शाळांची परिणामकारकता या परिषदेत आपले विचार मांडताना मा. श्रीमती फौजीया खान म्हणाल्या की, ज्या अब्दुल कलाम आझाद यांनी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणासाठी व्हिजन पाहिले होते त्याची अंमलबजावणी नुकतीच आपण केलेली आहे.

राज्याचे ग्रामविकास मंत्री मा. जयंत पाटील आपले विचार व्यक्त करतांना म्हणाले, सरकारला कोणीतरी सांगणारे असावे लागते. सरकारला सुधारणा आणि सूचना करणारे असावे लागते. म्हणून शिक्षण विकास मंचचे व्यासपीठ महाराष्ट्र सरकारला नवी दिशा दाखविण्याचे काम करते आहे. आज सकाळी 'शाळा कशी असावी' या विषयावर विद्यार्थ्यांचा 'टॉक शो' झाला. त्यामधून मुलांच्या शाळेपासून काय अपेक्षा आहेत ते आपणास कळले आहे. नेहमी असे सांगितले जाते की, शिक्षण क्षेत्रामध्ये जो देश जास्त गुंतवणूक करेल त्याची पुढची पिढी ठामपणाने समाजासमोर आणि जगासमोर येईल. आज शैक्षणिक क्षेत्रात अनेक नवीन आव्हाने उभी आहेत. प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी अनेक नवीन प्रयोग करणे आवश्यक आहे. यावेळी शिक्षण विकास मंचाच्यावतीने राज्यातील प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी नाविण्यपूर्ण प्रयोग करणा-या शिक्षकांच्या कार्याचा उल्लेख करणारे 'उपक्रम : वेचक-वेधक' या पुस्तकाचे मा. श्री. जयंत पाटील यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर मा. श्रीमती फौजीया खान, डॉ. कुमुद बंसल, डॉ. वसंत काळपांडे, श्रीमती बसंती रॉय, श्री. अरुण मेहता, डॉ. सुनिता चुग इ. मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रीय शिक्षण दिनाचे औचित्य साधून राज्यातील शिक्षण विषयक एका उत्कृष्ट ग्रंथास आणि प्रकाशकास पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावेळेस ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ प्राध्यापक श्री. कृष्णकुमार यांच्या शिक्षण विषयक भाषणांचा आणि लेखांचा संग्रह असलेल्या श्री. अरुण ठाकूर यांनी मराठीत अनुवाद केलेल्या 'शिकविण्यायोग्य काय आहे' या पुस्तकास मिळाला. तर ज्योत्स्ना प्रकाशनास उत्कृष्ट प्रकाशनाचा पुरस्कार देण्यात आला. रुपये पाच हजार रोख, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरुप होते. शालेय शिक्षण राज्यमंत्री मा. श्रीमती फौजीया खान यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या परिषदेस दिल्लीतील नुफा या संस्थेचे श्री. अरुण मेहता आणि डॉ. सुनिता चुग प्रमुख मार्गदर्शन म्हणून हजर होते. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. वसंत काळपांडे यांनी आभार व्यक्त केले. या परिषदेसाठी राज्यातील शिक्षण क्षेत्रात काम करणारे तज्ज्ञ, शिक्षणाधिकारी, शिक्षक, कार्यकर्ते तसेच पत्रकार इ. मंडळी उपस्थित होते.

१२.**सोमवार दि. १७ डिसेंबर २०१० साठीच्या परिषदेसाठी पूर्व तयारी बैठक :-** खाजगी शाळांमध्ये आपल्या मुलांना पाठवण्याकडे पालकांचा ओढा मोठया प्रमाणावर असला तरी ग्रामीण भागात पुढची अनेक वर्षे जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांची संख्याच खाजगी शाळांच्या तुलनेत किती तरी जास्त राहणार आहे. कारण खाजगी शिक्षण संस्था ग्रामीण भागात शाळा सुरु करायला पुढे येण्याची शक्यता नाही. शिक्षकांवर शाळांचा दर्जा प्रामुख्याने अवलंबून असला तरी शिक्षकांना चांगले काम करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक असते. त्यासाठी एकूणच प्रशासकीय यंत्रणा, अधिकारी, पदाधिकारी, ग्राम शिक्षण समित्या / शाळा व्यवस्थापन समित्या, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा या सर्व आपापल्या जबाबदा-या कितपत प्रभावीपणे पार पडतात. पालकांचा आणि स्थानिक समाजाचा जिल्हा परिषद प्राथमिक शाळांकडे पाहण्याचा दृष्टीकोन काय असतो. या शाळांना आवश्यक त्या भौतिक सुविधा आणि आर्थिक मदत मिळते काय, शिक्षकांच्या बदल्या आणि इतर सेवाशर्ती याबाबत राजकीय हस्तक्षेप किती प्रमाणात असतो आणि त्याचा शाळांच्या दर्जावर काय परिणाम होतो, ज्या मोठया गांवामध्ये खाजगी शाळा सुरु झाल्या आहेत त्या ठिकाणी जिल्हा परिषद प्राथमिक शाळांवर काय परिणाम झाला आहे. जसा एस.टी.च्या सेवेवर प्रवाशांचा खाजगी बस वाहतुकीपेक्षा जास्त विश्वास असतो तसाच जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या बाबतीत का घडू शकत नाही या आणि अशा इतर अनेक अंगांनी या विषयाचा विचार करता येईल. या परिषदेसाठी नियोजन करताना काही निवडक जाणकार आणि अभ्यासू व्यक्तींशी चर्चा करुन तपशिलवार नियोजन करावे असे ठरले.

२.**चर्चासत्रांसाठी विषय :-** शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे राज्यात मराठी शाळांना गरज असूनही परवानगी मिळत नाही आणि त्यामुळे १० लाखांपेक्षा जास्त मुलांना इच्छा असूनही मराठी माध्यमात शिकता येत नाही असा गैरसमज निर्माण करुन काही हितसंबंधी गटांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. प्रसारमाध्यमांमध्ये त्याला भरपूर प्रसिध्दी मिळत असते. मात्र ही वस्तुस्थिती नसल्यामुळे आणि विद्यार्थ्यांना मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रवेश नाही अशी परिस्थिती नसल्यामुळे या गटांना बैठका घेण्या पलीकडे आणि प्रसारमाध्यमांतून वातावरण तापवण्या पलीकडे आतापर्यंत फारसे काहीच साध्य करता आलेले नाही. असे असले तरी मराठी माध्यमाच्या सध्या सुरु असलेल्या शाळांचे अनुदान, तुकडया, शिक्षक मान्यता असे नक्कीच काही प्रश्न आहेत आणि त्यांचा या शाळांच्या कामकाजावर विपरीत परिणाम होतो. या प्रश्नांच्या सर्व बाजूंचा खुलेपणाने विचार करण्यासाठी 'जिल्हा परिषदांचे शैक्षणिक प्रशासन' या विषयावर एक चर्चासत्र आयोजित करण्यात यावे असे ठरले.

**निवडक उपक्रमशील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांची कार्यशाळा -** जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये सुरु असलेल्या चांगल्या उपक्रमांचे संकलन असलेले 'उपक्रम : वेचक-वेधक' हे पुस्तक नुकतेच प्रकाशित केले. या पुस्तकात ज्यांचे लेख प्रसिध्द झाले आहेत असे शिक्षक, काही निवडक केंद्र प्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), लोकप्रतिनिधी, शिक्षणतज्ज्ञ अशा सुमारे ८० प्रतिनिधींची एक कार्यशाळा आयोजित करुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये उपक्रमशीलतेला आणखी वाव देण्यासाठी काय करता येईल याबद्दल विचार करण्यात यावा असा विचार झाला.

**शालेय स्तरावर संगणकाचा वापर :-** सर्व शिक्षा अभियान आणि आय.सी.टी. इन स्कूल या दोन योजनांमधून प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना संगणक आणि संगणकावर वापरता येतील अशा सीडी दिल्या आहेत. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाखाली आणखीही माध्यमिक शाळांना संगणक मिळू शकतील. या पार्श्वभूमिवर त्यांचा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत आणि शालेय प्रशासनात कशा रितीने उपयोग होतो याचा आढावा घेऊन आणखी प्रभावी उपयोग होण्यासाठी काय करता येईल याचा या कार्यशाळेत विचार करता येईल. अध्ययन - अध्यापन प्रक्रियेत मल्टिमिडीयाचा वापर करण्याबद्दलही या कार्यशाळेत विचार करता येईल. या बैठकीत डॉ. कुमुद बंसल, डॉ. वसंत काळपांडे, श्रीमती बसंती रॉय, श्री. शहाजी ढेकणे, श्री. प्रकाश परब, श्री. दत्ता बाळसराफ, श्री. माधव सूर्यवंशी, श्री. सुरेश पाटील हे उपस्थित होते.

१३. **बुधवार दि. २ फेब्रुवारी २०११ :-** शिक्षण विकास मंच आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केंद्र भुतोंडे, जिल्हा पुणे यांच्या विद्यमाने बुधवार दि. २ फेब्रुवारी २०११ रोजी गुहिणी, तालुका भोर येथे 'बाल आनंद मेळावा व वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास भुतोंडे केंद्रातील सातही शाळेतील विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते. या कार्यक्रमानिमित्त मनोरंजनात्मक खेळ, संगीत खुर्ची स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी डॉ. कुमुद बंसल, डॉ. वसंत काळपांडे, श्री. दत्तात्रय शेंडकर तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी, शिक्षक, पालक व लोकप्रतिनिधी असे एकूण ४०० प्रतिनिधी उपस्थित होते. हा कार्यक्रम सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.०० यावेळेत पार पडला.

**शिक्षण कट्टा :-** शिक्षण विकास मंचाच्यावतीने 'एज्यु. संवाद' हा उपक्रम सुरु करण्यात येत आहे. या उपक्रमात शिक्षणविषयक विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी मुंबई व उपनगर परिसरातील मुख्याध्यापक, शिक्षक, अधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार व पालक या सर्वांचा सहभाग असणार आहे. याद्वारे शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी शिफारशी करणे तसेच शिक्षणातील विविध अडचणी / समस्यांची चर्चा करणे, प्रचलित शैक्षणिक उपक्रमांचा परामर्श घेऊन त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी सूचना देणे, शिक्षकांची व्यावसायिक क्षमता उंचावण्यासाठी विविध स्त्रोतांचा शोध घेणे, चांगले शैक्षणिक उपक्रम/प्रयोग यांचे आदान-प्रदान करणे या व अशा विविध उद्देश असणा-या 'एज्यु. संवाद' हे व्यासपीठ असेल.

## ९.८ अपंग हक्क विकास मंच :-

अपंग हक्क विकास मंचाच्या संयोजक खासदार सौ. सुप्रिया सुळे या असून समन्वयक म्हणून श्री. विजय कान्हेकर हे काम पाहतात.

८.१ **सोलापूर, दि. १४ ते १८ मे, २०१० :-** सोलापूर जिल्हयातील मोहोळ तालुक्यातील कामती येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात, आरोग्य विभाग, सोलापूर, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने विविध प्रवर्गातील अपंगांची मोफत तपासणी व कृत्रिम अवयव / साधने वाटपाचे शिबीर संपन्न झाले. या शिबीरात १०५ लाभार्थ्यांची तपासणी करण्यात येऊन ६५ लाभार्थ्यांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप करण्यात आली. या कार्यक्रमाला जिल्हयाचे पालकमंत्री मा. ना. लक्ष्मणराव ढोबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धाकतोंडे तसेच श्री. कांबळे, श्री. विजय कान्हेकर, श्री. तेंडुलकर आदि मान्यवरांची उपस्थिती होती.

८.२ **पुणे, दिनांक २२ ते २५ जून, २०१० :-** बालकल्याण संस्था, पुणे आणि औंध शासकीय रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने अपंगांना मोफत तपासणी व कृत्रिम अवयव वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये २५ जून २०१० रोजी मंचाच्या संयोजक मा. सौ. सुप्रिया सुळे, मा. श्री. एम. एम. सावंत, (आयुक्त अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य), बालकल्याण संस्थेचे मा. प्रतापराव पवार आणि शल्य चिकित्सक औंध शासकीय रुग्णालय तसेच मंचाचे समन्वयक श्री. दत्ता बाळसराफ, श्री. विजय कान्हेकर यांच्या उपस्थितीत लाभार्थींना कृत्रिम अवयव व साधनांचे वाटप करण्यात आले.

८.३ **धुळे, दिनांक ८ ते १२ जुलै, २०१० :-** दि. ८ ते १२ जुलै २०१० रोजी केले मुक बधीर विद्यालय, धुळे येथे जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, औरंगाबाद व जिल्हा परिषद धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने धुळे जिल्हयातील विविध प्रवर्गातील २५० अपंगांची मोफत तपासणी करण्यात येऊन १४५ लाभार्थ्यांना मोफत कृत्रिम साहित्य व साधनांचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दिपेंद्रसिंह कुशवाह, अपर जिल्हाधिकारी श्री. सोमनाथ गुंजाळ, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. डी. डी. शिंदे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संतोष धोत्रे, हरिजन सेवक संघाचे श्री. झुंबरलाल शर्मा, बधीर पुनर्वसन संस्थेचे अध्यक्ष डॉ. अरुण साळुंखे, प्रकल्प संचालक श्री. विजय कान्हेकर, समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर आदींची उपस्थिती होती.

८.४ **जळगांव, दिनांक २१ ते २५ जुलै, २०१० :-** जळगांव जिल्हयातील शासकीय संमिश्र अपंग बहुउद्देशीय केंद्र, सिंधी कॉलनी, जळगांव येथे महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने विविध प्रवर्गातील अपंगांची मोफत तपासणी व कृत्रिम अवयव साधने वाटपाचे शिबिर संपन्न झाले. या शिबिरात २३० लाभार्थ्यांची तपासणी करण्यात येऊन १७० लाभार्थ्यांना मोफत कृत्रिम अवयव व साधनाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला मनपा आयुक्त श्री. रामनाथ सोनवणे, जिल्हाधिकारी, श्री. निजनकुमार सुधांशु, डॉ. अस्मिता पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. निरुपमा डांगे, समाज कल्याण अधिकारी डॉ. पी. सी. शिरसाट, श्री. भरत चौधरी, प्रकल्प संचालक श्री. विजय कान्हेकर, समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर आदींची उपस्थिती होती.

८.५ **औरंगाबाद, दिनांक २२ जुलै, २०१० :-** औरंगाबाद येथे जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र व जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयातील विविध प्रवर्गातील २०० अपंगांची मोफत तपासणी करण्यात येऊन १७० लाभार्थ्यांना मोफत कृत्रिम साहित्य व साधनाचे वाटप करण्यात आले. यात प्रामुख्याने जयपूर फुट, कॅलिपर्स, कुबडया, श्रवणयंत्र, अंध काठी, बेल किट, तीनचाकी सायकल, व्हीलचेअर इत्यादी साहित्यांचा समावेश होता. कार्यक्रमात उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मुकीम देशमुख, जिल्हा परिषद समाजकल्याण अपंग विभागाचे श्री. गायकवाड, समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर, समन्वयक श्री. राजाभाऊ गोकुळअष्टमी, सोयगावचे गटविकास अधिकारी, श्री. दाभाडे, व्यवस्थापक श्री. संतोष राठोड आदींची उपस्थिती होती.

८.६ **जालना, दिनांक २७ ते ३१ जुलै, २०१० :-** श्री. गुरु गणेश दृष्टीहीन विद्यालय, शिवाजी चौक, जालना येथे जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, समाजकल्याण (अपंग विभाग), जिल्हा परिषद, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयातील विविध प्रवर्गातील १५० अपंगांची मोफत तपासणी करण्यात येऊन १०० लाभार्थ्यांना मोफत कृत्रिम साहित्य व साधनाचे वाटप करण्यात आले. यात प्रामुख्याने जयपुर फूट, कॅलिपर्स, कुबडया, श्रवणयंत्र, अंध काठी, बेल किट, तीनचाकी सायकल, व्हीलचेअर इत्यादी

साहित्याचा समावेश होता. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी श्री. विश्वास ठाकूर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुनिल पाटील, समाजकल्याण अधिकारी श्री. जितेंद्र सोनवणे, सभापती श्री. राजेश राठोड, ज्ञावक संघाचे अध्यक्ष श्री. विनयकुमार कोठारी, उपाध्यक्ष श्री. रमेशचंद्र सकलचा, सचिव श्री. राजेंद्र ओस्तवाल, विश्वस्त श्री. मदनलाल गादीया, श्री. विरेंद्रकुमार धोका, श्री. सुनिलकुमार चोरडीया, श्री. कचरुलाल कुंकुलोळ, प्रकल्प संचालक श्री. विजय कान्हेकर, समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

८.७ **नागपूर, दिनांक २० ते २१ ऑगस्ट, २०१०** :- नागपूर येथे कोशीश फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय न्यासानुसार मतिमंद, बहुविकलांगता, सेरेब्रल पाल्सी, ऑटीझम अशा प्रकारचे अपंगत्व असलेल्या व्यक्तींना आरोग्य सेवेचा लाभ घेण्यास प्रवृत्त करणे, अपंगत्व असलेल्या व्यक्तींचे आरोग्य व जीवनमानाची गुणवत्ता वाढविणे या प्रमुख उद्देशाने केंद्र शासनाच्या निरामय आरोग्य विमा योजना शिबिराचे आयोजन करण्यात आले. एक लाख रुपये विमा योजनेसाठी हे आयोजन होते असे मंचाचे संघटक श्री. अभिजीत राऊत यांनी सांगितले. शिबिरात एकूण ४७५ अपंग व्यक्तींनी सहभाग नोंदविला. शिबिरात मा. जिल्हाधिकारी श्री. प्रविण दराडे, श्री. गिरीष गांधी, श्री. विजय कान्हेकर, श्री. सलील देशमुख, ज्येष्ठ पत्रकार श्री. बाळ कुळकर्णी, मुख्याधिपिका सिस्टर ज्योत्स्ना आदि मान्यवरांची उपस्थिती होती.

८.८ **औरंगाबाद, दिनांक १० ऑक्टोबर २०१०** :- जिल्हा परिषद औरंगाबाद, महात्मा गांधी संघ संचालित अपंग पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने नॅशनल अध्यापक विद्यालय, सिल्लोड येथे सिल्लोड तालुक्यातील विविध प्रवर्गातील १९० अपंग लाभार्थ्यांची मोफत तपासणी करण्यात येऊन त्यापैकी ११० लाभार्थ्यांना कृत्रिम अवयव व साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला नॅशनल अध्यापक विद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी श्री. अब्दुल कदीर बेग, उपनगराध्यक्ष श्री. खांडवे, श्री. के. आर. तौमर, प्रा. आरिफ बेग, अपंग पुनर्वसन केंद्राचे समन्वयक संस्थेचे पदाधिकारी इ. उपस्थित होते.

८.९ **नागपूर, दिनांक १४ ऑक्टोबर २०१०** :- १४ ऑक्टोबर २०१० रोजी हिस्लॉप कॉलेज, नागपूर येथे एक दिवसीय 'मानसशास्त्र तज्ज्ञांची कार्यशाळा' आयोजित करण्यात आली. अपंग पुनर्वसन क्षेत्रामध्ये मतिमंद मुलांच्या बध्दीगुणांक मापनात अनेक त्रुटी आणि भिन्नता आढळून येत आहे. त्यामुळे मानसशास्त्र तज्ज्ञांनी या क्षेत्रामध्ये गुणवत्ता पूर्ण सेवा द्यावी, मानसशास्त्र तज्ज्ञांची गुणवत्ता वाढविण्याकरिता अपंग हक्क विकास मंचाच्या माध्यमातून मतिमंद, ऑटीझम, सेरेब्रल पाल्सी व बहुविकलांग या प्रकारामध्ये मानसशास्त्रीय चाचणी बुध्दीगुणांक मापनाची गरज असते पण या क्षेत्रामध्ये आर.सी.आय. रजिस्टर्ड मानसशास्त्र तज्ज्ञांची कमी असल्याने या चाचणीमध्ये गुणवत्ता आढळत नाही व त्यामुळे यामध्ये दखल घेतली जात नाही. या विषयानुसार मानसशास्त्रीय चाचणीची गुणवत्ता वाढविणे व अपंग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि वैद्यकीय पुनर्वसनामध्ये मदत व्हावी या हेतूने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे उद्‌घाटन प्रसिध्द मनोरोगतज्ज्ञ डॉ. चंद्रकांत तिवारी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रा. हेमंत यावलीकर, प्राध्यापिका डॉ. माला सिंग उपस्थित होत्या. या कार्यशाळेचा लाभ नागपूर विद्यापीठाअंतर्गत येणा-या १५० मानसशास्त्राच्या विद्यार्थ्यांना झाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. दिनेश मासोदकर तर आभार श्री. संजय पुसाम यांनी केले.

८.१० **नागपूर, दिनांक २ नोव्हेंबर २०१०** :- स्विकार मतिमंद मुलांच्या पालकांची संघटना व कोशिश फाऊंडेशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिवोदय मतिमंदांची विशेष शाळा, एस.एफ.एस. शाळेजवळ नागपूर येथे दि. २ नोव्हेंबर २०१० रोजी 'निरामय आरोग्य विमा वितरण' समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी तर

प्रमुख अतिथी म्हणून दैनिक लोकसत्ताचे विदर्भ आवृत्तीचे संपादक श्री. प्रवीण बर्दापूरकर, समाल कल्याण अधिकारी श्री. सुरेंद्र पवार, सर्व शिक्षा अभियानचे राज्य समन्वयक श्री. अजय काकडे, स्वीकारचे अध्यक्ष श्री. बोबडे, कोशीश फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री. सलील देशमुख, रोटरी क्लबचे श्री. राजेंद्र साहू, जिवोदय शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर ज्योत्स्ना इ. मान्यवर उपस्थित होते. यावेळी जिवोदय मतिमंद शाळेच्या विशेष मुला-मुलींनी अतिशय सुंदर तीन नृत्य सादर केली. त्यानंतर ४५७ विद्यार्थ्यांना अतिथींच्या हस्ते एक लक्ष रुपयांचे निरामय विम्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला मोठया प्रमाणात पालक आणि त्यांचे पाल्य तसेच सामाजिक क्षेत्रातील विविध मंडळी उपस्थित होती.

८.११ **परभणी, दिनांक १२ व १३ डिसेंबर २०१० :-** सामाजिक न्याय विभाग परभणी, महात्मा गांधी सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने परभणी येथील स्वा. सै. रामराव कान्हेकर मूकबधिर व अस्थिव्यंग विद्यालयात विविध प्रवर्गातील १३५ लाभार्थ्यांची तपासणी करण्यात येऊन पैकी ८८ लाभार्थ्यांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप करण्यात आली. या कार्यक्रमाला आ. सुरेश देशमुख, माजी खासदार श्री. शेषराव देशमुख, आ. संजय जाधव, ॲड. गौतम भालेराव, समाज कल्याण अधिकारी श्री. सोनावणे, संस्थेचे मिलिंद श्री. कान्हेकर, श्री. राजाभाऊ गोकुळअष्टमी, मंचाचे समन्वयक श्री. विजय कान्हेकर आदि मान्यवर उपस्थित होते.

८.१२ **नागपूर, दिनांक २७ जानेवारी २०११ :-** जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र नागपूर आणि जिवोदय मतिमंद मुलांची शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ जानेवारी २०११ रोजी जिवोदय विशेष शाळा, नागपूर येथे 'पालकांची व्यथा' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विशेष मुलांच्या पालकांना आपल्या पाल्यांच्यादृष्टीने येणारे प्रश्न, भविष्यातील चिंता, अडचणी आणि त्यांचे पुनर्वसन या दृष्टीने पालकांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे मिळण्यासाठी तसेच त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी पालकांची व्यथा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मंचाच्या संयोजक मा. सौ. सुप्रिया सुळे, प्रसिध्द बालरोग तज्ञ डॉ. उदय बोधनकर, मंचाचे समन्वयक श्री. दत्ता बाळसराफ, श्री. विजय कान्हेकर, नवमहाराष्ट्र युवा अभियानचे संघटक श्री. निलेश राऊत, कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री. सलील देशमुख, समाजकल्याण अधिकारी श्री. सुरेंद्र पवार इ. मान्यवर उपस्थित होते. मतिमंद मुलांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यातील एकल नृत्य व समूह नृत्यांनी अतिथींचे मन वेधले. यानंतर उपस्थित सुमारे ३५० विशेष मुलांच्या पालकांच्या विविध प्रश्नांचे समाधान मा. सौ. सुप्रिया सुळे यांनी केले व विशेष मुलांच्या सादरीकरणाचे कौतुकही केले. अतिथींचे आभार जिवोदय विशेष शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर ज्सोत्स्ना यांनी मानले.

८.१३ **नागपूर, दिनांक २७ ते २९ जानेवारी २०११ :-** महाराष्ट्र राज्य पातळीवर २५ विशेष शिक्षक प्रशिक्षण केंद्रा अंतर्गत शिक्षण घेत असलेल्या ३५० विद्यार्थ्यांना अपंग पुनर्वसन क्षेत्रातील अपंग कायदा १९९५, आर.सी.आय ॲक्ट, राष्ट्रीय ट्रस्ट ॲक्ट, विविध सरकारी योजना, शैक्षणिक पर्याय, अपंगांविषयी माहिती, शिघ्र हस्तक्षेप, व्यावसायिक प्रशिक्षण तसेच अपंगांविषयक शिक्षणातून रोजगाराच्या विविध संधी इत्यादी संबंधित राज्य/राष्ट्रीय पातळीवर तज्ञ व्यक्तींमार्फत विविध योजनांबद्दल मार्गदर्शन करणे तसेच त्यांच्यासाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत असलेले विशेष फिरस्ती शिक्षकांच्या सुमारे १००० रिक्त पदांची प्रवर्गनिहाय माहिती देणे व त्यांना सहकार्य करणे, त्याकरिता अपंग हक्क विकास मंच, जिल्हा पुनर्वसन केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७, २८, २९ जानेवारी २०११ रोजी नागपूर येथे आयोजित राज्यस्तरीय तीन दिवसीय 'विशेष शिक्षक प्रशिक्षणार्थी गुणवत्ता प्रशिक्षण' कार्यशाळा संपन्न झाली.

कार्यशाळेचे उद्घाटन मंचाच्या संयोजक मा. सौ. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते झाले. नवमहाराष्ट्र युवा अभियानचे संघटक श्री. निलेश राऊत, कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री. सलील देशमुख, समाजकल्याण अधिकारी श्री. सुरेंद्र पवार उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत मंचाच्या संघटकांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंचाचे समन्वयक श्री. विजय कान्हेकर तर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याची भूमिका मंचाचे समन्वयक श्री. दत्ता बाळसराफ यांनी मांडली. समाजकल्याण अधिकारी श्री. सुरेंद्र पवार, प्रसिध्द बालरोग तज्ञ डॉ. उदय बोधनकर यांनी यावेळी आपले विचार व्यक्त केले. समारोपाप्रसंगी जिल्हाधिकारी श्री. प्रविण दराडे आणि इतर मान्यवरांच्या हस्ते कार्यशाळेच्या स्मरणिकेचे प्रकाशन झाले. यावेळी विविध प्रशिक्षणार्थ्यांनी कार्यशाळेविषयी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. दिनेश मासोदकर तर आभार प्रदर्शन श्री. संजय पुसाम यांनी केले. कार्यशाळेला डॉ. विनोद आसुदानी, डॉ. राजेश आसुदानी, डॉ. संदिप तांबे, प्रा. गायत्री आहुजा, श्री. सुहास काळे, श्री. रविंद्र गोखले, डॉ. सदानंद थोटे, सर्व शिक्षा अभियानचे राज्य समन्वयक श्री. अजय काकडे, डॉ. सोनल, श्रीमती वर्षा भगत, श्री. सुहास कर्णिक, डॉ. शिरीष देशपांडे, श्री. क्षितीज यामिनी श्याम, श्रीमती मोनिका पंजाबी वर्मा इत्यादी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

अहवाल कालावधीमध्ये मुख्य कार्यालयात तसेच संयोजक मा. सौ. सुप्रिया सुळे यांच्याशी प्रत्यक्ष १५० अपंग व्यक्तींनी विविध समस्याबाबत (नोकरी, स्वयंरोजगार, स्टॉल इत्यादींसाठी) भेट घेतली. त्यातील ६० अपंग व्यक्तींना आपल्या कार्यालयातून संबंधितांना शिफारस पत्र देण्यात आली. १०० अपंग व्यक्तींना २०० चौरस फूट जागा मिळण्याबाबतचा शासन निर्णय व पत्र देण्यात आले. एकूण २५० अपंग व्यक्तींना कार्यालयामार्फत सहकार्य व मार्गदर्शन करण्यात आले.

## ९.९ वसुंधरा कक्ष (पर्यावरण संवर्धन अभियान) :-

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अंतर्गत वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान या नावाने पर्यावरणावर काम करणा-या विभागाची स्थापना करण्यात आली आहे. सौ. सुप्रिया सुळे या विभागाच्या निमंत्रक आहेत. श्री. दत्ता बाळसराफ संयोजक म्हणून काम पाहतात तर श्री. प्रशांत शिंदे, श्री. अमेय जगताप आणि श्री. सुरेश पाटील हे या विभागाचे समन्वयक आहेत. महाराष्ट्रातील पर्यावरणाचे प्रश्न आणि त्याची उकल करण्यासाठी समन्वयकाची भूमिका बजावणे हा या विभागाच्या कामाचा मुख्य उद्देश आहे.संपूर्ण जगाला ग्रासून टाकणा-या हवामान बदलाचे महाराष्ट्राच्या पर्यावरणावर होणारे परिणाम सर्वांच्या लक्षात आणून देण्याचे काम या विभागाने हाती घेतले आहे. दि. ६ मार्च २०१० रोजी घेण्यात आलेल्या हवामान बदलविषयक राज्यस्तरीय परिषदेपासून या कामाला सुरुवात झाली. दि. ५ आणि ६ जून २०१० रोजी आंतराष्ट्रीय पर्यावरण दिनानिमित्त पुण्यामध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने 'हवामान बदल आणि शहरीकरण' या प्रश्नावर राज्यस्तरीय परिषद घेण्यात आली. या परिषदेमध्ये महाराष्ट्रातील विविध महानगरपालिकांचे नगरसेवक, पर्यावरण विषयक संस्था-संघटना व कार्यकर्ते सहभागी झाले होते. ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या हस्ते अभियानातर्फे तयार करण्यात आलेल्या 'हवामान बदल आणि महाराष्ट्र' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकामध्ये हवामान बदलाचा शेती, पाणी, जैवविविधता, शहरीकरण आणि लोकशिक्षणाशी संबंध लक्षात घेऊन त्याबाबत धोरण निश्चित करण्यासाठी शासनाला उपयुक्त शिफारशी करण्यात आल्या आहेत.

९.१ **वृक्षारोपण** आणि **वृक्षसंवर्धन** :- वसुंधरा अभियानचे पुण्यातील समन्वयक श्री. अमेय जगताप यांची युथ टू युथ फाऊंडेशन आणि मुंबईतील समन्वयक श्री. प्रशांत शिंदे यांची सृष्टीज्ञान संस्था यांनी पुणे व मुंबईत स्थानिक वृक्ष प्रजातींचे संवर्धन करण्यासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचे काम हाती घेतले आहे. त्याचबरोबर वृक्षारोपणाचे महत्त्व आणि पध्दत याविषयी जागृती करण्यासाठी वसुंधरा अभियानचे मार्गदर्शक श्री. वसंत टाकळकर यांनी लिहिलेला अभ्यासपूर्ण लेख श्री. अभिजीत घोरपडे यांनी लोकसत्ता वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केला.

९.२ **पर्यावरण शिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रमः-** वसुंधरा अभियान आणि सृष्टीज्ञान संस्थेच्या संयुक्त विद्यमाने मुंबईतील नागरिकांसाठी पर्यावरण शिक्षण, प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविण्यात आला. पर्यावरणातील जैवविविधता, माती, पाणी, हवा, जंगल, पर्यावरण विषयक चळवळी, कायदे यांची माहिती देणारे अभ्यास संच आणि पर्यावरणीय महत्व असलेल्या स्थळांना भेटी असे या अभ्यासक्रमाचे स्वरुप होते. दि. २८ जानेवारी २०११ रोजी घेण्यात आलेल्या हवामान बदलविषयक कार्यशाळेमध्ये या अभ्यासक्रमाचा समारोप झाला आणि सहभागींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

९.३ **म्हसवंडी गावाला भेट :-** दि. २० सप्टेंबर २०१० रोजी मा. सौ. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली वसुंधरा अभियानातर्फे अहमदनगरमधील म्हसवंडी या पर्यावरणसमृध्द गावाला भेट देण्यात आली. वसुंधरा अभियानातर्फे या अभ्यास दौ-यात श्री. सदा डुंबरे, श्री. वसंत टाकळकर, श्री. दत्ता बाळसराफ, श्री. अभिजीत घोरपडे, श्री. अमेय जगताप आणि श्री. प्रशांत शिंदे सहभागी झाले होते. ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ श्री. वसंत टाकळकर यांनी अथकपणे केलेल्या प्रयत्नांतून आणि गावक-यांच्या सक्रीय पुढाकारामुळे म्हसवंडी गावाचे बारमाही हिरवे रुप पाहता येते.

९.४ **हवामानबदल विषयक कार्यशाळा :-** शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये हवामान बदलाच्या परिणामांविषयी जागृती होण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यशाळांमध्ये वसुंधरा अभियानचे कार्यकर्ते मार्गदर्शन करीत आहेत. दि. ७ जानेवारी २०११ रोजी चिपळूणमध्ये डी.बी.जे. महाविद्यालय आणि श्रमिक सहयोग संस्थेने विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या कार्यशाळेत श्री. प्रशांत शिंदे यांनी मार्गदर्शन केले. दि. १४ जानेवारी २०११ रोजी जुन्नरमधील श्री शिवछत्रपती महाविद्यालयातर्फे आयोजित कार्यशाळेमध्ये श्री. अमेय जगताप, श्री. अभिजीत घोरपडे आणि श्री. प्रशांत शिंदे यांनी स्लाईड शो सादर केले. दि. २८ जानेवारी २०११ रोजी सृष्टीज्ञान संस्थेतर्फे आयोजित शिक्षकांच्या कार्यशाळेत हवामान बदलविषयक प्रशिक्षण देण्यात आले.

९.५ **पर्यावरणविषयक साहित्य संकलन :-** वसुंधरा अभियानच्या कार्यात पर्यावरणावरील पुस्तके, मासिक, व्हिडीओ फिल्म इ. साहित्याचे संकलन करणे आवश्यक आहे. त्यासाठी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी संस्थेकडून जवळजवळ साडेसात हजार रुपये किंमतीची पुस्तके देणगीरुपाने प्राप्त करण्यात आली.

९.६ **महिला आणि पर्यावरण कार्यशाळा :-** महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि वसुंधरा अभियानच्या संयुक्त विद्यमाने दि. २९ ऑक्टोबर २०१० रोजी महिला आणि पर्यावरण या विषयावर महिलांची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत राष्ट्रवादी पक्षाच्या महिला विभागातर्फे महिला कार्यकर्त्या, पदाधिकारी आणि महानगरपालिका सदस्य महिला सहभागी झाल्या होत्या. या कार्यशाळेमध्ये श्रीमती संगीता खरात, श्रीमती श्रेया भानप, श्रीमती प्रतिमा उके आणि श्री. दत्ता बाळसराफ यांनी मार्गदर्शन केले.

## १०.१ पुणे विभागीय केंद्र :-

१.१ **अंटार्टिकाची सफर :-** पुणे विभागाचे कोषाध्यक्ष श्री. शांतीलाल सुरतवाला यांनी अंटार्टिकांची सफर केली होती. त्यावर 'अंटार्टिका एक अविस्मरणीय अनुभव' हा कार्यक्रम आयोजण्यात आला. दि. १३ एप्रिल २०१० रोजी एस.एम.जोशी सभागृहांत संपन्न कार्यक्रमात डीव्हीडी द्वारे श्री. सुरतवाला यांनी आपले अनुभव कथन केले. वरील विषयांवरील पुस्तकाचे प्रकाशन श्री.शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे हस्ते झाले.

१.२ **परिसंवाद** :- महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त 'गेल्या पन्नास वर्षात काय मिळवलंय, काय गमावलंय आणि काय मिळवायचे आहे ?' या विषयावर ४ मे २०१० रोजी एम.एम. जोशी सभागृहात परिसंवादाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी डॉ. पी.बी. पाटील होते. परिसंवादांत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. शां. ब. मुजूमदार, प्रा. सुहास पळशीकर, पुणे विद्यापीठ (राज्यशास्त्र विभाग) आणि आमदार श्री. उल्हास पवार यांनी आपले विचार मांडले. प्रास्ताविक श्री. अंकुशराव काकडे, आभार प्रदर्शन श्री. शांतीलाल सुरतवाला यांनी केले तर सूत्रसंचालन श्री. जयराम देसाई यांनी केले.

१.३ **वक्तृत्व व निबंध स्पर्धा** :- महाराष्ट्र राज्याचे निर्मितीस दि. १ मे २०१० रोजी पन्नास वर्षे पूर्ण झाल्याचे निमित्ताने या सुवर्ण महोत्सवी वर्षात पुणे केंद्रातर्फे महाराष्ट्राचा मंगल कलश आणणा-या 'यशवंतराव चव्हाणांचे जीवन व कार्य' या विषयावर कॉलेजचे विद्यार्थ्यांसाठी 'वक्तृत्व व निबंध स्पर्धा' आयोजित केल्या. वक्तृत्वामध्ये श्री. मकरंद रामराव गिरी, संज्ञापना विभाग पुणे विद्यापीठ, श्री. गणेश रामचंद्र ढेबे, पुणा नाईट ज्युनिअर कॉलेज व श्री. निलेश अजय काटकर, सरस्वती मंदिर संस्था यांना अनुक्रमे पहिली तीन पारितोषके प्रत्येकी रु. १,०००/-, रु. ७५०/- व रु. ५००/- देण्यात आली. निबंध स्पर्धा भिडे प्रतिष्ठानचे सहयोगाने पार पाडण्यात आल्या. त्यांत सर्वश्री काटकर, आदमाने आणि कुमारी शेख या बहुधनी महाविद्यालय, न्यु विधी महाविद्यालय व महाराष्ट्र कॉस्मो पॉलीटन एज्युकेशन सोसायटीचे ट्रेनिंग कॉलेज या महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक पटकावले.

१.४ **बालनाटय महोत्सव** :- बालगोपाळांसाठी खास म्हणून दि. १ जून ते ३ जून रोजी दररोज सकाळी १० ते १२ यावेळेत भरतनाटय मंदिर, पुणे येथे अनुक्रमे अटक मटक चवळी चटक, हिमगौरी आणि सात बुटके व वुई वॉन्ट चार्ली चाप्लीन या तीन नाटिका हाऊसफूल गर्दीत पार पडल्या. कार्यक्रमाचे आयोजन श्री. सुरतवाला यांनी केले.

१.५ **वारक-यांना अल्पोपहार, चष्मे व औषध वाटप** :- सालाबादप्रमाणे विभागीय केंद्र आणि सूरतवाला चॅरिटेबल ट्रस्ट यांचे संयुक्त विद्यमाने संत श्री ज्ञानेश्वर महाराज व जगद्‌गुरु तुकाराम महाराज पालखी सोहळया समवेत आलेल्या वारक-यांसाठी बुधवार दि. ७ जुलै २०१० रोजी अल्पोपहार, औषधे व चष्मे वाटपाचा कार्यक्रम श्री. सुरतवाला, श्री. अंकुशराव काकडे, डॉ. अस्मिता शेवाळे, प्रा. पंडित इत्यादींचे उपस्थितीत पार पडला.

१.६ **शां. ब. मुजूमदार अमृत महोत्सव समारंभ** :- पद्‌मश्री शां. ब. अमृत महोत्सव समारंभ, पुणे विभागाचे वतीने दि. १४ ऑगस्ट २०१० रोजी यशवंतराव चव्हाण नाटयगृह, कोथरुड, पुणे येथे संपन्न झाला. त्यानिमित्त मा. श्री. शरदराव पवार, केंद्रीय कृषि मंत्री यांच्या हस्ते इंटरनॅशनल सेंबॉयसिय विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मुजूमदार यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री. मोहन धारिया यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. निगवेकर होते. तसेच कार्यक्रमाला पुणे महापौर श्री. राजपाल, श्री. अंकुशराव काकडे, डॉ. ताकवले, श्री. सुरतवाला, श्री. निलेश निकम, सभागृह नेता, पुणे महानगरपालिका हे हजर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. अंकुशराव काकडे यांनी तर आभार प्रदर्शन श्री. सुरतवाला यांनी कले. श्री. जयराम देसाई यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

१.७ **वक्तृत्व व निबंध स्पर्धा** :- पुण्यामध्ये २०१०-११ या शैक्षणिक वर्षाचे सुरवातीस महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या फ्रेशर्स बेधुंद पार्टीने बरीच खळबळ माजविली. त्यावर सेंबॉयसिस मॅनेजमेंट, आपटे महाविद्यालय इत्यादी शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थी




मा. यशवंतराव चव्हाण यांच्या देवनागरी लिपीतील स्वाक्षरीसह पोस्ट विभागाने तयार केलेला ब्लो-अपचे उद्‌घाटन करताना मा. श्रीमती प्रतिभा पाटील, राष्ट्रपति, भारत सरकार, केंद्रिय कृषिमंत्री मा. श्री. शरद पवार, मुख्यमंत्री, मा. श्री. पृथ्वीराज चव्हाण, केंद्रीय दळणवळण राज्यमंत्री, मा. श्री. गुरुदास कामत.




मा.यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विशेष टपाल तिकिटाच्या उद्‌घाटन प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित सन्माननीय मान्यवर.



ज्येष्ठ उर्दू शायर श्री. बशर नवाज यांच्यावरील माहितीपटाच्या सीडीचे विमोचन करताना केंद्रिय कृषिमंत्री व अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, मा. श्री. शरद पवार, सोबत कार्याध्यक्ष मा. श्री. अरुण गुजराथी, मा. श्री. आप्पासाहेब उर्फ सा.रे.पाटील, उपाध्यक्ष मा. डॉ. रविंद्र बापट व सरचिटणीस मा. श्री. शरद काळे.



ज्येष्ठ उर्दू शायर मा. श्री. बशर नवाज यांच्याशी चर्चा करताना विश्वस्त मा. सौ. सुप्रिया सुळे.



शिक्षण विकास मंचच्या वतीने 'उपक्रम, वेचक - वेधक' या पुस्तकाचे प्रकाशन करतांना मा. श्री. जयंत पाटील, मंत्री, ग्रामविकास विभाग सोबत मा. श्रीमती फौंजिया खान, राज्यमंत्री, शालेय शिक्षण विभाग, संयोजिका श्रीमता कुमुद बन्सल व इतर मान्यवर.




महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त प्रतिष्ठानच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेला सांस्कृतिक समारोह.




महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त प्रतिष्ठानच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेला सांस्कृतिक समारोह.




महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त प्रतिष्ठानच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेला सांस्कृतिक समारोह.




नवमहाराष्ट्र युवा अभियान,
महाराष्ट्र महिला व्यासपीठ,
महाराष्ट्र सोसायटी वेल्फेअर असोसिएशन
सहकारी गृहनिर्माण संस्था
'व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा' तसेच
महिला व्यासपीठ व
कॉलेज ऑफ होमसायन्स निर्मला निकेतन
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
'गृहव्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळे' प्रसंगी
व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.



ज्येष्ठ नागरिक आनंद मेळाव्याचे
प्रमुख पाहुणे मा. श्री. मधु मंगेश कर्णिक
यांचे स्वागत करताना
सरचिटणीस मा. श्री. शरद काळे.




ज्येष्ठ नागरिक आनंद मेळाव्याच्या
सत्कारमूर्ती समवेत
सरचिटणीस मा. श्री. शरद काळे.




विभागीय केंद्र लातूरच्या वतीने
राजर्षी शाहू महाराज यांच्या
जयंतीप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून
विचार मांडताना
प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे सोबत
केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे.




विभागीय केंद्र कराडच्या
नवमहाराष्ट्र युवा अभियान मार्फत
मा. यशवंतराव चव्हाण यांच्या
जयंतीदिनी कराडमधील पदयात्रा.



विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने
आयोजित पर्यावरण शिक्षण शिबीराच्या
प्रसंगी केंद्राचे
अध्यक्ष.मा.श्री.विनायकराव पाटील,
प्रतिष्ठानचे सरचिटणीस
मा. श्री. शरद काळे व इतर.



विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने आयोजित माजी कुलगुरु डॉ. श. नू. पठाण यांच्या गौरव ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यात मनोगत व्यक्त करताना केंद्राचे अध्यक्ष मा. श्री. गिरिश गांधी.




महाराष्ट्र महिला व्यासपीठामार्फत आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमप्रसंगी संयोजिका, सौ. रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका श्रीमती ममता कानडे व इतर.




विभागीय केंद्र कोंकणच्या वतीने आयोजित जिल्हा केंद्र ठाणेच्या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी केंद्राचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, सचिव श्री. अनिल नेवाळकर, आमदार श्री. किसन कथोरे.

सुधारणा विषयक कार्यक्रम कार्यान्वित केले. त्यांच्याकडून स्फूर्ती घेऊन व भिडे प्रतिष्ठान यांचे संयुक्त विद्यमाने कॉलेज विद्यार्थ्यांसाठी महात्मा गांधी यांचे विचार व कार्य या विषयावर एक वक्तृत्व व निबंध स्पर्धा आयोजित केली. सदर कार्यक्रम दि. ३० ऑक्टोबर २०१० रोजी पार पडला. वक्तृत्व स्पर्धेत २२ विद्यार्थ्यांनी भाग घेतला तर निबंध स्पर्धेत ५६ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. निबंध परीक्षण मराठी ग्रंथोतेजक सभेचे परितोषक विजेते श्री. विद्याधर भिडे यांनी केले तर वक्तृत्व स्पर्धेचे मूल्यमापन डॉ. नेलकर, माजी उपप्राचार्य वाडीया कॉलेज, प्रा. पंडित आणि सौ. विद्या शं. भिडे यांनी केले. निबंध स्पर्धा पारितोषक प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे, प्रथम पारितोषिक - श्री. विवेक जाधव, काळभोर महाविद्यालय, द्वितीय पारितोषिक - श्री. अमोल बागूल, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, तृतीय पारितोषिक - अक्षय मोरे, तुळजाराम चतूरचंद महाविद्यालय बारामती. वक्तृत्व स्पर्धा पारितोषक प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे, प्रथम पारितोषिक - श्रीमती हर्षदा काटे, हुजूर पागा माहवद्यालय पुणे, द्वितीय पारितोषिक - श्री. अशोक शिंदे, न्यु आर्टस् ॲन्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर तृतीय पारितोषिक - श्री. जयसिंग शिंदे, पुणे विद्यापीठ.

१.८ **दिवाळी पहाट :-** सालाबादप्रमाणे दिवाळी पहाट हा गाण्यांचा कार्यक्रम दि. ५ नोव्हेंबर २०११ रोजी पार पडला. त्यावेळी संस्कृत पंडित वसंतराव गाडगीळ यांचा सत्कार शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदरे यांचे हस्ते करणेत आला. कार्यक्रमास श्री. अंकुशराव काकडे, श्री. सुरतवाला इत्यादी मान्यवर हजर होते.

१.९ **पर्वतीवर स्वारी :-** दिनांक १४ नोव्हेंबर २०१० रोजी दोन तासात जास्तीत जास्त वेळा पर्वती चढणे व उतरणे अशी स्पर्धा नेहमीप्रमाणे वृध्दांसाठी आयोजित केली होती. त्यामध्ये ९५ स्पर्धकांनी भाग घेतला. त्यांत ७६ पुरुष व १९ महिला होत्या. स्पर्धेमध्ये श्री. रामचंद्र दत्तात्रय कुलकर्णी (वय ९१) व श्रीमती वसुधा वसंत कुलकर्णी (वय ७८) या वयोवृध्द नागरिकांनी अनुक्रमे ९ व ६ फे-या दोन तासांत पूर्ण केल्या. गेली २५ वर्षे न चुकता पर्वतीवर येणा-या इतरांना दररोज व्यायामाचे धडे देणा-या हसतमूख श्री. सुधाकर भाटे यांना (वय ७१ वर्षे) 'पर्वती भूषण' हा रु. ११,०००/- चा पुरस्कार व मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. वय वर्षे ५० ते ६०, ६१ ते ७० व ७१ आणि पुढे या वयोगटांतील पुरष व महिला यांना पारितोषके व मानचिन्हाने दि. १२ डिसेंबर २०१० रोजी गौरवण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन ज्येष्ठ व्यंगचित्रकार श्री. मंगेश तेंडुलकर यांनी केले. सर्वात जास्त फे-या एकूण २० दोन तासामध्ये श्री. अशोक माधवराव आमणे, वय ५१ वर्षे यांनी मारल्या. कार्यक्रमाचे संयोजन श्री. शांतीलाल सुरतवाला यांनी केले. श्री. प्रकाश पायगुडे यांनी सूत्रसंचालन केले तर श्री. जयराम देसाई यांनी आभार मानले.

१.१० **आदर्श सोसायटी घोटाळा सनदी अधिका-यांची जबाबदारी :-** वरील विषयावर श्री. मोहन धारिया यांचे अध्यक्षतेखाली एक चर्चासत्र दि. २५ नोव्हेंबर २०१० रोजी भारत इतिहास संशोधन मंडळ सभागृहात आयोजित केले होते. चर्चासत्रात श्री. उल्हासदादा पवार, डॉ. कुमार सप्तर्षी, श्री. शरद अवस्थी (निवृत्त पोलीस सहाय्यक आयुक्त) ॲड. श्रीकांत शिरोळे, श्री. अंकुशराव काकडे आणि श्री. शांतीलाल सुरतवाला यांनी भाग घेऊन आपले विचार मांडले.

१.११ **दत्ता टोळ यांचा अमृतमहोत्सवी सत्कार :-** दि. २१ डिसेंबर २०१० रोजी विभागीय केंद्रातर्फे ज्येष्ठ बाल साहित्यिक श्री. दत्ता टोळ यांचा अमृत महोत्सवी सत्कार ज्येष्ठ साहित्यिक श्री. द. मा. मिरासदार यांचे हस्ते मानचिन्ह देऊन करण्यात आला. त्यावेळी मा. उल्हासदादा पवार, श्री. अंकुशराव काकडे, श्री. शंकर सावडा इत्यादी हजर होते.

**यशवंतराव चव्हाण चषक क्रिकेट स्पर्धा** :- प्रतिष्ठानतर्फे ट्वेन्टी-२० स्पर्धेत सूपर ओव्हरपर्यंत रंगलेल्या अंतिम सामन्यांत दहाड क्रिकेट क्लबने सुजनील क्रिकेट क्लबवर दि. १६ डिसेंबर २०१० रोजी मात करुन यशवंतराव चव्हाण चषक जिंकला. पुणे चॅम्पियन क्लबच्या रोहित करंजकर याला स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाज, दहाड क्रिकेट क्लबच्या नंदन कामत याला उत्कृष्ट गोलंदाज यासाठीच्या पुरस्काराने गौरविण्यात आले. पुणे म्हाडाचे अध्यक्ष श्री. अंकुश काकडे, श्री. शांतीलाल सुरतवाला, उपमहापौर श्री. प्रसन्न जगताप, शिक्षण मंडळ उपाध्यक्ष श्री. आप्पा रेणुसे यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिस वितरण करुन गौरविण्यात आले.

## १०.२ विभागीय केंद्र कराड

२.१ **वार्षिक सभा - दि. ८ एप्रिल २०१० :-** विभागीय केंद्र कराडची वार्षिक सभा केंद्राचे अध्यक्ष श्री. राम प्रधान, कार्याध्यक्ष, प्राचार्य पी. वी. पाटील आणि श्री. विलासरावजी पाटील यांच्या उपस्थितीत दि. ८ एप्रिल २०१० रोजी पार पडली. कराड जनता सहकारी बँकेचे प्रमुख श्री. विलासरावजी पाटील (वाठारकर) विभागीय केंद्र कराडला अनेक वर्षे करीत असलेल्या मदतीबद्दल त्यांचे खास आभार मानण्यात आले. महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात मान्यवरांच्या किमान ३० व्यक्तींची एक परिषद कराड, महाबळेश्वर अथवा अन्य ठिकाणी घ्यावी. या परिषदेत महाराष्ट्राच्या ५० वर्षात महाराष्ट्र शासनाने निर्णय, कायदे विविध योजनांची अंमलबजावणी त्याची फलप्राप्ती याची परखड चर्चा व्हावी अशी योजना आहे. श्री. विलासरावजी पाटील (वाठारकर) जनता सहकारी बँकेमार्फत रु. ५०,०००/- एका परिषदेचा खर्च करणार आहेत.

२.२ **डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती - दि. १४ एप्रिल २०१० :-** प्रजासत्ताक भारताच्या घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सौ. वेणुताई चव्हाण ट्रस्टमधील त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. मा. यशवंतरावजी चव्हाण यांनी पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून याच दिवशी सूत्रे स्वीकारली.

२.३ **जागतिक पुस्तकदिन - दि. ३० एप्रिल २०१० :-** सौ. वेणुताई चव्हाण संशोधन ग्रंथालयाच्यावतीने सौ. वेणुताई यांच्या स्मारकात जागतिक पुस्तक दिन साजरा करण्यात आला.

२.४ **महाराष्ट्र दिन - कामगार दिन - दि. १ मे २०१० :-** महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतरावजी चव्हाण यांनी १ मे १९६० रोजी मा. पंडित नेहरुंच्या हस्ते नव्या महाराष्ट्र राज्याची स्थापना केली त्याला १ मे २०१० ला ५० वर्षे पूर्ण झाली. सातारा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन श्री. विलासरावजी पाटील यांच्या हस्ते विरंगुळा निवासस्थानी ध्वजारोहण केले. चार दिवस आकर्षक विद्युत रोषणाई सर्व विरंगुळयाला करण्यात आली.

२.५ **सौ. वेणुताई यशवंतराव चव्हाण स्मृतिदिन - दि. १ जून २०१० (२७ वी पुण्यतिथी):-** मा. यशवंतराव व सौ. वेणुताई चव्हाण शास्त्रीय संगीताचे जाणकार होते. सौ. वेणुताईंची पहिली पुण्यतिथी विरंगुळयाशेजारच्या शिवाजी हायस्कूलच्या मैदानावर सूरश्री भीमसेन जोशी यांच्या शास्त्रीय संगीताने मा. यशवंतरावजींच्या साक्षीनेच झाली. याशिवाय सौ. वेणुताई सांस्कृतिक भवनाची सुरुवात मा. भीमसेन जोशी यांच्या शास्त्रीय संगीतानेच झाली. सौ. वेणुताईंच्या स्मृतिदिनी शास्त्रीय संगीताचाच कार्यक्रम आयोजित करण्याची परंपरा आम्ही जपत आहोत. यावर्षी १ जून २०१० ला डॉ. प्रकाश संगीत यांच्या शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम झाला. सौ. कांचन संगीत व त्यांचा मुलगा यांची साथ त्यांना होती. डॉ. प्रकाश संगीत यांच्या ३ पिढया संगीताच्या (शास्त्रीय) उपासक आहेत. डॉ. सौ. कांचनताई संगीत यांच्या 'कोथिंबीरीचा चाफा' या पुस्तकास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे.

२.६ **आदरणीय पी. डी. पाटील जयंती - दि. १ जुलै २०१० :-** आदरणीय पी. डी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त विभागीय केंद्र, कराड आणि सौ. वेणुताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराडमध्ये त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून सर्व सेवकांनी मनोभावे आदरांजली वाहिली.

२.७ **स्वातंत्र्य दिन - दि. १५ ऑगस्ट २०१० :-** महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विरंगुळा निवासस्थानावर विद्युत रोषणाई करण्यात आली. सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन आणि दि कराड जनता बँकेचे शिल्पकार श्री. विलासराव बापू पाटील (वाठारकर) यांच्या शुभहस्ते विरंगुळयात ध्वज फडकविण्यात आला.

२.८ **ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम (२०१०-२०११) :-** प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शिवाजी विद्यापीठाचा ग्रंथालय व्यवस्थापन अभ्यासक्रम (कोर्स) सुरु करण्यात आला. एकूण ३१ विद्यार्थी होते. १७ विद्यार्थी पास झाले. निकाल ५५ टक्के लागला.

२.९ **ति. विठामाता पुण्यतिथी - दि. १८ ऑगस्ट २०१० :-** १८ ऑगस्ट या त्यांच्या पुण्यतिथी निमित्त यशवंत शिक्षण संस्था देवराष्ट्रे आणि विभागीय केंद्र कराड यांच्या संयुक्त विद्यमाने देवराष्ट्रे येथे मोठया भावपूर्ण वातावरणात विठामाता पुण्यतिथी सोहळा भावपूर्ण वातावरणात पार पडला. ति. विठामातांच्या पुतळयास श्री. मोहनराव डकरे यांनी पुष्पहार घालून विनम्र अभिवादन केले. यशवंत शिक्षण संस्था देवराष्ट्रे आणि केंद्राच्यावतीने 'लेकी वाचवा हो' या अभिनव अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. केंद्राच्या सदस्या सौ. छायाताई पाटील यांचे अभ्यासपूर्ण सुश्राव्य व्याख्यान झाले. यशवंत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी व सचिव यांचीही भाषणे झाली. या कार्यक्रमास महिलांची उपस्थिती लक्षणीय होती (सुमारे ७००) देवराष्ट्रेमधील सर्वांना हा कार्यक्रम संस्मरणीय वाटला.

२.१० **आदरणीय पी. डी. पाटील यांची २ री पुण्यतिथी - दि. १७.९.२०१० :-** कराड नगरीचे शिल्पकार आदरणीय पी. डी. पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त विरंगुळयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन आणि त्यांच्या निवासस्थानी जाऊन आदरांजली वाहण्यात आली.

२.११ **राष्ट्रपिता महात्मा गांधी - दि. २.१०.२०१० :-** विभागीय केंद्र कराडच्या कार्यालयात केंद्राच्या व सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या सर्व सेवकांनी, वाचक मंडळी यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली.

२.१२ **मा. यशवंतराव चव्हाण यांची पुण्यतिथी** - दि. २५.११.२०१० :- भारताचे थोर नेते व महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रीतिसंगमावरील समाधीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. पृथ्वीराज चव्हाण यांनी पुष्पचक्र वाहिल्यानंतर त्यांनी सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टमधील मा. यशवंतरावजी चव्हाण आणि सौ. वेणुताई चव्हाण यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण केले. मा. मुख्यमंत्र्यांच्या समवेत मा. माणिकराव ठाकरे, ना. जयवंतराव पाटील, ना. पतंगराव कदम, ना. बाळासाहेब विखे पाटील, ना. सतेज पाटील, मा. कल्लाप्पाण्णा आवाडे, मा. आनंदराव पाटील, आ. बाळासाहेब पाटील, मा. खा. श्रीनिवासजी पाटील, आ. विक्रमसिंह पाटणकर, सौ. वेणुताई ट्रस्टचे विश्वस्त श्री. अशोकराव चव्हाण, श्री. सुनिल पवार, श्री. मानसिंगराव पाटील, चार्टर्ड अकाऊटंट, श्री. पी. एल. कुलकर्णी आदी मान्यवर हजर होते.

भूतपूर्व केंद्रीय मंत्री मा. आनंदराव चव्हाण व मा. यशवंतरावजी चव्हाण यांचा कॉलेज शिक्षणाच्या वेळी कसा ऋणानुबंध होता हे श्री. मोहनराव डकरे यांनी 'कृष्णाकांठ' या मा. यशवंतरावजींच्या आत्मचरित्रातील पुस्तकाच्या आधारे मुख्यमंत्र्यांना दाखवून दिले. मा. मुख्यमंत्र्यांनी स्वहस्ताक्षरात त्यांचा अभिप्राय पुस्तकात नोंदविला आहे. याच दिवशी सायंकाळी ४.३० वाजता शिवाजी शिक्षण संस्थेच्या सर्व महाविद्यालये, विद्यालये यातील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, आमदार, खासदार पदयात्रेने समाधीस्थळी गेले. सजविलेल्या बग्गीमध्ये मा. यशवंतरावजींची भव्य प्रतिमा ठेवण्यात आली होती. थोर साहित्यिक डॉ. आनंद पाटील, पुणे यांचे समाधीस्थळावरील पर्णकुटी समोर सुश्राव्य व्याख्यान झाले. भावपूर्ण वातावरणात सर्व कार्यक्रम पार पडला. रात्री १०.०० वाजता संस्कृती फाऊंडेशन (विश्वासराव ताम्हनकर) कराड यांचा 'माझा महाराष्ट्र' हा यशवंतरावजींच्या जीवनावरील राष्ट्रीय गीतांचा कार्यक्रम सौ. वेणुताई सभागृहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा. नामदार मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी दीपप्रज्वलन करुन केले. कार्यक्रम फारच चांगला झाला.

.१३ **मा. यशवंतराव चव्हाण यांचे ज्येष्ठ बंधू गणपतराव चव्हाण यांची जयंती व पुण्यतिथी कार्यक्रम - दि. १५.१२.२०१०:-**
दिनांक १५.१२.२०१० जन्मतारीख आणि मृत्यूची तारीख एकच असलेले मा. यशवंतरावजींचे ज्येष्ठ बंधू मा. गणपतराव बळवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. मा. गणपतराव चव्हाण यांचा यशवंतरावांच्या जडणघडणीत मोलाचा वाटा होता. ते सत्यशोधक समाजाचे पक्के समर्थक व कराडचे नगराध्यक्षही होते. नामांकित पैलवान म्हणूनही त्यांची ख्याती होती. कराड विविध कार्यकारी सोसायटीचे ते संस्थापक सदस्य व पहिले चेअरमन होते.

१४. मा. श्री. शरद पावार आणि सौ. प्रतिभाताई पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून (११ व १२ डिसेंबर २०१०) ...त्रे अभीष्टचिंतन करण्यात आले श्री. विलासराव पाटील (तांबवे) श्री. प्रकाशराव पाटील (शेणोली) व सर्व सेवक वर्ग उपस्थित होता.

१५. **भूमिपुत्र फाऊंडेशनची स्थापना दि. १५.१२.२०१०** :- स्वातंत्र्य चळवळीत १९४२ साली शेणोली स्टेशनजवळ रेल्वे ...ती गेली. स्वातंत्र्य सैनिक स्व. रामभाऊ बाळकू पाटील यांचे चिरंजीव श्री. प्रकाशराव पाटील यांनी 'भूमिपुत्र फाऊंडेशन' ...न करुन या स्मृती जपल्या आहेत. दि. १५.१२.२०१० ला हा कार्यक्रम विरंगुळयात झाला.

...६ **मा. यशवंतराव चव्हाण यांच्या टपाल तिकिटाची विक्री दि. २३.१२.२०१०** :- मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मरणार्थ ...न सरकारच्या पोस्ट खात्याने यशवंतरावजींचे छायाचित्र असलेले पोस्टाचे तिकीट (रु.५.००) काढले. याचा अनावरण ...भ भावपूर्ण अशा वातावरणात झाला. सन्माननीय माजी खासदार श्रीनिवासजी पाटील यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. ...राम बापू सहकारी बँकेचे चेअरमन श्री. शामराव पाटील, सौ. वेणुताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त श्री. अशोकराव चव्हाण, श्री. सुनिल पवार, डॉ. रा. गो. प्रभुणे, श्री. शंकराप्पा संसुद्दी, श्री. मानसिंगराव पाटील हजर होते. कराड शहरातील अनेक मान्यवर यावेळी हजर होते. सर्वांनी साहेबांच्या फोटोचे टपाल तिकीट विकत घेतले. पोस्ट खात्याने तिकीट विक्रीची सोय सौ. वेणुताई चव्हाण सांस्कृतिक भवनातच केली होती.

२.१७ **प्रजासत्ताक दिन - दिनांक २६.१.२०११** :- विभागीय कार्यालयातील झेंडावंदन श्री. जितेंद्र डुबल यांनी केले. सौ. वेणुताई ट्रस्टमधील झेंडावंदन विश्वस्त श्री. अशोकराव चव्हाण यांनी केले. श्री. प्रकाशराव पाटील (शेणोली) सर्व सेवक वर्ग याप्रसंगी हजर होते.

२.१८ राष्ट्रीय सणाच्या वेळी १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दिवशी महाराष्ट्रदिना दिवशी विरंगुळयात व सौ. वेणुताई चव्हाण ट्रस्टमध्ये राष्ट्रध्वज फडकविण्याची प्रथा सुरु केली आहे.

२.१९ राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या स्मृतिदिनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन श्रध्दांजली वहाण्यात आली. सर्व सेवक व वाचक वर्ग यावेळी हजर होते.

२.२० **मा. यशवंतरावजी चव्हाण यांची जयंती दि. १२ मार्च २०११** :- मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त प्रीतिसंगम बागेतल्या मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या समाधीवर नाम. श्री. अजित पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी पुष्पचक्र वाहून आदरांजली वाहिली. मा. आमदार श्री. बाळासाहेब पाटील, मा. श्री. श्रीनिवासजी पाटील, श्री. विलासराव पाटील-वाठारकर, श्री. सुनिल शामराव पाटील, श्री. प्रकाश बापू पाटील (सचिव शिवाजी शिक्षण संस्था) यांची प्रमुख उपस्थिती होती. आदरणीय पी. डी. पाटील गौरव प्रतिष्ठानच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे कराड शहरातील माध्यमिक व प्राथमिक शाळातील १२००० विद्यार्थ्यांना शब्द सुरांची (राष्ट्रीय गीतांनी) आदरांजली वाहिली. या सर्व मुलांना प्रतिष्ठानच्यावतीने खाऊचे वाटपही करण्यात आले. यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स सौ. वेणुताई चव्हाण कला, वाणिज्य महाविद्यालयातील प्राचार्य, अध्यापक, अध्यापिका अन्य सेवक वर्ग यांची पदयात्रा सकाळी ८.३० वाजता सौ. वेणुताई चव्हाण ट्रस्टपासून यशवंतरावजींच्या समाधी स्थळापर्यंत काढण्यात आली. अनेक ज्येष्ठ नागरिकही यात सामील झाले होते. नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या युवकानीही श्री. किरण भोसले व श्री. सुहेल वारस्कर यांच्या नेतृत्वाखाली सौ. वेणुताई चव्हाण ट्रस्टपासून समाधी स्थळापर्यंत पदयात्रा काढण्यात आली. समाधीस्थळ परिसरात झालेल्या सभेत केंद्राचे सचिव श्री. मोहनराव डकरे यांनी युवकांना मार्गदर्शन केले. काही युवकांनीही आपले मनोगत व्यक्त केले. सौ. वेणुताई चव्हाण सांस्कृतिक भवनात संस्कृति फाऊंडेशनचा (श्री. विश्वासराव ताम्हणकर) यांचा राष्ट्रीय गीत गायनाचा कार्यक्रम (सकाळी ११ ते २) झाला. मा. आमदार श्री. बाळासाहेब पाटील यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

## १०.३ विभागीय केंद्र नागपूर :-

३.१ **निर्भय-निर्गुण - दि. ८ एप्रिल २०१०** :- पं. कुमार गंधर्व यांच्या याच स्वरविलासाचा पुनःप्रत्यय देणारा **'निर्भय-निर्गुण'** हा कार्यकम विभागीय केंद्र नागपूरच्यावतीने आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात नागपूरातील युवापिढीच्या गायक-गायिकांचा सहभाग होता. दृकश्राव्य ध्वनी-चित्रफितीच्या आधारे कुमारांचे गाणे, बोलणे, संवाद, स्मरणचित्रे यामुळे कार्यक्रम चांगला झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी, प्रमुख अतिथी श्री. भैय्याजी हारोडे, श्रीमती आशा बगे, प्रा. महेश एलकुंचवार यांनी प्रारंभी दीप प्रज्वलन केले. श्री. गिरीश गांधी यांनी कलावंतांचे स्वागत केले. कार्यक्रमाला रसिकांची भरगच्च उपस्थिती होती.

३.२ **ग्रामगीता सुबोध निरुपण प्रकाशन समारंभ - दि. ९ एप्रिल २०१०** :- विभागीय केंद्र नागपूर व महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. अशोक कामत यांनी लिहिलेल्या राष्ट्रसंत तंकडोजी महाराज विरचित 'ग्रामगीता सुबोध निरुपण' या ग्रंथाचे प्रकाशन कुलगुरु डॉ. श. नू. पठाण यांच्या हस्ते करण्यात आले. गुरुदेव युवा मंचचे प्रवर्तक श्री. ज्ञानेश्वर रक्षक यांच्या

अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी, डॉ. प्रदीप विटाळकर, श्री. विजय जिचकार उपस्थित होते.

३.३ **"ओॲसिस" पुस्तक प्रकाशन समारंभ - दि. १६ एप्रिल, २००९ :-** विभागीय केंद्र नागपूरच्यावतीने प्रा. नयना धवड यांच्या ओॲसिस या ललितबंधाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रकाशन सोहळयाच्या अध्यक्षस्थानी केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी होते. व्यासपीठावर कवी सुधाकर गायधनी, आचार्य डॉ. भाऊसाहेब झिटे, पुण्यातील पद्‌मगंधा प्रकाशनचे श्री. अरुण जाखडे, श्री. जांबुवंतराव धोटे, श्री. नाना एम्बडवार, श्री. रणजित देशमुख, श्री. प्रवीर चक्रवर्ती, श्रीमती लिलाताई चितळे, श्रीमती उषा गडकरी उपस्थित होते.

३.४ **नव्या जाणिवांचे कवी - काव्य उपक्रम - दि. १८ एप्रिल २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूरच्यावतीने प्रत्येक महिन्याला आयोजित करण्यात येणा-या नव्या जाणिवांचे कवी या कार्यकमाचे आयोजन करण्यात आले. कवी संदीप निवृत्ती गवई (मेहकर), वर्षा डोके (कळमेश्वर), द. सा. बोरकर (लाखनी), व प्रा. सौ. मिनल येवले (नागपूर) इत्यादी कवी सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रविंद्र शोभणे होते. यावेळी त्यांनी कविंना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक सौ. मनीषा साधू यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. प्रभाकर कुबडे यांनी केले.

३.५ **'हे वर्तुळ असेच असते' पुस्तक प्रकाशन समारंभ - दि. १९ एप्रिल २०१० :-**विभागीय केंद्र, नागपूर व मुक्तछंद प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने **'हे वर्तुळ असेच असते'** या संग्रहाचा प्रकाशन सोहळा श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार श्री. प्रविण बर्दापूरकर, कवी श्री. लोकनाथ यशवंत, डॉ. अजय देशपांडे, डॉ. सुलभा हेर्लेकर व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आभा श्री. मेघे यांनी केले. संचालन प्रा. अनिकेत मुन्शी व आभार डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी मानले.

३.६ **कार्यकारिणी बैठक - दि. २९ एप्रिल २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूरतर्फे महाराष्ट्र राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यासंबंधी केंद्राच्या सदस्यांची बैठक अध्यक्षांच्या अनुमतीने त्यांच्या उपस्थितीत दिनांक २९ एप्रिल २०१० रोजी घेण्यात आली. यावेळी महाराष्ट्राच्या विकासात विदर्भाच्या सहयोगावर चर्चा करण्यात आली आणि विविध विषयांवरील परिसंवाद, व्याख्यान तसेच चर्चासत्राचे आयोजन सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त घेण्याचे ठरले आणि विविध क्षेत्राशी संबंधित कार्यक्रम आयोजनाची रुपरेषा तयार करण्यात आली.

३.७ **'सार्थक' पुस्तक प्रकाशन समारंभ - दि. ३० एप्रिल, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व साहित्य विहार यांच्या संयुक्त विद्यमाने **'सार्थक'** या हिंदी अनुवादित कादंबरीचा प्रकाशन सोहळा श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला. यावेळी प्रा. मेघनाथजी बोधनकर, श्री. बी. जी. देवपुजारी, श्रीमती आशा पांडे, डॉ. कुमरे, श्रीमती शुभांगी भडभडे, श्रीमती वसुधा पांडे, व्यासपीठावर उपस्थित होते. श्रीमती श्वेता शेलगावकर यांनी सूत्र संचालन केले तर श्री. पांडे यांनी आभार मानले.

३.८ **नव्या जाणिवांचे कवी - काव्य उपक्रम - दि. २ मे २०१० :-** विभागीय केंद्र नागपूरच्यावतीने आयोजित काव्य उपक्रम नव्या जाणिवांचे कवीचे आयोजन रविवार दि. २ मे २०१० रोजी करण्यात आले. कार्यक्रमाच्या अतिथी समीक्षक म्हणून विदर्भाच्या प्रसिध्द कवयित्री श्रीमती मनीषा साधू होत्या. याप्रसंगी प्रामुख्याने श्री. हिरामन लांजे तसेच कार्यक्रमात सहभागी कवी गोपाल

खाडे (कारंजालाड), मनीषा रिठे (वर्धा), हेमंत बारसागडे (नागभीड), रविंद्र देवघरे (नागपूर) इत्यादी कवी सहभागी झाले. कार्यक्रमाच्या प्रमुख समीक्षक श्रीमती मनीषा साधू हा कार्यक्रम मागील ९ महिन्यांपासून राबवित आहे. संपूर्ण विदर्भातील कवींची एक नवी फळी यातून तयार होत आहे.

३.९ **ग्रंथचर्चा - महाभारताचा मूल्यवेध दि. ५ मे, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व विजय प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. रविंद्र शोभणे यांच्या 'महाभारताचा मूल्यवेध' या ग्रंथचर्चेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. गिरीश गांधी होते. या ग्रंथाचे विश्लेषक प्रा. सुरेश द्वादशीवार, डॉ. रविंद्र शोभणे, श्री. विजय जिचकार उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी केले. सूत्रसंचालन सौ. शुभदा फडणवीस यांनी केले. आभार प्रदर्शन श्री. सचिन उपाध्याय यांनी मानले.

३.१० **मराठी अभिमान गीत चित्रफित लोकार्पण - दि. ३० मे, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व उमेद बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कवी सुरेश भट आणि संगीतकार कौशल इनामदार यांच्या 'मराठी अभिमान गीत' सी.डी.च्या लोकार्पण सोहळयाचे व त्यांच्या प्रकट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. संजय कोंडावार होते. व्यासपीठावर कवी अशोक बागवे, कुणाल नरसापूरकर, कल्याण देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते. लोकार्पण सोहळयानंतर कवी अशोक बागवे यांनी कौशल इनामदार यांची प्रकट मुलाखत घेतली. कार्यक्रमाला विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष सर्वश्री मनोहर म्हैसाळकर, मंदार गोगटे, उमेश जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. श्रीमती मनीषा साधू यांनी संचालन केले तर मराठी अभिमान गिताच्या प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

३.११ **प्रकाशन समारंभ - दि. २१ जून, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व साहित्य विहार, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ जून २०१० रोजी सौ. आशा पांडे यांच्या 'अभिशत पुष्प' या अनुवादित कादंबरीच्या प्रकाशन सोहळयाचे आयोजन करण्यात आले. डॉ. वि. स. जोग यांच्या शुभहस्ते हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी मूळ हिंदी लेखिका डॉ. कृष्णा श्रीवास्तव, मराठी अनुवादक सौ. आशा पांडे, श्री. श्यामकांत कुळकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. गिरीश गांधी होते.

३.१२ **प्रकाशन समारंभ - दि. २९ जून, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूरच्यावतीने श्री. दिवाकर मोहनी यांच्या 'नागरी लिपीचा परिचय आणि शुध्दलेखनाचे प्रयोजन' या विषयावर दि. २९ जून २०१० रोजी चर्चा घेण्यात आली. त्याप्रसंगी त्यांनी तयार केलेल्या नागरी लिपी ॲनिमेशन चित्रफितीचे प्रक्षेपण करण्यात आले. डॉ. आ. ह. साळुंखे, प्रा. दत्ता भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत चर्चा संपन्न झाली. याप्रसंगी श्री. शफाअत खान, श्री. गिरीश गांधी, श्री. प्रवीण बर्दापूरकर, डॉ. अविनाश रोडे, डॉ. प्रमोद मुनघाटे, श्री. हरिश्चंद्र बोरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

३.१३ **प्रकाशन समारंभ - दि. १ जुलै, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व साहित्य विहार, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने कवी श्री. भाऊराव कु-हाडे यांच्या 'भक्तिसरिता' या कविता संग्रहाच्या प्रकाशन सोहळयाचे आयोजन दि. १ जुलै २०१० रोजी करण्यात आले. श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली व शुभहस्ते या ग्रंथचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. श्री. कमलाकर धारप, सौ. वैशाली मुलमुले यांनी या संग्रहावर भाष्य केले. याप्रसंगी रसिकराजचे सदस्यगण, प्रकाशक प्रा. बळवंत भोयर उपस्थित होते. श्री. विद्याधर यांनी संचालन केले तर श्री. धनंजय मांडवकर यांनी आभार मानले.

३.१४ **प्रकाशन समारंभ - दि. २ जुलै, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने महाराष्ट्र राज्याने गठीत केलेल्या मराठी भाषा समितीवर निवड झालेले डॉ. प्रमोद मुनघाटे व डॉ. श्रीकांत तिडके यांच्या सत्काराचे आयोजन दि. २ जुलै २०१० रोजी श्री. मनोहर म्हैसाळकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी केले.

३.१५ **प्रकाशन सोहळा - दि. १७ जुलै, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व आकांक्षा प्रकाशन, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ जुलै २०१० रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे साहित्य अभ्यासक श्री. ज्ञानेश्वर रक्षक यांनी लिहिलेल्या 'जनक्रांतीच्या पाऊलवाटा' या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला. आचार्य हरिभाऊदादा वेरुळकर यांच्या शुभहस्ते व श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला.

३.१६ **नाटयवाचन - दि. २५ जुलै, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'नाटय वाचन व रंगचर्चा' या उपक्रमाचे आयोजन दि. २५ जुलै २०१० रोजी सकाळी १०.०० वाजता करण्यात आले. सौ. संध्या कुळकर्णी यांनी 'का म्हणा पुन्हा पुन्हा' या नाटकाचे वाचन केले. कार्यक्रमात सन्माननीय व्यक्ती व रंगकर्मी उपस्थित होते.

३.१७ **प्रकाशन सोहळा - दि. २५ जुलै, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व आकांक्षा प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ जुलै २०१० रोजी सायंकाळी ५.३० वाजता श्रीमती अरुणा सबाने यांच्या 'मुन्नी' या कादंबरीच्या प्रकाशन सोहळयाचे आयोजन करण्यात आले. श्री. गिरीश गांधी यांच्या शुभहस्ते व अध्यक्षतेखाली हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. या कादंबरीवर डॉ. प्रकाश खरात व श्रीमती जया द्वादशीवार यांनी भाष्य केले. याप्रसंगी केंद्राचे सदस्य व इतर मान्यवर उपस्थित होते. डॉ. कोमल ठाकरे यांनी सूत्रसंचालन केले तर श्रीमती साक्षी पावडे यांनी आभार मानले.

३.१८ **कालिदास सोहळा - दि. २९ जुलै, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि. २९ जुलै २०१० रोजी कालिदास पर्व महोत्सवाचे आयोजन सायंटिफिक सभागृहात करण्यात आले. डॉ. एस. बी. निमसे, कुलगुरु, स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, डॉ. एस. एन. पठाण, श्री. गिरीश गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत व डॉ. पंकज चांदे, कुलगुरु, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी 'नारीहृदयविलासः व विकसतु एषा कलिका' या दोन नाटिकांचे प्रस्तुतीकरण करण्यात आले. या उपक्रमास बहुसंख्येने रसिक श्रोते उपस्थित होते.

३.१९ **नाटयवाचन - दि. १ ऑगस्ट, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूरच्या व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'नाटय वाचन व रंगचर्चा' या उपक्रमातंर्गत ज्येष्ठ नाटककार श्री. प्रेमानंद गज्वी यांनी 'व्याकरण' या नाटकाचे वाचन केले. शहरातील तरुण नवोदित रंगकर्मींनी या कार्यक्रमास भरभरुन प्रतिसाद दिला.

३.२० **नाटयवाचन - दि. ८ ऑगस्ट, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूरच्या व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'नाटय वाचन व रंगचर्चा' या उपक्रमातंर्गत सौ. अनिता जोशी यांनी 'मन वढाय वढाय' या नाटकाचे वाचन केले.

३.२१ **नारायण सुर्वे यांना श्रध्दांजली - दि. २० ऑगस्ट, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ कवी नारायण सुर्वे यांना दि. २० ऑगस्ट २०१० रोजी त्यांच्या कर्तृत्वाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

श्री. मनोहर म्हैसाळकर यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. गिरीश गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रा. सुरेश द्वादशीवार, डॉ. यशवंत मनोहर व डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन श्रीमती शुभदा फडणवीस यांनी केले. उपस्थितांनी मौन पाळून नारायण सुर्वे यांच्या प्रती आपली श्रध्दांजली अर्पण केली.

३.२२ **लोकार्पण सोहळा - दि. २१ ऑगस्ट, २०१० :** विभागीय केंद्र, नागपूरच्या व साधना साप्ताहिक, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. २१ ऑगस्ट २०१० रोजी सकाळी ९.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, शंकर नगर चौक, नागपूर येथे महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्ताने साधना साप्ताहिकाने प्रकाशित केलेल्या 'विदर्भ विशेषांकाच्या' लोकार्पण सोहळयाचे आयोजन करण्यात आले. श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. सुरेश द्वादशीवार, ज्येष्ठ पत्रकार श्री. दि. भा. घुमरे व कार्यकारी संपादक साधना साप्ताहिक श्री. विनोद शिरसाठ यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर श्री. अतुल लोंढे यांनी आभार मानले.

३.२३ **मराठी बोली साहित्य संघ - वर्धापन दिन - दि. २१ व २२ ऑगस्ट, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व मराठी बोली साहित्य संघ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ व २२ ऑगस्ट २०१० ला असे दोन दिवसीय समारंभाचे आयोजन करण्यात आले. मराठी बोली साहित्य संघाच्या ६ व्या वर्धापन दिनाचे उद्घाटन दि. २१ ऑगस्ट २०१० रोजी श्री. गिरीश गांधी यांच्या हस्ते करण्यात आले. या पहिल्या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. मनोहरराव रोकडे होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली श्री. यादवराव महाजन यांच्या 'भावस्पर्श' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. श्री. श्रीनिवास भालेराव यांनी या संग्रहावर आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा. कल्पना देवते यांनी सुत्रसंचालन केले तर श्री. देविदास इंदापवार यांनी आभार मानले. दुस-या सत्रात प्रा. कृष्णा चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली उत्स्फूर्त काव्यसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. या संमेलनाचे संचालन कवी श्री. प्रसेन्नजित गायकवाड यांनी केले तर श्री. राजेंद्र बोकाडे यांनी आभार मानले.

दि. २२ ऑगस्ट २०१० च्या पहिल्या सत्रात डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्राच्या सांस्कृतिक धोरणात बोलीचे प्रतिबिंब किती ?' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. प्रा. बबनराव नाखले, डॉ. सुरेश खैरनार, डॉ. रविंद्र शोभणे या वक्त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. चंद्रभान भोयर यांनी सूत्रसंचालन केले तर सौ. सायली सारडे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांचा त्यांच्या कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. डॉ. राजन जैस्वाल यांनी सत्कारमूर्तीचा शब्दसुमनानी गौरव केला. श्री. श्रीपाद अपराजित यांच्या अध्यक्षतेखाली व ॲड. रेखा वडिखाये यांच्या प्रमुख उपस्थितीत झाडीबोली साहित्य संघाच्या या समारंभाचा समारोप झाला. या समारोपाचे संचालन डॉ. सुरेश खेडकर यांनी केले तर डॉ. शांतिदास लुंगे यांनी आभार मानले. विदर्भातील बोलीवर प्रेम करणारे अनेक वाङ्मयप्रेमी, रसिक श्रोते दोन दिवस या कार्यक्रतात उपस्थित होते.

३.२४ **नाटयवाचन - दि. २२ व २९ ऑगस्ट २०१० :-** दि. २२ व २९ ऑगस्ट २०१० रोजी नाटयवाचन व रंगचर्चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. दि. २२ ऑगस्ट रोजी नाटककार श्री. निरंजन मार्कन्डेयवार यांनी 'माय डीयर शुबी' या नाटकाचे वाचन केले तर दि. २९ ऑगस्ट २०१० रोजी नाटककार श्री. संजय गायकवाड यांनी 'लढा' या नाटकाचे वाचन केले.

३.२५ **सी. डी. विमोचन - दि. २९ ऑगस्ट, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व साहित्य विहार आणि स्वरालय संगीत संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २९ ऑगस्ट २०१० रोजी सौ. संगीता बापट यांच्या 'अंगणातल्या पायरीवर' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

व 'ईशगान' या भक्तिगीतांच्या सी.डी. चे विमोचन करण्यात आले. श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. सौ. सुलभा हेर्लेकर यांच्या हस्ते 'अंगणातल्या पायरीवर' या संग्रहाचे प्रकाशन संपन्न झाले. श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी या संग्रहावर भाष्य केले. पं. भाऊराव भट यांच्या शुभहस्ते 'ईशगान' या भक्तिगीतांच्या सी.डी.चे विमोचन केले. रसिक श्रोत्यांनी 'ईशगान' चा आस्वाद घेतला.

३.२६ **साधना साप्ताहिक - विशेष बैठक - दि. २ सप्टेंबर २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूरच्या व शिक्षण विभाग, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण' यावर चर्चा तसेच साप्ताहिकाच्या साने गुरुजी विशेषांकाच्या विशेष बैठकीचे आयोजन दिनांक २ सप्टेंबर २०१० रोजी दुपारी ४.०० वाजता करण्यात आले. श्री. महेश करजगांवकर, उपसंचालक शिक्षण विभाग नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली व प्रा. सुरेश द्वादशीवार, डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच श्री. गिरीश गांधी यांच्या विशेष उपस्थितीत या चर्चेचे आयोजन यशस्वीरित्या संपन्न झाले. या कार्यक्रमात पाचशे शिक्षक आणि दोनशे शाळा संचालकांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे संचालन श्री. बाळ कुळकर्णी यांनी केले तर आभार डॉ. कोमल ठाकरे यांनी मानले.

३.२७ **नाटयवाचन व रंगचर्चा - दि. ५ सप्टेंबर, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने चालविण्यात येत असलेल्या नाटयवाचन व रंगचर्चा या उपक्रमात शिक्षक दिनाचे औचित्य साधून दि. ५ सप्टेंबर, २०१० रोजी प्रा. म. ना. लोही लिखित 'गडकरी' या नाटकाचे वाचन करण्यात आले.

३.२८ **नाटयवाचन व रंगचर्चा - दि. १९ सप्टेंबर, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नाटयवाचन व रंगचर्चा या उपक्रमात दि. १९ सप्टेंबर, २०१० रोजी श्री. देवेंद्र लुटे लिखित 'ब्लॅक ऑप्टीकल' या दोन अंकी नाटकाचे वाचन करण्यात आले.

३.२९ **नाटयवाचन व रंगचर्चा - दि. २६ सप्टेंबर, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येत असलेल्या नाटयवाचन व रंगचर्चा या उपक्रमात दि. २६ सप्टेंबर, २०१० रोजी नवोदित लेखक श्री. रुपेश पवार लिखित 'पतंग' या नाटकाचे वाचन श्री. धनंजय मांडवकर यांनी केले. यावेळी सर्वश्री महेंद्र सुके, कुणाल मुळे, गजानन सगदेव, आनंद शर्मा आदी रसिक प्रेक्षकांनी चर्चेत भाग घेतला व नवोदित लेखक श्री. रुपेश पवार यांनी पुढील लेखनास मार्गदर्शन केले. श्री. संजय काशीकर यांनी या कार्यक्रमाची सूत्रे यशस्वीरित्या सांभाळली.

३.३० **नाटयवाचन व रंगचर्चा - दि. ३ व १० ऑक्टोबर, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नाटयवाचन व रंगचर्चा अनुक्रमे दिनांक ३ व १० ऑक्टोबर २०१० या दिवशी सौ. सुनंदा साठे लिखित 'बीज अंकुरे अंकुरे' या नाटकाचे व नाटयलेखिका श्रीमती सुषमा नानोटी यांच्या 'आई' या नाटकाचे वाचन करण्यात आले.

३.३१ **शिल्परत्न वेरुळ - दि. १० ऑक्टोबर, २०१० :-** डॉ. किरण देशमुख यांच्या 'शिल्परत्न वेरुळ' या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

३.३२ **सिडी लोकार्पण सोहळा -** दिनांक १२ ऑक्टोबर २०१० रोजी 'महिषासुर मर्दिनी स्तोत्र व अर्धनारी नटेश्वर स्तोत्र' या सिडीचा लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला. या स्तोत्रांचा भावानुवाद सौ. अरुंधती दीक्षित यांनी केला. या भावनुवादांना

सुरेल चाल देऊन सौ. वर्षा बारई, श्री. मंदार आपटे यांनी त्याचे गायन केले. संगीत संयोजन श्री. अप्पा वढावकर यांनी केले. पं. श्री. प्रभाकर देशकर यांच्या शुभहस्ते व विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा संपन्न झाला.

३.३३ **पुस्तक प्रकाशन समारंभ :-** विभागीय केंद्र, नागपूर व संत कबीर भेदवाणी चॅरिटेबल ट्रस्ट, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २३ ऑक्टोबर २०१० रोजी सदगुरु डॉ. दिवाकर उमाटे यांच्या 'आत्मा-परमात्मा दर्शन कबीराचा सिद्ध प्रयोग' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला.

३.३४ **उत्तम कांबळे यांचा सत्कार :-** विभागीय केंद्र, नागपूर व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल श्री. उत्तम कांबळे यांच्या सत्काराचे आयोजन दि. २५ ऑक्टोबर २०१० रोजी न्या. नरेंद्र चपळगांवकर तसेच प्रा. आबाजी डहाके, श्री. गिरीश गांधी यांच्या विशेष उपस्थितीत श्री. मनोहर म्हैसाळकर यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा संपन्न झाला.

३.३५ **एकदिवशीय चर्चासत्र - दि. २७ ऑक्टोबर २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व पदव्युत्तर मराठी विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, पदव्युत्तर मराठी विभाग माजी विद्यार्थी संघटना यांच्यातर्फे श्री. भालचंद्र नेमाडे यांच्या 'हिंदु : जगण्याची समृध्द अडगळ' या प्रदीर्घ कादंबरीवरील एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन दि. २७ ऑक्टोबर २०१० रोजी करण्यात आले. डॉ. हरिश्चंद्र थोरात यांच्या अध्यक्षतेखाली चर्चासत्र संपन्न झाले. चर्चासत्राचे उद्घाटन श्री. वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते व साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. मनोहर म्हैसाळकर व केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. डॉ. अरुण देशमुख, डॉ. हेमंत खडके, डॉ. राजेंद्र नाईकवाडे, डॉ. शैलेंद्र लेंडे, प्रा. अनिल नितनवरे इत्यादी वक्त्यांनी रसिक मनाला अस्वस्थ करणा-या कादंबरीचे विविध अंगी विवेचन आपल्या निबंधातून सादर केले.

३.३६ **प्रकाशन समारंभ :-** दि. २ नोव्हेंबर २०१० रोजी शरदचंद्र मुक्तिबोध स्मृतीदिनानिमित्त प्रा. कृष्णा चौधरी यांच्या 'मर्ढेकरांची महात्मता' या समीक्षा ग्रंथाचा प्रकाशन सोहळा दि. २ नोव्हेंबर २०१० रोजी संपन्न झाला. या ग्रंथावर केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी प्रा. विजयराजे इंगळे व प्रा. अनिल नितनवरे यांनी भाष्यकार म्हणून आपली भूमिका मांडली.

३.३७ **दिवाळीनिमित्त 'प्रातःस्वर' - दि. ५ नोव्हेंबर २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूरच्यावतीने दि. ५ नोव्हेंबर २०१० रोजी नरक चतुर्दशी व लक्ष्मीपूजनाच्या शुभदिनी जनमानसाच्या सेवेशी सकाळच्या अनवट रागांची सुरेल मैफल प्रातःस्वर अर्पण केली. श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली श्री. महेश एलकुंचवार यांच्या उपस्थितीत ही बहारदार मैफल संपन्न झाली. या प्रातःस्वरांच्या मैफलीची संकल्पना व संहिता सौ. साधना शिलेदार यांची होती. मंजूश्री सोमण, अनिरुध्द देशपांडे, रेणुका इंदूरकर, मंजुषा गढीकर, राम ढोक, श्रीकांत पिसे या कलावंतांनी या रंगतदार मैफलीत सुरांची बरसात केली. कार्यक्रमाचे निवेदन श्रीमती आसावरी गलांडे यांनी केले. रसिक श्रोत्यांनी या दिवाळी पहाटचा मनसोक्त आनंद घेतला.

३.३८ **मा. यशवंतराव चव्हाण यांची पुण्यतिथी - दि. २५ नोव्हेंबर २०१० :-** मा. यशवंतराव चव्हाण यांच्या सव्वीसाव्या पुण्यतिथीनिमित्त दि. २५ नोव्हेंबर २०१० रोजी काव्यगायनाने मा. यशवंतराव चव्हाण यांना आदरांजली वाहण्यात आली. कला-

साहित्याप्रती यशवंतरावांनी जोपासलेल्या स्वप्नाला उजाळा देण्यासाठी गोवा येथील प्रसिध्द कवी श्री. विष्णू सूर्या वाघ यांच्या विशेष उपस्थितीत कवी संमेलनाने आपली रंगत वाढवित नेली. या कवी संमेलनात श्री. ज्ञानेश वाकुडकर, श्री. बबनराव सराडकर, श्रीमती सुचित्रा कातरकर, श्रीमती सुमिता कोंडबत्तुनवार आणि श्री. अजीम नवाज राही यांनी वैदर्भीय मातीच्या वेगवेगळया विषयावर एकापेक्षा एक सरस कविता सादर करुन यशवंतराव चव्हाण यांना आदरांजली अर्पण केली. याप्रसंगी विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी, श्री. विजय जिचकार, डॉ. अक्षयकुमार काळे, श्री. संजय कोंडावार व इतर सदस्यगण प्रामुख्याने उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी केले तर काव्यसंमेलनाचे संचालन श्री. अजीम नवाज राही यांनी केले.

३.३९ **नाटयवाचन व रंगचर्चा - दि. २८ नोव्हेंबर, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नाटयवाचन व रंगचर्चा' या उपक्रमातंर्गत दिनांक २८ नोव्हेंबर २०१० रोजी श्री. रुपेश पवार यांनी उदयप्रकाश यांच्या 'तिरच्या' या दीर्घ कथेवर आधारित मराठी नाटकाचे वाचन केले.

३.४० **लोकशाहीर विठ्ठल उमप यांना श्रध्दांजली - दि. ३० नोव्हेंबर, २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर, अखिल भारतीय मराठी नाटय परिषद व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोकशाहीर विठ्ठल उमप यांना दि. ३० नोव्हेंबर २०१० रोजी श्रध्दांजली वाहण्यात आली. मान्यवरांनी उमप यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले. याप्रसंगी श्री. मनोहर म्हैसाळकर, श्री. गिरीश गांधी, श्री. किशोर आयलवार, श्री. प्रदीप विटाळकर, उल्हास पवार या इत्यादींनी यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या.

३.४१ **'वेदनांची वेधशाळा' - पुस्तक प्रकाशन - दि. १ डिसेंबर २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व रसिकराज साहित्य संस्था नागपूरच्या वतीने कवी निलकांत ढोले यांच्या 'वेदनांची वेधशाळा' या कविता संग्रहाच्या प्रकाशन सोहळयाचे आयोजन दि. १ डिसेंबर २०१० रोजी करण्यात आले. श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. डॉ. रविंद्र शोभणे, प्रा. कृष्णा चौधरी यांनी या काव्यसंग्रहावर भाष्य केले. श्री. प्रकाश एदलाबादकर ज्येष्ठ पत्रकार व श्री. श्रीपाद अपराजीत याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. बळवंत भोयर यांनी केले.

३.४२ **नाटयवाचन व रंगचर्चा - दि. ५ डिसेंबर २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नाटयवाचन व रंगचर्चा' या उपक्रमातंर्गत पुणे येथील डॉ. समीर मोने यांच्या 'अर्धुक' या नव्या नाटकाचे वाचन करण्यात आले. या नाटयचर्चेत सकाळ करंडक एकांकिका स्पर्धेतील कलावंतांनी सहभाग घेतला.

३.४३ **ज्येष्ठ कवी वामन निंबाळकर यांना श्रध्दांजली - दि. १२ डिसेंबर २०१० :-** विभागीय केंद्र नागपूर व अ. भा. दलित साहित्य मंडळ यांच्यावतीने ज्येष्ठ कवी वामन निंबाळकर यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाश खरात होते. कार्यक्रमाला अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. अनिल देशमुख, आमदार श्री. प्रितमकुमार शेगावकर, माजी खासदार श्री. रामदास आठवले, श्री, गिरीध गांधी ज्येष्ठ कवी श्री. यशवंत मनोहर अणि श्रीमती स्नेहलता निंबाळकर उपस्थित होत्या.

३.४४ **टपाल तिकीटाचे विमोचन - दि. २३डिसेंबर २०१० :-** विभागीय केंद्र, नागपूर केंद्राच्यावतीने दि. २३ डिसेंबर २०१० ला मा. यशवंतराव चव्हाण व मा. भाऊसाहेब हिरे स्मृती टपाल तिकीटाचा प्रथम विक्री सोहळा माजी खासदार श्री. बनवारीलालजी

पुरोहित यांच्या शुभहस्ते व श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. सभागृहात आयोजित कार्यक्रलाला जी.पी.ओ,चे वरिष्ठ पोस्ट मास्तर श्री. मनोहर सिंग भारद्वाज, फिलॅटेली डिपार्टमेंटच्या श्रीमती अल्का मेश्राम उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन श्रीमती मनीषा साधू यांनी केले. श्री. विजय जिचकार यांनी आभार मानले.

३.४५ **सुवाच्य हस्ताक्षर स्पर्धा** - विभागीय केंद्र, नागपूर व अक्षरभूषण मधुकरराव भाकरे स्मृती प्रतिष्ठान नागपूरच्या वतीने दरवर्षी दि. २५ डिसेंबर २०१० रोजी सुवाच्य हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. विदर्भातील जवळपास प्रत्येक शाळा या उपक्रमात सहभागी होत असतात. मागील वर्षापासून एका शिक्षकाचा 'शिक्षक गौरव' पुरस्कार देऊन सन्मान करण्याचे ठरले आहे. नागपूर महानगरपालिका तसेच शिक्षण विभाग यांच्या परिश्रमाने यावर्षी एक लक्ष विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. सुवाच्य हस्ताक्षर स्पर्धेचा पुरस्कार वितरण सोहळा दिनांक २५ डिसेंबर २०१० रोजी आयोजित करण्यात आला. मा. डॉ. नितीन राऊत, रोजगार हमी योजना मंत्री (महाराष्ट्र शासन) यांच्या शुभहस्ते आणि मा. डॉ. अंकुश धनविजय पोलीस आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी मा. श्री. प्रमोद भुसारी, निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर, मा. आमदार श्री. नागो गाणार, श्री. संदीप जोशी आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्पर्धेमागची भूमिका श्री. गिरीश गांधी यांनी स्पष्ट केली. 'पसायदान' गायनाने कार्यक्रमाची सांगता केली. या स्पर्धेतील पारितोषिक विजेते **गट अ** - प्राची कोदाने (उच्च माध्यमिक शाळा फेटरी) अपूर्वा जाधव (संजुबा प्रा. स्कूल), रुषिका पटोले (नवयुग प्राथ. शाळा), सोनम जयस्वाल (प्राथमिक शाळा परसोडी), साक्षी निनावे (जामदार प्राथमिक शाळा, पारशिवणी), **गट ब** - दीपा देशभ्रतार (रमाबाई आंबेडकर उच्च प्राथमिक शाळा), श्वेता जाधव (सुभाषचंद्र बोस शाळा), करिश्मा मस्के (केसरीमल पालिवाल विद्यालय पारशिवणी), कांचन ठाकरे (उच्च प्राथमिक शाळा वलनी), रिना मुरे (वनिता उच्च प्राथमिक शाळा) **गट क** - मीनल सातनुकर (इंदिरा गांधी गर्ल्स हायस्कूल) गणेश सपकाळ (केशवनगर प्राथमिक शाळा), श्रीयश निचकवडे (पं. बच्छराज व्यास विद्यालय), समीक्षा नन्नावरे (ज्युपिटर हायस्कूल), मनीषा चिमुरकर (उमिया शंकर हायस्कूल), अश्विनी पाटील (वनिता विकास विद्यालय).

३.४६ **पुस्तक प्रकाशन** - दि. १२ जानेवारी २०११ रोजी ॲड. उल्हास दुपारे यांच्या 'लाग' या कविता संग्रहाच्या प्रकाशन सोहळयाचे आयोजन करण्यात आले. श्री. गिरीश गांधी यांच्या शुभहस्ते व श्री. रविबाबू शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा संपन्न झाला.

३.४७ **कुसुमाग्रज जन्मशताब्दी सोहळा - दि. २७ फेब्रुवारी २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ स्नातकोत्तर मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ फेब्रुवारी २०११ रोजी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाचा उद्घाटन सोहळा केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांच्या हस्ते करण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत, समीक्षक डॉ. वि. स. जोग यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी कवयित्री श्रीमती सुचित्रा कातरकर यांच्या 'माझे हायकू' 'फुल, पक्षी आणि ....' या दोन काव्यसंग्रहांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी 'समिधाच सख्या या....' या सत्रात कुसुमाग्रजांच्या कवितांचे अभिवाचन प्रा. तीर्थराज कापगते, प्रा. विनोद राऊत, श्री. प्रफुल्ल शिलेदार, श्रीमती सुचित्रा कातस्कर, श्रीमती गौरी शास्त्री यांनी केले. संकल्पना संचालन श्री. श्याम धोंड यांनी केले. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी यशवंतराव चव्हाण स्मृती काव्य स्पर्धा पुरस्काराचे वितरण खासदार मा. श्री. दत्ताभाऊ मेघे यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. सुरेश द्वादशीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. प्रथम पुरस्कार प्रसाद उगले, द्वितीय पुरस्कार प्रथमेश देशपांडे,

तृतीय पुरस्कार रोशन बनकर आणि स्नेहा खोब्रागडे, निलेश महात्मे यांना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आले. समारोपसत्राचे संचालन प्रा. अजय चिकाटे यांनी केले.

३.४८ **सी. डी. लोकार्पण सोहळा** - दि. २८ फेब्रुवारी २०११ रोजी सूरमणी डॉ. साधना शिलेदार यांच्या संध्याकाळच्या रागांच्या सीडीचा रसिकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला. केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ नाटककार श्री. महेश एलकुंचवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा रसिकार्पण सोहळा संपन्न झाला. यावेळी डॉ. कल्याणी देशमुख, श्री. विजय चिजकार व्यासपीठावर उपस्थित होते.

३.४९ **मान. यशवंतराव चव्हाण यांचा जयंती दिन - दि. १२ मार्च २०११** :- महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांची जयंती केंद्रामार्फत सामाजिक कार्यातून आदर्श निर्माण करणा-या सामाजिक कार्यकर्त्यांचा सत्कार करुन साजरी करण्यात आली. सामाजिक बांधिलकीचा शाब्दिक उद्‌घोष करण्यापेक्षा वास्तवात सामाजिक काम करणा-यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांना धान्य व इतर स्वरुपात मदत करण्याच्या हेतूने आकांक्षाच्या श्रीमती अरुणा सबाने, नगरसेविका श्रीमती प्रगती पाटील आणि श्रीमती विभा गांधी त्यांच्या सोबत संस्थेचे डॉ. प्रमोद मुनघाटे, डॉ. कोमल ठाकरे, श्री. धनंजय मांडवकर, श्रीमती शैल जैमिनी होते. या सर्वांच्या उपस्थितीत श्रीमती राधा बोरडे, श्रीमती प्रज्ञा राऊत आणि श्रीमती ज्योती घरडे या तीन सामाजिक कार्यकल्यांचा सत्कार करण्यात आला.

केंद्राच्या कार्यकर्त्यांनी १२ मार्चला जयभीम नगरातील राजगिरी वृध्दाश्रमात श्रीमती ज्योती घरडे यांच्या निवासस्थानी भेट देऊन श्रीमती विभा गांधी यांच्या हस्ते त्यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर श्रीमती राधा बोरडे यांच्या न्यू ज्ञानेश्वर नगरातील लुईराम वाचनालयाला भेट देण्यात आली. राधा बोरडे आणि त्यांचे पती पुंडलिक बोरडे दोघेही दृष्टिबाधित असून दृष्टिबाधितांसाठी सतत काही ना काही करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. बेलतरोडी या नागपूरच्या एका टोकावर असलेल्या श्रीमती प्रज्ञा राऊत यांच्या घरी केंद्राची मंडळी पोहचली. त्यांच्या श्रीकृष्ण शांती निकेतन येथे दुर्बळ मनस्क महिला व राऊत कुटुंबिय वाट पाहत होते. यावेळी एकूण वातावरण नवीन माणसाला आश्चर्य वाटावे असे होते.

३.५० **नाटयवाचन व रंगचर्चा - दि. १३ मार्च २०११** :- विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नाटयवाचन व रंगचर्चा या उपक्रमातंर्गत प्रा. संयुक्ता थोरात लिखित 'कब तक' या नाटकाचे वाचन प्रा. संयुक्ता थोरात, प्रिती पटेल, पुनम ऊईके, सारिका हेडाऊ यांनी केले.

३.५१ **जागतिक कविता दिन - दि. २१ मार्च २०११** :- विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने जागतिक कवितादिनी अनुवादित कवितांचे अभिवाचन करण्यात आले. कवितादिनानिमित्त कविवर्य डॉ. यशवंत मनोहर यांचा ज्येष्ठ नाटककार श्री. महेश एलकुंचवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन दै. सकाळचे संपादक श्री. श्रीपाद अपराजित यांनी केले.

३.५२ **नाटयवाचन व रंगचर्चा** - विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नाटयवाचन व रंगचर्चा या उपक्रमातंर्गत दि. २७ मार्च, २०११ रोजी श्री. विजय मोकाशी यांच्या 'बंटी और बबली' या विडंबनात्मक नाटकाचे वाचन करण्यात आले. नाटयरसिकांनी या चर्चेत सहभाग घेतला. कार्यक्रमाची सूत्रे श्री. धनंजय मांडवकर यांनी सांभाळली.

## १०.४ विभागीय केंद्र कोंकण :-

४.१ **'वसुंधरा दिन' दि. २२ एप्रिल २०१० :-** विभागीय केंद्र कोकणच्या जिल्हा समिती रत्नागिरीचे वतीने दि. २२ एप्रिल २०१० रोजी रत्नागिरी येथील कार्यालयात 'वसुंधरा दिन' साजरा करण्यात आला. यावेळी विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, रत्नागिरी जिल्हा समिती अध्यक्षा सौ. युगंधरा राजेशिर्के, बचत गटातील महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने झाली. कोकण विभागीय केंद्राचे उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनी उपस्थित बचत गटातील महिलांना मार्गदर्शन करताना 'वसुंधरा' म्हणजे पृथ्वीचे संरक्षण कसे केले पाहीजे हे विशद केले. यावेळी विविध प्रकारचे होणारे प्रदूषण व वृक्षतोड यामुळे पृथ्वीवरील निसर्गाचा समतोल राखण्यासाठी 'वृक्षलागवड' ही एक चळवळ म्हणून सुरुवात केली पाहीजे असे आवाहन डॉ. कद्रेकर यांनी महिलांना केले. यानंतर जिल्हाध्यक्षा सौ. युगंधरा राजेशिर्के यांनी वृक्षतोडीचे दुष्परिणाम पुढच्या पिढीला भोगण्यास लागू नयेत म्हणून आज आपण वृक्ष लागवड केली पाहीजे व हे वृक्षलागवडीचे काम महिलांनीच मनावर घेणे गरजेचे आहे असे जमलेल्या महिलांना सांगितले. कोकण विभागीय अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांनीही महिलांना मार्गदर्शन केले. केद्रातर्फे बचत गटातील महिलांना वेल व कोकम रोपांचे वाटप करण्यात आले. या आगळया वेगळया कार्यक्रमाला बहुसंख्येने उपस्थित राहून महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

४.२ **सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र समारोह - दि. ३० एप्रिल २०१० ते ३ मे २०१० :-** विभागीय केंद्र कोकणच्या वतीने दि. ३० एप्रिल ते ३ मे २०१० या कालावधीमध्ये 'सुवर्ण महोत्सवी महाराट्र समारोह' रत्नागिरी येथील अ. के. देसाई हायस्कूलच्या पटांगणात आयोजित करण्यात आला. वरील कालावधीत विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीचे दर्शन घडविणारे विविध उद्योजकांचे, कंपन्यांचे, शासकीय कार्यालयांचे, कृषी, बंदरे, सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे, मरीन, छोटे उद्योजक, महिला बचत गट यांच्या स्टॉलचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. तसेच कोकणातील बंदरांचा विकास व नौका, दर्यावर्दी साधनसामुग्री यांची माहिती देणारे प्रदर्शन हे या समारोहाचे विशेष आकर्षण होते.

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या विविध भूमिकेतील फोटोंच्या उभारलेल्या दालनाचे उद्घाटन दि. ३० एप्रिल २०१० रोजी सायंकाळी ५.०० वाजता मा. पालकमत्री श्री. भास्करराव जाधव यांचे शुभहस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. जिल्हा समिती सदस्य श्री. महंमद रखांगी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकामध्ये केंद्रामार्फत गेल्या पाच वर्षात केल्या गेलेल्या कामाचा आढावा घेतला. त्यानंतर उपस्थित मान्यवर पाहुण्यांचे स्वागत सचिव श्री. अनिल नेवाळकर यांचे हस्ते पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आले. यावेळी पालकमंत्री मा. श्री. भास्करराव जाधव व आमदार श्री. उदय सामंत यांनी केंद्राच्यावतीने घेण्यात आलेल्या 'यशवंतराव चव्हाण यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र' या विषयावरील खुल्या गटातील निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर केला.

दि. ३० एप्रिल रोजी रात्री ७ ते १० या वेळेत 'फेंडस क्लब म्युझिकल अवर्स' हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. दि. १ मे २०१० व दि. २ मे २०१० रोजी दुपारच्या सत्रात मान्यवर उद्योजकांची चर्चासत्रे संपन्न झाली व रात्री ७ ते १० या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. दि. ३ मे २०१० रोजी 'सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र' कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. समारोपाच्या कार्यक्रमाला सुप्रसिध्द लेखक व पत्रकार मा. श्री. मधुकर भावे यांना निमंत्रित करण्यात आले. विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांचे हस्ते मा. श्री. मधुकर भावे यांचा शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. मा. श्री. मधुकर भावे यांचे हस्ते निबंध स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम, प्रशस्तीपत्र, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देण्यात आले.

४.३ **कृषी दिन - दि. १ जुलै २०१० :-** विभागीय केंद्र कोकण जिल्हा समिती रत्नागिरीच्यावतीने दि. १ जुलै २०१० रोजी 'कृषी दिन' कार्यक्रम चिपळूण येथील रुक्मिणीबाई माटे विद्यालय, कामथे येथे संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेतील विद्यार्थिनींनी अतिशय सुरेल आवाजात स्वागत गीत गायले. उपस्थित मान्यवरांनी मुलांना मार्गदर्शनपर भाषणे केली. जिल्हाध्यक्षा सौ. राजेशिर्के व सदस्य यांचे हस्ते इ. ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांना जांभळाची रोपे वाटप करण्यात आली. सदर रोपे विद्यार्थ्यांनी लक्ष देवून वाढवावीत असे आवाहन करण्यात आले. सदरची रोपे कृषी विज्ञान केंद्र, सावर्डा यांनी दिल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पाटील यांनी गाणी गाऊन मुलांना वृक्ष लागवडीबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. मुल्ला सर यांनी केले.

४.४ **ज्येष्ठ नागरिक दिन - दि. १ ऑक्टोबर २०१० :-** विभागीय केंद्र कोकणच्यावतीने दि. १ ऑक्टोबर २०१० रोजी सकाळी ११.०० वाजता स्वयंवर मंगल कार्यालय, माळनाका, रत्नागिरी येथे 'ज्येष्ठ नागरिक दिनी' कोकण विभागातील ज्येष्ठ नागरिकांचे सत्कार व आदर्श शिक्षकांचे सन्मान समारंभ देवरुख येथील आठल्ये सप्रे पित्रे महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. सुरेश जोशी यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांचे शुभहस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. सुरेश जोशी यांचा विभागीय समितीचे उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर यांचे हस्ते सन्मानचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ, श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. १ ऑक्टोबर ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे या जिल्हयातील सामाजिक, सांस्कृतिक, शिक्षण या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी तसेच समाजसेवेत आपले आयुष्य व्यतीत केलेल्या बारा ज्येष्ठ नागरिकांचे सन्मान विभागीय समितीतर्फे करण्यात आले. महाराष्ट्र राज्य शासनाचा 'महात्मा गांधी तंटामुक्त गांव' अभियानांतर्गत सकारात्मक पत्रकारितेबद्दल राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार मिळाल्याबद्दल दै. सकाळचे उपसंपादक श्री. प्रमोद कोनकर यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. जिल्हा समिती रत्नागिरीच्या वतीने ५ सप्टेंबर शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षण सेवेत कार्यरत असताना केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल रत्नागिरी जिल्हयातील सात आदर्श शिक्षकांचेही यावेळी सत्कार करण्यात आले. विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर प्रमुख अतिथी डॉ. सुरेश जोशी यांचे हस्ते ज्येष्ठ नागरिक व आदर्श शिक्षक यांचे सत्कार करण्यात आले. जिल्हा समिती सदस्य श्री. सुनिल शिर्के यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाला विभागीय सदस्य श्री. चंद्रशेखर देशमुख, रायगड जिल्हा समिती अध्यक्ष श्री. पंढरीनाथ पालकर, रत्नागिरी जिल्हा समिती सदस्य व इतर मान्यवर उपस्थित होते.

४.५ **बचत गटातील महिलांनी बनविलेल्या मालाचे भव्य प्रदर्शन व विक्री - दि. २९ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर २०१० :-** विभागीय केंद्र कोकण, रत्नागिरी यांचेवतीने दिपावलीनिमित्त बचत गटातील महिलांनी बनविलेल्या मालाचे भव्य प्रदर्शन व विक्री वरील कालावधीत 'साई मंगल कार्यालय' रत्नागिरी येथे आयोजित करण्यात आले होते. शुक्रवार दि. २९ ऑक्टोबर २०१० रोजी सकाळी ११.०० वाजता महिला बचत गटांच्या वस्तूंच्या प्रदर्शनाचे उद्घाटन सहयाद्री शिक्षण संस्थेच्या चेअरमन मा. अनुराधाताई निकम यांचे शुभहस्ते करण्यात आले. प्रदर्शनामध्ये बचतगट व सेवाभावी संस्था मिळून एकूण ३८ स्टॉल होते. जिल्हाध्यक्षा सौ. युगंधरा राजेशिर्के यांनी केंद्राने दीपावली सणाचा फायदा महिलांना व्हावा हा उद्देश डोळयासमोर ठेवून हे प्रदर्शन आयोजित केले आहे, महिलांनी त्याचा जास्तीत जास्त लाभ उठवावा असे आवाहन केले. दि. ३१ ऑक्टोबर २०१० रोजी प्रदर्शनाचा समारोप करण्यात आला. यावेळी विभागीय केंद्र कोकणचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांचा बचत गटातील महिलांच्यावतीने सत्कार करण्यात आला.

४.६ **यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी - रत्नागिरी जिल्हा समिती - दि. २५ नोव्हेंबर २०१० :-** विभागीय केंद्र कोकणच्या रत्नागिरी जिल्हा समितीच्यावतीने दि. २५ नोव्हेंबर २०१० मा. यशवंतराव चव्हाण यांचे पुण्यतिथी निमित्ताने सहजीवन शिक्षण संस्थेच्या आर्टस्, कॉमर्स कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्‌घाटन जिल्हाध्यक्षा सौ. युगंधरा राजेशिर्के यांचे हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. केंद्राचे जिल्हा समिती सदस्य व सहजीवन कॉलेजचे संचालक श्री. सुनिल शिर्के यांनी प्रास्ताविक केले.

श्री. आनंद कुलकर्णी यांनी आपल्या १ तास २० मिनिटांच्या भाषणामध्ये ओघवत्या शैलीत पुरोगामी महाराष्ट्राची मुहूर्तमेढ रोवणा-या मा. चव्हाणसाहेबांची ओळख श्रोत्यांना करुन दिली. १९६२ च्या युध्दामध्ये पराभूत झालेल्या सैनिकांची पराभूत मनोवृत्ती बदलणे हे मोठे काम मान. यशवंतरावांनी केले व त्यातून १९६५ व पुढे १९७१ चा जगाचा इतिहास घडविणारा विजय भारतीय सेना मिळवू शकली अशी मा. चव्हाणसाहेबांची महती त्यांनी श्रोत्यांसमोर मांडली. या कार्यक्रमाचे संयोजन सहजीवन शिक्षण संस्थेच्या सहाय्याने श्री. सुनिल शिर्के, श्री. बापू काणे, श्री. सतिश चिकणे यांनी केले. या कार्यक्रमाला जिल्हा समिती सदस्य श्री. कमळकर व सौ. जानकी बेलोसे उपस्थित होते. कॉलेजचे प्राचार्य श्री. शेलार यांनी आभार मानले.

जिल्हा समिती सिंधुदुर्ग व प्रमोद धुरी अध्यापक विद्यालय साळगांव यांचे संयुक्त विद्यमाने साळगाव येथे २५ नोव्हेंबर २०१० रोजी चव्हाणसाहेबांचे पुण्यतिथीचा कार्यक्रम श्री. मनोहर खामकर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन कोकण विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. एम. के. गावडे व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. मनोहर खामकर यांचे हस्ते दीपप्रज्वलन करुन व चव्हाणसाहेबांचे प्रतिमेला पुष्पहार घालून करण्यात आले. यावेळी जिल्हा समिती सिंधुदुर्गचे अध्यक्ष ॲड. किशोर शिरोडकर, सदस्या सौ. प्रज्ञा परब, प्रा. अविनाश परब, श्री. प्रसाद कोळंबेकर, सौ. धुरी आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला मोठया संख्येने विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

४.७ **राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा - दि. ७ डिसेंबर २०१० :-** कोकण विभागीय केंद्राच्यावतीने मा. यशवंतराव चव्हाण यांचे स्मृतीदिनानिमित्त राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा चिपळूण येथील लोकमान्य टिळक स्मारक मंदिरच्या अप्पासाहेब साठे सभागृह येथे दि. ७ डिसेंबर २०१० रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात आल्या. स्पर्धेसाठी राज्यभरातून २५ स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्‌घाटन लोकमान्य टिळक वाचनालयाचे अध्यक्ष श्री. प्रकाश देशपांडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने तसेच श्री. बापू काणे यांचे हस्ते मा. यशवंतराव चव्हाण यांचे प्रतिमेला पुष्पहार घालून करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्‌घाटक श्री. प्रकाश देशपांडे यांचे श्री. बापू काणे यांचे हस्ते स्मृतीचिन्ह, पुस्तक, श्रीफळ व गुलाबपुष्प देवून स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हा समितीच्या अध्यक्षा व इतर सदस्य उपस्थित होते. यानंतर बक्षिस समारंभ करण्यात आला. खालील यशस्वी स्पर्धकांना रोख रक्कम, प्रशस्तीपत्रक, सन्मानपत्रक, 'सहयाद्रीचे वारे' पुस्तक व गुलाब पुष्प तसेच सहभागी स्पर्धकांना प्रशस्तीपत्रक देवून गौरविण्यात आले.

आदित्य कुलकर्णी, प्रथम क्रमांक रु. ५,०००/- योगेश बंडागळे, द्वितीय क्रमांक रु. ३,०००/- किशोर आंब्रे, तृतीय क्रमांक रु. २,०००/- प्रसाद गावडे, उत्तेजनार्थ रु. २५१/- प्रियांका कनगुटकर, उत्तेजनार्थ रु. २५१/- वर्षा आपटे, विशेष उत्तेजनार्थ (सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) यानंतर कु. आदित्य कुलकर्णी, योगेश बंडागळे, रमजान गोलंदाज या स्पर्धकांनी आपली मनोगते व्यक्त केली.

४.८ **यशवंतराव चव्हाण यांचे टपाल तिकिट प्रकाशित कार्यक्रम - २३ डिसेंबर २०१०** :- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या प्रयत्नातून आणि टपाल विभागाच्या सहकार्यातून मुंबई येथे दि. २२ डिसेंबर २०१० रोजी श्रीमती राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचे हस्ते मा. यशवंतराव चव्हाण यांच्या आकर्षक टपाल तिकिटाचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर दि. २३ डिसेंबर २०१० रोजी विभागीय समिती कार्यालयात अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, विभागीय समिती सदस्य डॉ. तानाजीराव चोरगे, रत्नागिरी जिल्हा समिती अध्यक्षा सौ. युगंधरा राजेशिर्के इत्यादी मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वलन करुन तिकिट विक्रीचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हा समिती सदस्य श्री. महंमदशेठ रखांगी, श्री. कमळकर, रत्नागिरी पोस्ट ऑफीसचे पोस्टमास्तर श्री. जी. एस. राणे, पोस्टल असिस्टंट श्री. ए. एल. धनावडे उपस्थित होते. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे शिल्पकार आहेत. त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उपक्रमाला टपाल विभागाने सहकार्य केल्याबद्दल विभागीय समिती अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांनी आभार मानले.

४.९ **'आयुष्यक्रमावर बोलू काही' - दि. ५ जानेवारी** २०११ :- विभागीय केंद्र कोकण जिल्हा समिती सिंधुदुर्ग, निसर्ग संवर्धन मंच सारंगी ग्रूप व पत्रकार संघ माणगांव यांचे संयुक्त विद्यमाने दि. ५ जानेवारी २०११ रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत 'आयुष्यक्रमावर बोलू काही' हा १० वी, ११ वी व १२ वीच्या तसेच महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी व पालक यांच्यासाठी 'करियर गायडन्स व्यवसाय मार्गदर्शन' हा कार्यक्रम विभागीय समितीचे सदस्य श्री. एम. के. गावडे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी सिंधुदुर्ग जिल्हा समिती अध्यक्ष ॲड. किशोर शिरोडकर, सदस्या प्रज्ञा परब, ॲड. गौत्तम गवाणकर, श्री. डी. के. सावंत, श्री. आ. द. राणे, श्री. नकुल पार्सेकर, डॉ. हर्षल सागावकर, श्री. शशिकांत कदम, श्री. रणजित सावंत, कॅप्टन बबन खोचरे, श्री. जनार्दन पिळणकर, श्री. वि. न. आकेरकर व श्री. विजय पालकर उपस्थित होते. व्यवसाय, उद्योग, नोकरी संदर्भात युवक युवतींना मार्गदर्शन करताना कोणत्या व्यवसायिक संधी, मार्ग व दिशा त्यांच्या समोर ठेवता येतील ? विद्यार्थ्यांनी आपली प्रत्येकाची शारीरिक बौधिक क्षमतेचा विकास करुन स्वतःला जीवनात कोण बनायचे आहे ? कोणता व्यवसाय स्विकारायचा आहे ? तसेच आपल्या आवडीचा कोणता विषय आहे ? याबाबत ॲड. श्री. गवाणकर, प्रा. अरुण पणदूरकर, डॉ. सागावकर, श्री. डी. के, सावंत व श्री. शशिकांत कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी श्री. गौत्तम गवाणकर यांनी कायदा विषयात मुंबई विद्यापीठात सुवर्णपदक मिळविल्याबद्दल श्री. आ. द. राणे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला उपस्थित पाहुण्यांचे स्वागत श्री. मनोहर खामकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व प्रास्ताविक श्री. एकनाथ केसरकर तर सूत्रसंचलन श्री. अशोक सावंत यांनी केले.

४.१० **ठाणे जिल्हा समिती कार्यालयाचे उद्घाटन - दि. २५ फेब्रुवारी २०११** :- कोकण विभागीय केंद्र, जिल्हा समिती ठाणे स्थापना व उद्घाटन दि. २५ फेब्रुवारी २०११ रोजी बदलापूर येथे विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांच्या हस्ते व मा. आमदार श्री. किसन कथोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी श्री. राजाभाऊ लिमये यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत ठाणे जिल्हा समितीचे अध्यक्ष म्हणून श्री. श्रीधर पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली. या सभेसाठी श्री. किसन चौधरी, रत्नागिरी जिल्हाध्यक्षा सौ. युगंधरा राजेशिर्के, सचिव श्री. अनिल नेवाळकर, ठाणे जिल्हा समितीचे सदस्य उपस्थित होते.

४.११ **पाणी विचार परिषद - दि. २७ फेब्रुवारी २०११ :-** जिल्हा समिती सिंधुदुर्ग व टाळंबा पाटबंधारे लाभक्षेत्र विकास परिषद यांचे संयुक्त विद्यमाने दि. २७ फेब्रुवारी २०११ रोजी गोपिका मंगल कार्यालय, तालुका कुडाळ येथे 'पाणी विचार परिषद' चे आयोजन करण्यात आले होते. सिंधुदुर्ग जिल्हा समितीचे अध्यक्ष ॲड. किशोर शिरोडकर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. या सभेला १७५ शेतकरी, बागायतदार, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, सरपंच, लोक प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रसाद देवधर, डॉ. नितीन सावंत, श्री. अरविंद रानडे, श्री. पुष्पसेन सावंत, श्री. वसंत केसरकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये टाळंबा प्रकल्पातील अडचणींवरील तोडगा, लहान मोठ्या धरणांवर आधारित मत्स्य शेती तसेच प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न याबाबत चर्चा करण्यात आली.

४.१२ **जागतिक महिला दिन - दि. ५ मार्च ते ८ मार्च २०११ :-** कोकण विभागीय केंद्राचे वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रत्नागिरीतील जे. के. फाईल येथील 'साई मंगल कार्यालय' येथे बचत गटातील तसेच उद्योगिनी महिलांनी बनविलेल्या मालाचे भव्य प्रदर्शन व विक्री स्टॉल्स महिलांसाठी विविध फनी गेम्स स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम व आरोग्य तपासणी असा भरगच्च कार्यक्रम दि. ५ मार्च ते ८ मार्च २०११ या कालावधीत संपन्न झाला. दि. ५ मार्च २०११ रोजी सकाळी ११.०० वाजता महिला बचत गटांच्या वस्तूंच्या प्रदर्शनाचे उद्घाटन सिंधुदुर्गातील सहयाद्री वाहिनी पुरस्कार व सावित्रीबाई फुले पुरस्कार प्राप्त तसेच सिंधुदूर्ग महिला काथ्या कामगार औद्योगिक संस्थेच्या संचालिका व जिल्हा समिती सिधुदूर्गच्या सदस्या **सौ. प्रज्ञा परब** यांचे शुभहस्ते करण्यात आले. यावेळी विभागीय समितीचे उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, विभागीय समितीचे कोषाध्यक्ष श्री. एम. के. गावडे, रत्नागिरी जिल्हाध्यक्षा सौ. युगंधरा राजेशिर्के, तालुका समिती अध्यक्ष श्री. नितीन कानविंदे व जिल्हा समिती सदस्य उपस्थित होते. दि. ८ मार्च २०११ रोजी सदर प्रदर्शनाची सांगता विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांच्या उपस्थितीत झाले.

४.१३ **महिला दिन ठाणे - दि. ८ मार्च २०११ :-** कोकण विभागीय केंद्र जिल्हा समिती ठाणे व 'पुण्यनगरी सई' यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ मार्च २०११ रोजी 'जागतिक महिला दिन' कार्यक्रम ठाणे येथे साजरा करण्यात आला. जिल्हा समिती ठाणेचे अध्यक्ष श्री. श्रीधर पाटील, सचिव श्री. रविंद्र घोडविंदे व मुरबाडचे श्री. किसन चौधरी आदि मान्यवर उपस्थित होते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची ओळख, वेशभूषा स्पर्धा, कर्तृत्ववान महिलांचा सत्कार, स्पर्धांचा बक्षिस समारंभ, झी मराठीवरील 'वारस' या मालिकेची नायिका सीया पाटील यांची जाहीर मुलाखत तसेच कर्तृत्ववान महिलांचा सत्कार असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला ७०० ते ७५० महिला उपस्थित होत्या.

४.१४ **यशवंतराव चव्हाण जयंती - दि. १२ मार्च, २०११ :-** कोकण विभागीय केंद्र जिल्हा समिती सिंधुदूर्गच्यावतीने मा. आमदार श्री. दीपकभाई केसरकर यांच्या संपर्क कार्यालयात सावंतवाडीच्या नगराध्यक्षा सौ. पल्लवी केसरकर यांच्या हस्ते मा. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांची जयंती साजरी करण्यात आली.

## १०.५ विभागीय केंद्र नाशिक :-

५.१ **यशवंत काव्योत्सव - शनिवार दि. १०.०४.२०१० :-** उत्तर महाराष्ट्रातील कवींना व्यासपीठ मिळावे यासाठी नाशिक विभागीय केंद्राच्यावतीने सावरकर नगर येथील सभागृहात यशवंत काव्योत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी

केंद्राचे अध्यक्ष श्री. विनायकदादा पाटील होते. यावेळी साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल श्री. वसंत आबाजी डहाके यांचा नाशिककरांच्यावतीने अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कवी श्री. अरुण म्हात्रे यांनी श्री. डहाके यांची कवितेकडे बघण्याची वेगळी संथा दिल्याचे सांगितले. केंद्राचे अध्यक्ष श्री. विनायकदादा पाटील यांनी कविता हे विरंगुळयाचे साधन असून, कवितेशिवाय सांस्कृतिक केंद्र पूर्णत्वास जाऊच शकत नसल्याचे सांगितले. सूत्रसंचालन केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर यांनी केले. श्री. विनायक रानडे यांनी परिचय करुन दिला तर श्री. चारुहास कुलकर्णी यांनी काव्योत्सवाची भूमिका स्पष्ट केली. प्रारंभी शिक्षणमहर्षी भाऊसाहेब थोरात, नाटयनिर्माता मोहन वाघ, कविवर्य विंदा करंदीकर या दिवंगतांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री. स्वानंद बेरकर व श्री. अभय सदावर्ते यांनी 'गोदातटीचा काव्यतिहास' या कार्यक्रमातून नाशिकच्या दिवंगत कवींच्या कवितांचा अभ्यासपूर्ण वेध घेतला. काव्योत्सवाच्या दुस-या सत्रात अनेक मान्यवर कवींनी आपल्या कविता सादर केल्या. निसर्गातून देवत्वाचा अंश कसा दिसतो, त्याचे प्रत्यंतर श्री. कमलाकर देसले यांनी त्यांच्या 'पाहिले पत्थरातून डोलणारे फूल मी, ईश्वरा घेतली बघ तुझी चाहूल मी' या कवितेतून उलगडून दाखविले, तर श्री. संदीप देशपांडे यांनी 'दंगलीचे वृत्त पसरताच, पाखरं स्तब्ध झाली, स्वच्छंदीपणा हिरावून घेणा-या माणसाच्या वृत्ती विरुध्द पाखरं आता आंदोलनाच्या तयारीत आहे' अशी दंगलीतले क्रौर्य उलगडून दाखविणारी कविता सादर केली. त्याशिवाय श्री. सुरेश मेणे (वर्तमानपत्र), श्रीमती हर्षाली देशमुख (देश है या मंदिर है ये), श्रीमती रजनी ठाकूर (तनहाई), श्रीमती शशिकला देशमाने (मा मै तेराभी अंश), श्री. काशिनाथ वेलदोडे (जीवन एक सुलभ शौचालय), श्री. राम पाठक, श्री. योगेश जाधव (आकाश), श्री. प्रशांत केदळे (कविता), श्री. संजीव अहिरे (हताश नोटा), श्री. दयाराम अहिरे (कष्टकरी बाप), श्री. गणेश मोहाळ (शहरातल्या पोरी), श्री. विनय मिठे (शेतक-यांचा आसूड) श्री. गिरीश पाटील (मी मंदिर सोडून हिंडतो), श्रीमती स्मिता जाधव (गझल), श्री. राजेंद्र सोमवंशी (लेक), श्री. अशोक भालेराव ( धरती झाली कोरी ), श्रीमती निशीगंधा घाणेकर ( सोनसळी-सोनसळी ), श्री. सोमनाथ साखरे (गझल), श्री. अरविंद गाडेकर (महागाईची चव), श्री. ज्ञानेश अकसाल (धूळ आणि माती), श्रीमती सविता पन्हाळे (प्रिया) आदि कवींनी त्यांच्या कविता सादर केल्या. प्रख्यात कवी श्री. अरुण म्हात्रे यांनी अत्यंत प्रभावीपणे सूत्रसंचालन करुन कार्यक्रमात रंगत भरली. सायंकाळच्या काव्योत्सवास नाशकातील काव्यप्रेमी उपस्थित होते.

५.२ **सुजाण नाटय प्रशिक्षण शिबीर - दि. ४.५.२०१० ते दि. १२.५.२०१०** :- नाटय कलेविषयी अभिरुची व जाणीव घडण्यासाठी व व्यक्तिमत्त्व विकासासाठी नाटय प्रशिक्षण शिबीर ही महत्वाची गरज असून त्यातूनच उद्याचे नाटय-चित्रपट क्षेत्रातील कलाकार निर्माण होतील व कलेचा नवा अविष्कार सादर करतील असे प्रतिपादन अखिल भारतीय नाटय परिषदेचे कार्यवाह श्री. जयप्रकाश जातेगावकर यांनी केले. विभागीय केंद्र नाशिकतर्फे आयोजित सुजाण नाटय प्रशिक्षण शिबिराच्या समारोपप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. श्री. जातेगांवकर पुढे म्हणाले की, आजच्या रंगभूमीला, चित्रपट क्षेत्राला नव्या लेखक, दिग्दर्शक कलाकारांची गरज असून अशा शिबिरातूनच प्रतिभावंत कलावंत निर्माण होतील. यासाठी कुठल्याही स्पर्धेत न अडकता प्रामाणिकपणे काम करीत राहणे हे कलाकाराने पहिले कर्तव्य मानले पाहिजे. यावेळी त्यांनी कला क्षेत्रातील बदल, नाटय-चित्रपटांचे समकालीन विषय यांचाही आढावा घेतला. यावेळी श्री. जातेगावकर यांच्या हस्ते सहभागी शिबिरार्थींना

प्रशस्तीपत्रे देण्यात आली. शिबिराच्या मार्गदर्शक सुप्रसिध्द अभिनेत्री श्रीमती अनिता दाते म्हणाल्या की, मुंबई पुण्या बाहेरच्या कलावंतांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी अशी शिबिरे पूरकच आहेत. शिबिरार्थीनी यावेळी पर्यावरण संतुलन, सामाजिक एकोपा या विषयावरील नाटिका सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विनोद राठोड यांनी केले. या शिबिरात वाचिक अभिनय, शब्दोच्चार अशा अनेक विषयांवर मार्गदर्शन केले.

५.३ **सुवर्णयुगाच्या स्वप्नांसाठी व्याख्यानमाला - दि. ६.५.२०१० ते दि. १०.५.२०१०** :- हिंदवी स्वराज्यासाठी लढणे हा वारसा छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राला दिलेला आहे. वारकरी-भक्तीसंप्रदायाने महाराष्ट्र जागा केला. अखंड भारतासाठी लढणे आणि भारताच्या सुवर्णयुगाचे स्वप्न पाहणे हे महाराष्ट्राचे काम असल्याचे प्रतिपादन चाणक्य मंडळाचे संस्थापक श्री. अविनाश धर्माधिकारी यांनी नाशिक वसंत व्याख्यानमालेत वक्ते म्हणून बोलताना केले. यशवंतराव महाराज पटांगणावर नाशिक विभागीय केंद्राच्या सहकार्याने आयोजित व्याख्यानमालेत 'सुवर्णयुगाच्या स्वप्नांसाठी' या विषयावर बोलताना धर्माधिकारी यांनी सांगितले की, महाराष्ट्राचा आत्मा दोन सूत्रात बांधलेला आहे. 'अवघे विश्वची माझे घर' असे सांगणा-या ज्ञानोबा आणि तुकोबांचा वारसा महाराष्ट्राला लाभलेला आहे. तिथे अद्वैत भक्ती आहे. विषमतेला थारा नाही. एकच ईश्वर सर्वांमध्ये भरलेला आहे. दुसरे सूत्र हे हिंदवी स्वराज्याचे स्वप्न आहे. अशा अनेकबाबीवर त्यांनी भाष्य केले. श्री. अविनाश धर्माधिकारी यांचा परिचय केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर यांनी करुन दिला. याप्रसंगी वसंत व्याख्यानमालचे अध्यक्ष श्री. श्रीकांत बेणी, वसंतोत्सवाचे अध्यक्ष श्री. अनंत राजेगांवकर, कार्याध्यक्ष श्री. मधुकर झेंडे, श्री. अशोक देशमुख, श्री. अरुण शेंदुर्णीकर, श्री. सावळीराम तिदमे व असंख्य रसिक उपस्थित होते.

५.४ **असाही एक महाराष्ट्र - छायाचित्र प्रदर्शन : दि. २०.५.२०१० ते २३.५.२०१०**:- महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधत प्रसिध्द छायाचित्रकार श्री. संदेश भंडारे यांचे छायाचित्र प्रदर्शन 'असाही एक महाराष्ट्र' आयोजन करण्यात आले होते. नाशिक विभागीय केंद्राच्यावतीने आयोजित या छायाचित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्रसिध्द लेखक श्री. दिनानाथ मनोहर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी केंद्राचे सदस्य श्री. गुरुमित बग्गा, श्री. विनायक रानडे, ज्येष्ठ चित्रकार श्री. शिवाजी तुपे, चित्रकार श्रीमती मुक्ता बालिगा, श्री. बाळ नगरकर, श्री. अशोक धिवरे आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व सूत्रसंचालन श्री. हरिभाऊ कुलकर्णी यांनी केले.

५.५ **पर्यावरण शिक्षण शिबीर : दि. २३.७.२०१० ते २७.७.२०१०** :- अलीकडे नवीन तंत्रज्ञानामुळे पर्यावरणावर दुष्परिणाम होत आहे. पृथ्वीवरील नैसर्गिक स्त्रोत मर्यादित असल्यामुळे विकासाला मर्यादा येणारच याची जाणीव आता होऊ लागलेली आहे. म्हणूनच मानवी महत्वाकांक्षेला लगाम घालणे गरजेचे बनले आहे. दुय्यम गरजांसाठी पर्यावरणीय संसाधनांचा अवाजवी वापर थांबवणे ही काळाजी गरज बनली आहे असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे सरचिटणीस श. गं. काळे यांनी केले. विभागीय केंद्र नाशिक व विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट यांच्यातर्फे आयोजित तीन दिवसीय पर्यावरण शिक्षण शिबिराचा समारोप करतांना ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, सौरऊर्जेच्या तंत्रज्ञानात क्रांतिकारक विकास घडून आल्यास ऊर्जेची फार मोठया प्रमाणातील गरज भागू शकते. विशेषतः भारतीय उपखंडाला या सौरऊर्जेचा फायदा अधिक होऊ शकतो असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

माजी वनमंत्री व विभागीय केंद्र, नाशिकचे अध्यक्ष श्री. विनायकदादा पाटील म्हणाले की, पर्यावरणाचा -हास मानवाने आपल्या सोयीसाठी केलेला आहे. आता त्याचे दुष्परिणाम जाणवू लागत असल्यामुळे पर्यावरण संरक्षणासाठी प्रयत्न होतांना दिसत आहेत. याकामी स्थानिकांचा सहभाग महत्वाचा राहणार आहे. केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर म्हणाले की, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत तापमानवाढ, पाणी टंचाई हे विषय अधिक व्यापाक दृष्टीने समजून घेणे महत्वाचे आहे. परंतु पर्यावरणाविषयी जरी समाजामध्ये अनेक समज असले तरी पर्यावरण हा विषय अतिशय व्यापक असल्यामुळे त्याचा नेमका आवाका समजून घेतला पाहिजे. या क्षेत्रामध्ये कार्य करणा-या सामाजिक संस्था, संघटनांनीही पर्यावरण संरक्षणासाठी विकास कामांना नुसता विरोध न करता विकास व पर्यावरण संवर्धन यांचे संतुलन कसे साधता येईल यासाठी पर्याय सुचवावेत. पर्यावरण तज्ज्ञ श्री. पार्थ बापट व श्रीमती दीप्ती बापट यांनी पर्यावरण स्तुप याविषयी सविस्तर वर्णन करतांना पर्यावरणातील जीवांचे परस्परावलंबित्व व अन्नसाखळीवर बदलत्या वातावरणाचा होणा-या विपरित परिणामांची भीषणता त्यांनी स्पष्ट केली. यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, संघटक श्री. नीलेश राऊत व इतर शिबिरार्थी उपस्थित होते.

५.६ **रोजगार हमी योजना कृती कार्यक्रम बैठक : दि. ५ ऑगस्ट २०१० :-** रोहयोतील समस्यांचे व्यापक परिणाम, संभाव्य उपाय, आपापल्या कामाच्या पध्दतींचे यशापयश आणि सामूहिक कृतीबाबत विचार विनिमय करण्यासाठी गुरुवार दिनांक ५ ऑगस्ट २०१० रोजी नाशिक येथे एक दिवसीय 'रोहयो कृती कार्यक्रम' बैठक नवमहाराष्ट्र युवा अभियान, विश्वास ज्ञान प्रबोधिनी अँड रिसर्च इन्स्टिटयूट आणि प्रगती अभियान, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. बैठकीसाठी महाराष्ट्रातल्या वेगवेगळया भागातील २५ कार्यकर्ते एकत्र आले होते.

पहिल्या सत्रात रोहयोतील 'मागेल तेव्हा काम, मागेल तितके दिवस काम, वेळेवर मजुरी आणि योग्य मजुरी' हे चार मुलभूत हक्क मिळवतांना लोकांना येणा-या अडचणींबावत चर्चा झाली. ग्रामपंचायतींकडे अग्रीम निधी उपलब्ध नसल्यामुळे कामे त्वरीत सुरु करणे आणि वेळेवर मजुरी वाटप करणे ग्रामपंचायतींना शक्य होत नाही. रोहयोसाठी पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ नाही. मेळघाटामध्ये '६३ ग्रामपंचायतीतील १५५ गांवांसाठी ३५ ग्रामसेवक आहेत' अशी आकडेवारी तेथील कार्यकर्त्यांनी मांडली. अशा प्रकारच्या अनेक अडचणी चर्चेतून समोर आल्या.

दुस-या सत्रात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन रोहयोतील मस्टर, मोजमाप, माहिती संकलन इत्यादी प्रक्रिया अधिक कार्यक्षम करता येतील याबाबतच्या आपल्या कामाची निर्माण गटाचे श्री. धनंजय मुळी यांनी मांडणी केली.रोहयोच्या संकेतस्थळावरील जॉबकार्डवरील माहिती संक्षिप्त स्वरुपात मजुराला उपलब्ध करुन देण्यासाठी निर्माण गटाने तयार केलेल्या सॉफ्टवेअरचीसुध्दा मांडणी करण्यात आली. त्याचा उपयोग करुन घेत जव्हारमधील श्री. मिलींद थत्तेंच्या मार्गदर्शनाखाली काम करणा-या 'वयम' गटाचे श्री. विनायक थाळकरांनी तिथल्या गांवामधील भ्रष्टाचार उघडकीस आणण्याचा आपला अनुभव मांडला. ऑनलाईन तक्रार निवारण पध्दतीच्या आपल्या अनुभवाची मांडणी प्रगती अभियानाच्या श्रीमती अश्विनी कुलकर्णींनी केली. तिस-या सत्रात मिटींगसाठी जमलेल्या कार्यकर्त्यांना सामूहिक कृतीची गरज प्रकर्षाने जाणवल्यामुळे रोहयो कृती समितीची स्थापना करण्यात आली. बैठकीचा समारोप नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ यांनी केला.

५.७ **हाक ... एक आठवण : दि. ७ ऑगस्ट २०१० :-** केवळ गप्पा आणि जुन्या आठवणींना मारत असणा-या हाका अशा अनोख्या संकल्पनेतून साकारलेला 'हाक.... एक आठवण' या अभिनव संगीत मैफलीचे केंद्राने आयोजन केले होते.

डोळयामधल्या पाण्याला आणि कपाळावरच्या आठयांना माळयावर कोंडून ठेवणारी नव्या गीतांची ही मैफल नाशिककर रसिकांना स्वरधारांचा अनोखा अनुभव देणारी होती. वेगळा विषय आणि वेगळा आशय घेऊन 'हाक... एक आठवण' ची मैफल रंगत गेली. मैत्रिण, शाळा-महाविद्यालयातील काही नाजूक क्षण, काही हळवे प्रसंग... अशी मोरपंखी वळणे घेत हा कार्यक्रम जनरेशन गॅप, हरवत चाललेली नाती, व्यावहारिक जगात नाहिशी झालेली माणुसकी, देवरुपाने समोर येणारे मित्र अशा अनेक आठवणींशी गप्पा मारत, मराठी माती, मराठी नाती आणि सीमेवर लढणा-या सैनिकांपर्यंत जातो. या कार्यक्रमातील गीते आणि कविता पुण्यातील डॉ. राहूल देशपांडे यांची होती. 'टिंग्या' आणि 'प्रतिसाद' या मराठी चित्रपटांमुळे प्रसिध्दीस आलेल्या श्री. रोहित नागभिडे आणि श्रीमती धनश्री गणात्रा यांचे संगीत या कार्यक्रमाला लाभले. श्री. चंद्रशेखर महामुनी, श्रीमती रमा कुलकर्णी, श्रीमती धनश्री गणात्रा, श्री. आमोद कुलकर्णी, श्री. निखिल महामुनी, श्री. रोहित नागभिडे आणि डॉ. राहूल देशपांडे यांनी यातील गीतांचे गायन केले. या कार्यक्रमात तबल्याची जबाबदारी श्री. आमोद कुलकर्णी यांनी सांभाळली आहे. या संपूर्ण कार्यक्रमाची संकल्पना त्यांची असून त्यांच्या ठेक्यामुळे हा संपूर्ण कार्यक्रम एक वेगळीच उंची गाठतो. यावेळी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर यांनी केले. कार्यक्रमास ॲड. विलास लोणारी, श्रीमती अश्विनी बोरस्ते, श्री. भास्करराव कोठावदे, डॉ. स्वाती करकरे व मोठया संख्येने रसिक उपस्थित होते.

५.८ **ए जर्नी फॉर एव्हर : इंस्किलार ॲन्ड अदर स्टोरीज पुस्तक प्रकाशन समारंभ - दि. ११ ऑगस्ट २०१० :-** मराठीतील प्रख्यात कथालेखक जी. ए. कुलकर्णी यांच्या चौदा निवडक कथा डॉ. विलास साळुंके यांनी अनुवादित केलेल्या 'द जर्नी फॉर एव्हर : इस्किलार अँड अदर स्टोरीज' या पुस्तकाचे प्रकाशन काल समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. नाशिक विभागीय केंद्रातर्फे सावरकरनगरमधील सभागृहात हा कार्यक्रम झाला. प्रारंभी केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर यांनी स्वागत केले. डॉ. इंजली पटवर्धन-कुलकर्णी म्हणाल्या की, साळुंके यांनी जिद्द व अथक परिश्रमातून अनुवादाचे आव्हान पेलले आहे. या कार्यक्रमासाठी दैनिक लोकमतचे माजी संपादक श्री. दत्ता सराफ, साहित्यिक श्री. चंद्रकांत महामिने, डॉ. पी. एस. पवार, श्री. गणेश ओतूरकर, कवी श्री. किशोर पाठक, कवी श्री. राम पाठक, डॉ. यशवंत बर्वे, प्रा. अनंत येवलेकर व मोठया संख्येने रसिक उपस्थित होते.

५.९ **महाराष्ट्रातील प्रसार माध्यमे आणि प्रसार माध्यमातील महाराष्ट्र : परिसंवाद - दि. १४ ऑगस्ट २०१० :-** साधारणतः कोणत्याही क्षेत्रातील परीक्षांमध्ये पहिल्या पाच क्रमांकांवर मुलीच असतात परंतु नंतर त्या कुठे जातात हे कळत नाही ही चिंताजनक बाब आहे. तसेच इंग्रजी आणि अन्य भाषिक वृत्तपत्रांमध्ये अनेक महिला संपादक संपादनाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडत असताना मराठी वृत्तपत्रांमध्ये एकही महिला संपादक नाही ही महाराष्ट्राच्या दृष्टीने शोकांतिका असल्याची खंत आयबीएन लोकमत नाशिकच्या ब्युरो चिफ श्रीमती दीप्ती राऊत यांनी व्यक्त केली.

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला नवमहाराष्ट्र युवा अभियान, एचपीटी महाविद्यालय आणि विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट यांच्या विद्यमाने आयोजित युवा परिसंवादामध्ये 'महाराष्ट्रातील प्रसारमाध्यमे आणि प्रसारमाध्यमातील महाराष्ट्र' या विषयावर आयबीएन लोकमत नाशिकच्या चिफ ब्युरो दीप्ती राऊत प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन एचपीटी महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही. एम. सूर्यवंशी व विद्यार्थी प्रतिनिधी यांनी मशाल पेटवून केले. यावेळी पत्रकारिता विभागाच्या प्रमुख प्रा. वृंदा भार्गवे, नवमहाराष्ट्र युवा अभियानचे विभागीय समन्वयक श्रीमती दीपाली मानकर, राज्य सहसंघटक

डॉ. अमित नागरे उपस्थित होते. परिसंवादामध्ये भूमिका मांडतांना डॉ. अमित नागरे यांनी प्रतिष्ठानची युवा चळवळ असलेल्या नवमहाराष्ट्र युवा अभियानाने राज्यातील अनेक सामाजिक संस्थांना बरोबर घेऊन महाराष्ट्र राज्यासाठी युवा धोरण बनवून शासनास सादर केले आहे. याबरोबरच युवा अभिसरण, युवा फेलोशिप, शैक्षणिक प्रदर्शने, युवती मेळावे यासारखे नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत.

५.१० **युनिकोड कार्यशाळा : दि. २८ ऑगस्ट २०१० :-** मराठी अभ्यास केंद्र आणि नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या मराठी युनिकोड कार्यशाळेचे उद्‌घाटन श्री. दीपक पवार यांनी केले. सदर कार्यशाळा ही नाशिकमध्ये दोन ठिकाणी संपन्न झाली. पहिली कार्यशाळा ही गोपाळकृष्ण गोखले स्कूल ऑफ मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम यांच्या विद्यमाने पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात आलेली होती. यामध्ये विद्यार्थ्यांना संगणकीय व्यवहारांसाठी युनिकोड या संकेत पध्दतीच्या वापराचे सादरीकरण व प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. यानंतरची कार्यशाळा ही विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूटच्या विद्यमाने त्यांच्या सभागृहामध्ये आयोजित करण्यात आलेली होती. नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या संयुक्त विद्यमाने अशा कार्यशाळा महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये आयोजित करण्याचे ठरविले आहे असेही यावेळी श्री. पवार यांनी सांगितले.

संगणकावर मराठी भाषा वापरण्याकरिता उपलब्ध असलेल्या अनेक सॉफ्टवेअर्स व टंकांमुळे मराठीचा वापर वाढण्याऐवजी गोंधळ निर्माण झाला आहे. संगणकातील युनिकोड या संकेत पध्दतीमुळे संगणकावर मराठीच्या वापराचे प्रमाणीकरण याअगोदरच झालेले असल्यामुळे इंग्रजीसारखे सर्व प्रगत संगणकीय व्यवहार मराठीतही सहजपणे करता येतात. युनिकोड विनामूल्य उपलब्ध असून संगणकाच्या ऑपरेटिंग सिस्टिममध्येच बसविलेली असते. त्यामुळे युनिकोडद्वारे एम.एस. वर्ड, एक्सेल, पॉवर पॉईंट यासारखे नित्य वापरातील व्यवहार मराठीतून सहजपणे करता येतात अशी माहिती या कार्यशाळेमध्ये देण्यात आली. मराठी अभ्यास केंद्राच्या पाठपुराव्यामुळे संगणकावर मराठीच्या व्यवहाराकरिता युनिकोडचा वापर व्हावा यासाठी महाराष्ट्र शासन आणि सिडॅक यासारख्या यंत्रणांनी महत्वपूर्ण निर्णय घेतलेले आहेत. अभ्यास केंद्राने मराठी शाळेच्या सक्षमीकरणासाठीही कृती आराखडा तयार करुन विविध संस्थांच्या मदतीने प्रयत्न करण्याचे ठरविले आहे. याकरिता नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि विश्वास ज्ञान प्रबोधिनी अँड रिसर्च इन्स्टिटयूटतर्फे सर्व ते सहकार्य करण्याचे आश्वासन प्रबोधिनीचे सचिव श्री. विश्वास ठाकूर यांनी दिले.

५.११ **घन गरजे : संगीत मैफल : दि. २८ ऑगस्ट २०१० :-** विभागीय केंद्र नाशिकतर्फे शास्त्रीय, उपशास्त्रीय वर्षा ऋतु संगीत मैफीलीचे आयोजन करण्यात आले होते. पं. जितेंद्र अभिषेकी यांचे शिष्य श्री. मकरंद हिंगणे व श्रीमती सुखदा बेहेरे यांनी ही मैफल सादर केली. कार्यक्रमाची सुरुवात मियॉमल्हार रागातील पारंपारिक ख्यालाने झाली. कार्यक्रमासाठी संगीत साथ श्री. प्रमोद भडकमकर (तबला), श्री. अनिल दैठणकर (व्हायोलिन) यांनी केली तर श्री. चारुदत्त कुलकर्णी ऊर्फ कवी श्री. अज्ञात यांनी निवेदन केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक श्री. हरी विनायक कुलकर्णी यांनी केले.

५.१२ **गीत विंदा : संगीत मैफल - दि. २९ ऑगस्ट २०१० :-** विभागीय केंद्र नाशिकतर्फे तत्त्वप्रधान कविता लिहिणा-या कवी विंदा करंदीकरांच्या शब्दांना सप्तसुरांमध्ये गुंफण्याचा प्रयत्न नाशिकच्या कलावंतांनी केली. 'गीत विंदा' या मैफलीच्या माध्यमातून

मोहक संगीतानुभव नाशिककर रसिकांच्या मनपटलावर कायमचा कोरला गेला. विंदा करंदीकर यांच्या पहिल्या स्मृतीदिनाच्या निमित्ताने सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विंदा करंदीकर यांच्या काही निवडक कवितांना श्री. मोहन उपासनी यांनी अनवट चाली देण्याचा प्रयत्न केला आणि श्रीराम तत्त्ववादी, रागिणी कामतीकर, पुष्कराज भागवत यांनी त्यांना स्वरबध्द करत उपस्थितींकडून दाद मिळविली. कार्यक्रमास केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर, अॅड. विलास लोणारी, श्री. माधवराव पाटील, श्री. लक्ष्मण सावजी, श्री. मधुकर झेंडे व मोठया संख्येने रसिक उपस्थित होते.

५.१३ **मुलाखत व सुत्रसंचालन कार्यशाळा : दि. ३ ऑक्टोबर २०१०** :- विभागीय केंद्र नाशिक व 'संवाद' नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'सूत्रसंचालन व मुलाखत' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना आजच्या गतीमान कॉर्पोरेट जगात टी.व्ही. चॅनेल्स, वृत्तवाहिन्यांच्या दुनियेत सूत्रसंचालक, निवेदक यांना वाढती मागणी असणार आहे म्हणूनच 'करिअर' साठी उत्तम पर्याय म्हणून सूत्रसंचालक हया क्षेत्राचा तरुण पिढीने जाणीवपूर्वक विचार करावा असे प्रतिपादन सुप्रसिध्द निवेदक व मुलाखतकार श्री. सुधीर गाडगीळ यांनी केले. केंद्राच्या आनंदवल्ली येथील सभागृहात ही कार्यशाळा संपन्न झाली. निवेदनाचा प्रतिनिधीक गृहपाठ म्हणून आ. श्री. हेमंत टकले यांची मुलाखत निवडक शिबीरार्थी व श्री. सुधीर गाडगीळ यांनी घेतली. यावेळी त्यांनी साहित्य-कला-सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांच्या मुलाखतींचे किस्से कथन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर यांनी केले. संवादचे अध्यक्ष सुप्रसिध्द लेखक श्री. चंद्रकांत महामिने यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. श्री. गाडगीळ यांचा परिचय कवी श्री. किशोर पाठक यांनी करुन दिला. आभार श्री. अभिमन्यू सूर्यवंशी तर सूत्रसंचाल्न श्री. सुनिल देशपांडे यांनी केले. यावेळी श्री. गुरुमित बग्गा, श्रीमती सुनिता निमसे व शंभरहून अधिक शिबिरार्थी उपस्थित होते.

५.१४ **आनंदयात्रा : दि. २४ नोव्हेंबर २०१०** :- यशवंतरावजी चव्हाण यांच्या २६ व्या स्मृतीदिनानिमित्त सुप्रसिध्द कवी, गीतकार श्री. प्रसाद कुलकर्णी यांच्या 'आनंदयात्रा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर यांनी केले. परिचय श्री. विनायक रानडे यांनी करुन दिला. कार्यक्रमासाठी अध्यक्ष विनायक पाटील, दत्ता सराफ, अशोक राणे, नरेश महाजन, लोकेश शेवडे आदी मान्यवर उपस्थित होते.

५.१५ **भारतीय कला - व्याख्यानमाला : दि. ३ ते ८ डिसेंबर २०१०** :- विभागीय केंद्र, नाशिक व स्ट्रिंग्ज म्युझिकल अॅकेडमीतर्फे सुप्रसिध्द कला अभ्यासक डॉ. वि. य. कुलकर्णी यांच्या 'भारतीय कला' यामध्ये प्रथम चित्रकला, शिल्पकला, नाटयकला, संगीत, नृत्यकला या विषयावरील दि. ३ ते ८ डिसेंबर २०१० पर्यंत व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय कलांचा उगम आणि त्याचा काळानुसार होत गेलेला विकास, स्थित्यंतरे व कला माध्यमाची आजच्या काळाची बदलती रुपे हे या व्याख्यानमालेचे मुख्य सूत्र होते. त्यात त्यांनी चित्रकला, शिल्पकला, नाटयकला, संगीत, नृत्यकला या विषयांवर पुष्प गुंफले. व्याख्यानमालेचे स्वागत व प्रास्ताविक केंद्राच्या कोषाध्यक्षांनी केले. सहा दिवस चाललेल्या व्याख्यानमालेस कला क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

५.१६ **नादरंग : पखवाज व सतार वादनाची जुगलबंदी - दि. १८ फेब्रुवारी २०११** :- विभागीय केंद्र नाशिकच्यावतीने आयोजित 'नादरंग' या मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बेल्जियमचे पाश्चात्य सतारवादक बर्ट कार्नेलिस आणि

पद्मश्री शंकरराव आपेगांवकर यांचे पुत्र व शिष्य पंडीत उद्धव आपेगांवकर यांनी या दोन वाद्यांचा सुसंवाद साधला. चक्रकंस रागातील आलापीने सतारीला बोलायला लावत कार्नेलिस यांनी मैफलीचा प्रारंभ केला. चौतालात त्यांना आपेगावकरांनी पखवाजची साथ केली. धृपद गायन शैलीच्या या वादनाचा आनंद रसिकांनी घेतला. जलद गतीत सुरताल पेश केले. साडेतीन मात्रांमध्ये पख्वाज वादनातून दमदार अनुभूती रसिकांना मिळाली. प्राचीन काळात लोकप्रिय असलेली सिंधू भैरवी ऐकण्याची संधी पारंपरिकता आणि आधुनिकतेचा समन्वय असणारी सतार-पखवाजची जुगलबंदी संस्मरणीय ठरली. पखवाज व सतार वादनाची जुगलबंदी म्हणजे दोन पारंपारिक वाद्यांमधला संवाद आहे. देश, भाषा यांच्या पलीकडे स्वरांची भाषा ही अभिजात असते असे पंडीत उद्धव आपेगांवकर यांनी नमूद केले. बर्ट कार्नेलिस यांनी भारतीय संगीतामधल्या वैशिष्टयपूर्ण सुरांविषयी आपले मत व्यक्त केले. भारतातील प्रत्येक मैफल हा मला शिकण्यासाठी नवी अनुभव असतो असे सांगितले. यावेळी त्यांनी मैफलींचे अनुभव कथन केले. कार्यक्रमापूर्वी प्रास्ताविक विश्वास ठाकूर यांनी केले. पंडीत उद्धव आपेगांवकर यांचे स्वागत शिवाजी तुपे यांनी व बर्ट कार्नेलिस यांचे स्वागत दत्ता सराफ यांनी केले. विनायक रानडे व श्रुती जोशी यांनी कलाकारांचा परिचय करुन दिला. ही अनोखी जुगलबंदी अनुभवण्यासाठी रसिकश्रोत्यांची मोठया संख्येने उपस्थिती होती. मृदू मुलायम साज म्हणून किर्ती असणारी सतार आणि कर्णकठोर वाटणारे वाद्य पखवाज यांची मैफल संस्मरणीय ठरली.

५.१७ **सिनेमा आपला आणि त्यांचा वक्ते सुप्रसिध्द चित्रपट समिक्षक अशोक राणे : दि. ११.३.२०११** :- चित्रपट पहायचा आणि ऐकायचा याचे एक तंत्र असून भारतीय चित्रपटांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्याची गरज आहे. त्यासाठी जागरुक प्रेक्षक वर्ग निर्माण होण्याची गरज आहे. चित्रपटाच्या माध्यमातून सामाजिक जाणीवा आणि सामाजिक गरजा अधोरेखित करण्याची गरज आहे. सिनेमांच्या भाऊगर्दीत चांगल्या विषयावर आधारीत जाणता प्रेक्षक, तंत्रातील आधुनिकता यांचा संगम निर्माण करणे चित्रपट क्षेत्राकडे एक आव्हान आहे असे प्रतिपादन सुप्रसिध्द चित्रपट समिक्षक श्री. अशोक राणे यांनी केले.

विभागीय केंद्र नाशिकतर्फे मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ९८ व्या जयंतीनिमित्त आयोजित 'सिनेमा आपला आणि त्यांचा' या विषयावर श्री. राणे बोलत होते. यावेळी त्यांनी भारतीय आणि जागतिक सिनेमा याविषयी तुलनात्मक विवेचन केले. सत्यजीत रे, गोविंद निहलानी, श्याम बेनेगल, अमोल पालेकर, जब्बार पटेल, सुनील सुकथनकर, सई परांजपे, सुमित्रा भावे अशा अनेक दिग्दर्शकांच्या सिनेमातील वास्तव आणि सामाजिक जाणीव यातील सुसंगता विशद केली. जागतिक सिनेमा यशस्वी होण्यामागची तांत्रिक मीमांसाही त्यांनी उदाहरणे देऊन अधोरेखित केली. जागतिक चित्रपट महोत्सव आणि त्यातील दाखवण्यात येणारे चित्रपट, त्याविषयी समिक्षकांची प्रतिक्रिया, प्रसिध्दी माध्यमांची भूमिका याविषयीही त्यांनी आपले विचार व्यक्त केले.

मराठी सिनेमा आणि आजची परिस्थिती यांचा परस्पर संबंध दाखवताना त्यांनी विनोदी चित्रपटांची आलेली लाट आणि आशयपूर्ण चित्रपटांचा असलेला स्वतंत्र रसिक वर्ग याविषयी मत व्यक्त केले. देशातील चित्रपटांचे प्रदर्शन, विविध दैनिके यातील चित्रपट विषयक लेखन, चित्रपट आस्वाद शिबिरांची गरज, अध्यापन, चर्चासत्रांची गरज अशा अनेक महत्वपूर्ण बाबींवर श्री. राणे यांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक श्री. सुरेश वाघ यांनी केले. श्री. अशोक राणे यांचा परिचय डॉ. अमित नागरे यांनी करुन दिला. सूत्रसंचालन श्रीमती श्रुती जोशी यांनी केले. या कार्यक्रमासाठी दादासाहेब फाळके फिल्म सोसायटीचे अध्यक्ष श्री. विजय जानोरकर तसेच सर्वश्री विजय अहलुवालिया, संतोष पाटील, रघुनाथ फडणीस आदि मान्यवर उपस्थित होते.

## १०.६ विभागीय केंद्र औरंगाबाद :-

६.१ **ॲन इनकन्व्हिनियन्ट टुथ माहितीपट व व्याख्यानमाला** :- महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त दोन टप्प्यांमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. पहिल्या टप्प्यात माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले. रविवार दि. २ मे २०१० रोजी सायंकाळी ५ वाजता सरस्वती भुवन महाविद्यालयाच्या नाटयशास्त्र विभागाच्या सभागृहात 'ॲन इनकन्व्हिनियन्ट टुथ' हा अल गोर यांचा जागतिक तापमानवाढीवर आधारित माहितीपट प्रदर्शित करण्यात आला. जागतिक तापमानवाढ हा जगामध्ये सर्वत्र चर्चेस असणारा विषय आहे. अल गोर यांनी या विषयावर केलेल्या संशोधनावर आधारित 'ॲन इनकन्व्हिनियन्ट टुथ' हा माहितीपट सादर तयार करुन जगामध्ये याबाबतीत जाणीवजागृती करण्याचे कार्य केलेले आहे. यावेळी केंद्राच्या पदाधिका-यांनी महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विभागीय केंद्रातर्फे हाती घेण्यात आलेल्या उपक्रमांविषयी माहिती दिली. वरील माहितीपटाच्या कार्यक्रमासाठी शहरातील विद्यार्थी व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

सोमवार दि. ३ मे २०१० रोजी जिल्हा परिषद सभागृह, बीड येथे सायंकाळी ५.३० वाजता 'ॲन इनकन्व्हिनियन्ट टुथ' हा माहितीपट दाखविण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या दुस-या टप्प्यामध्ये विभागीय केंद्र औरंगाबाद 'सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची ५० वर्षे' या विषयावर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. दि. ५ मे २०१० रोजी सिल्लोड येथे, दि. ६ मे २०१० रोजी पैठण येथे व दि. ७ मे २०१० रोजी बजाजनगर (औरंगाबाद) येथे प्रा. महेश अचिंतलवार यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

६.२ **असाही एक महाराष्ट्र - छायाचित्र प्रदर्शन** :- दि. १८ ते २० जून २०१० रोजी मराठवाडा साहित्यपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने प्रसिध्द छायाचित्रकार श्री. संदेश भंडारे यांचे 'असाही एक महाराष्ट्र' या छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्‍घाटन शुक्रवार दि. १८ जून २०१० रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विजय वाघमारे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक श्री. रा. रं. बोराडे होते. मंचावर प्रा. जयदेव डोळे, श्री. नंदकिशोर कागलीवाल, श्री. सचिन मुळे. श्री. सुहास तेंडुलकर, श्री. कुंडलिक अतकरे यांची उपस्थिती होती.

६.३ **युवती सक्षमीकरण कार्यशाळा** :- औरंगाबाद नर्सिंग महाविद्यालयात युवती सक्षमीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. दि. ६ ऑगस्ट २०१० रोजी आयोजित या कार्यशाळेचे उद्‍घाटन औरंगाबाद नर्सिंग महाविद्यालयाचे संचालक डॉ. बाळासाहेब पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक, नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. सचिन कहांडकर, प्रा. अपर्णा अष्टपुत्रे, श्री. निधी शहा यांची उपस्थिती होती. युवती सक्षमीकरण कार्यशाळेमध्ये मानसिक आरोग्य या विषयावर प्रा. अपर्णा अष्टपुत्रे यांनी युवतींशी संवाद साधला. युवतींमध्ये ताणतणावांचे वाढते प्रमाण, तणावांशी जुळवून घेण्याच्या व मात करण्याच्या पध्दती प्रा. अष्टपुत्रे यांनी समजावून सांगितल्या. दररोजच्या जीवनातील ताणतणावांशी मुकाबला करताना स्वतःचा दृष्टीकोन बदलणे कसे गरजेचे आहे आणि हा बदल प्रामाणिकपणे करावा असे मार्गदर्शन प्रा. अष्टपुत्रे यांनी केले. यावेळी लैंगिक अत्याचार, मुलींची छेडछाड, वयात येणे, स्त्री-पुरुष नातेसंबंध आदी बाबींवर प्रकाश टाकणारा 'खट्टे मीठे मोड पर' हा माहितीपट दाखविण्यात आला. प्रा. अष्टपुत्रे यांनी मार्गदर्शनानंतर युवतींना जाणवणा-या मानसिक समस्यांविषयी चर्चा केली. महाविद्यालयातील सुमारे दोनशे युवतींनी या कार्यशाळेमध्ये सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे

प्रास्ताविक श्री. अभिजीत विटोरे यांनी केल तर सूत्रसंचालन श्रीमती प्रणाली महाडिक यांनी केले. श्री. मंगेश निरंतर यांनी आभार मानले.

६.४ **युवा स्वातंत्र्यज्योत रॅली :-** शनिवार दि. १४ ऑगस्ट रोजी युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे औरंगाबाद शहरात आयोजन करण्यात आले होते. क्रांती चौक ते पैठण गेट असा या रॅलीचा नियोजित मार्ग होता. क्रांतीचौक येथे रात्री ११ वाजता सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. संदिप भाजीभाकरे यांच्या हस्ते मशाल पेटवून या रॅलीची सुरुवात झाली. यावेळी नगरसेवक श्री. समीर राजूरकर, नगरसेवक श्री. विजेंद्र जाधव, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक व विभागीय समन्वयक यांची प्रमुख उपस्थिती होती. युवांमध्ये स्वातंत्र्याविषयी जाणीव अधिक दृढ व्हावी हे उद्दिष्ट समोर ठेवून शहरात मागील तीन वर्षांपासून, विभागीय केंद्र औरंगाबादतर्फे स्वातंत्र्यदिनापूर्वीच्या मध्यरात्री युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे.

६.५ **युनिकोड प्रशिक्षण कार्यशाळा :-** मराठी अभ्यास केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २७ ऑगस्ट २०१० रोजी एम.जी.एम. वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालय आणि देवगिरी महाविद्यालयात युनिकोड प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

६.६ **एम.जी.एम. वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालय :-** एम.जी.एम. वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालयात सकाळी १० वाजता आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी एम.जी.एम. चे विश्वस्त श्री. अंकुशराव कदम, जे.एन,इ.सी. चे प्राचार्य श्री. सुधीर देशमुख, वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती रेखा शेळके, मराठी अभ्यासकेंद्राचे अध्यक्ष प्रा. दीपक पवार, प्रा, राममोहन खानापूरकर, प्रा. नितीन निमकर, विभागीय समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर, विभागीय संघटक यांची उपस्थिती होती. श्री. अंकुशराव कदम यांच्या हस्ते मा. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती वैशाली ठाकूर यांनी केले. श्री. अभिजीत विटोरे यांनी आभार मानले.

६.७ **देवगिरी महाविद्यालय :-** देवगिरी महाविद्यालयात दुपारी २ वाजता आयोजित कार्यशाळेसाठी म.सा.प. चे अध्यक्ष श्री. कौमिकराव ठाले-पाटील, प्राचार्य प्रदीप जब्दे, प्रा. दीपक पवार, प्रा. राममोहन खानापूरकर, प्रा. नितीन निमकर, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे समन्वयक श्री. विजय कान्हेकर यांची उपस्थिती होती. श्री. कौतिकराव ठाले यांच्या हस्ते मा. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. प्राचार्य प्रदीप जब्दे यांनी मनोगत व्यक्त केले. श्री. विजय कान्हेकर यांनी भूमिका स्पष्ट केली. प्रा. शिवानंद भानुसे यांनी सूत्रसंचालन केले.

६.८ **पर्यावरण संवर्धनासाठी छायाचित्र प्रदर्शन :-** अभ्युदय फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ५ सप्टेंबर २०१० रोजी पर्यावरण संवर्धनासाठी छायाचित्र प्रदर्शनाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयात आयोजन करण्यात आले होते. छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष श्री. के. क. जाधव यांनी केले. छायाचित्रकार श्री. विवेक शाक्य यांनी पर्यावरण व मानवी जीवन यांची सांगड घालणारी छायाचित्रे क्लिक केली आहेत. विशेष म्हणजे औरंगाबाद शहर व जिल्हयातील परिसरामध्ये असणारा निसर्ग व मानवी जगण्याचा निसर्गाशी येणारा संबंध या छायाचित्रांमधून मांडण्यात आलेला आहे. छायाचित्र प्रदर्शनाला परिसरातील नागरिकांनी मोठया संख्येने प्रतिसाद दिला.

६.९ **बी. रघुनाथ काव्यसंध्या :-** मराठवाडयातील ज्येष्ठ साहित्यिक व कवी बी. रघुनाथ यांच्या स्मृतिदिनानिमित्त दि. ७ सप्टेंबर २०१० रोजी मराठी कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रख्यात कवी श्री. फ. मुं. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली अनेक नामवंत कवींनी यात सहभाग नोंदविलेला होता. श्री. नारायण सुमंत, श्री. प्रभाकर साळेगावकर, श्री. सुरेश शिंदे, श्री. मधुचंद्र राऊत यांनी बहारदार कविता सादर करुन कार्यक्रमात रंग भरला. मराठवाडयातील ज्येष्ठ साहित्यिक श्री. बाबा भांड यांचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला. कार्यक्रमाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. श्री. नंदकिशोर कागलीवाल, श्री. मुकुंद भोगले यांची विशेष उपस्थिती होती. सूत्रसंचालन श्री. सुधीर सेवेकर यांनी केले.

६.१० **युवती महोत्सव, औरंगाबाद :-** जेएनईसी महाविद्यालय, एम,जी.एम. परिसर, औरंगाबाद येथे सोमवार व मंगळवार दि. ४ व ५ ऑक्टोबर २०१० दरम्यान युवती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सोमवार दि. ४ ऑक्टोबर २०१० रोजी आर्यभट्ट हॉलमध्ये आयोजित युवती महोत्सवाचे उद्‌घाटन शालेय शिक्षण राज्यमंत्री श्रीमती फौजीया खान यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार व विचारवंत डॉ. बापूसाहेब काळदाते होते. मंचावर सर्वश्री मधुकरअण्णा मुळे, अंकुशराव कदम, प्राचार्य प्रताप बोराडे, मुकुंद भोगले, अपर्णा कक्कड, डॉ. बाळासाहेब पवार, विजय कान्हेकर, नीलेश राऊत, वैशाली मोटे, सुहास तेंडुलकर, दिनेश शिंदे, प्राचार्य सुधीर देशमुख, प्राचार्या रेखा शेळके यांची उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित युवतींना मार्गदर्शन करताना ना. श्रीमती फौजिया खान म्हणाल्या की, पारंपारिक मानसिकतेतून स्वतःला मुक्त करण्यासाठी युवतींनी समाजाकडून मिळणारा दुय्यम दर्जा नाकारावा. प्रत्येक क्षेत्रात सर्वोच्च स्थान मिळवण्याची व ती टिकवण्याची तयारी ठेवावी. शैक्षणिक विकास हे महिला सबलीकरणाचे महत्वाचे साधन आहे. व्यक्तीमध्ये सकारात्मक बदल करणारे शिक्षण युवतींना दिले गेले, तर हे उद्दिष्ट साध्य होऊ शकते. डॉ. बापूसाहेब काळदाते अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले की, अवलंबित समाजाचे घटक असणा-यांना स्वातंत्र्य मिळत नाही म्हणून नवनवीन ज्ञान ग्रहण करण्याची व ते ज्ञान वापरण्याची क्षमता युवतींनी विकसित करावी आणि स्वावलंबी बनावे. यावेळी श्री. मुकुंद भोगले, श्री. मधुकरअण्णा मुळे यांनी मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविक श्रीमती रेणुका कड यांनी केले. श्रीमती मीनल जगदाळे यांनी आभार मानले.

महोत्सवामध्ये दुपारच्या सत्रात सायबर क्राईम विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. संदीप गुरमे यांचे 'सायबर क्राईम व युवतींनी घ्यावयाची काळजी' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. दि. ५ ऑक्टोबर रोजी यशोगाथा सत्रामध्ये लेखिका श्रीमती इंदुमती जोंधळे व पोलीस उपअधीक्षक श्रीमती पल्लवी बर्गे यांच्या प्रकट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले. युवतींनो, मुक्तपणे व्यक्त व्हा, असे आवाहन श्रीमती इंदुमती जोंधळे यांनी केले. एमपीएससी व यूपीएससीची तयारी करण्याचे मार्गदर्शन श्रीमती पल्लवी बर्गे यांनी उपस्थित युवतींना केले. प्रा. महेश अचिंतलवार यांनी मुलाखतीचे संचालन केले. प्रा. अपर्णा अष्टपुत्रे यांचे युवतींसाठी विवाहपूर्व समुपदेशन या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. महोत्सवामध्ये दोन्हीही दिवस खेळांमध्ये युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी महात्मा गांधी मिशनतर्फे युवतींमध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण तपासण्यासाठी विशेष आरोग्य स्टॉल आयोजित करण्यात आला. मोठयासंख्येने युवतींनी हिमोग्लोबिन तपासणी करुन घेतली. आइन्स्टाईन सभागृहात 'क्या

आपको पता है ? खट्टे, मीठे मोड पर व जोर से बोलो' हे युवती सक्षमीकरणा संदर्भातील माहितीपट दाखविण्यात आले. माहितपट प्रदर्शनानंतर प्रश्नोत्तराद्वारे युवतींनी संवाद साधला. समारोप समारंभासाठी औरंगाबादच्या महापौर श्रीमती अनिता घोडेले यांची प्रमुख उपस्थिती होती. या महोत्सवामध्ये सुमारे दोन हजार युवतींनी सहभाग नोंदविला.

६.११ **ज्येष्ठ उर्दू शायर मा. बशर नवाज यांच्यावरील माहितीपटाचे विमोचन :-** औरंगाबाद येथील ज्येष्ठ उर्दू शायर बशर नवाज यांच्या जीवनावर निर्माण करण्यात आलेल्या माहितीपटाच्या डी.व्ही.डी. चे विमोचन दि. २५ नोव्हेंबर २०१० रोजी मा. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथीदिनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष व केंद्रीय कृषिमंत्री ना. श्री. शरद पवार यांच्या हस्ते विशेष समारंभात करण्यात आले. 'बशर नवाज-ख्वाब, जिन्दगी और मैं' असे या माहितीपटाचे नाव असून कालावधी ३० मिनिटांचा आहे. यावेळी शायर बशर नवाज, माहितीपटाचे प्रायोजक तेज आयटी सोल्युशन्सचे कार्यकारी संचालक श्री. प्रशांत पेंडसे,विभागीय केंद्र, औरंगाबादचे अध्यक्ष श्री. नंदकिशार कागलीवाल यांचा मा. अध्यक्षांच्या हस्ते शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. प्रसिध्द दिग्दर्शक श्री. जयप्रद देसाई यांनी या माहितीपटाचे दिग्दर्शन केले असून कार्यकारी निर्माता नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक श्री. नीलेश राऊत हे आहेत.

माहितीपटाचे संपूर्ण चित्रीकरण औरंगाबाद येथे करण्यात आलेले आहे. औरंगाबाद लेणी व विद्यापीठ परिसर, शहरातील विविध ठिकाणचे चित्रीकरण आहे. सिनेमॅटोग्राफी श्री. देवेंद्र गोलटकर, संगीत श्री. विशाल खुराणा, संपादन श्री. सुबोध नारकर, श्री. विनोंद शिंदे, श्री. सागर वंजारी, सहाय्यक संपादक श्री. चिन्मय दळवी यांनी माहितीपटाची जबाबदारी पार पाडली आहे.

६.१२ **यशवंतराव चव्हाण यांच्यावर टपाल तिकिट विमोचनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रम :-**

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्र राज्याचा मंगल कलश आणणारे राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्यावर टपाल तिकिट जारी करण्यात आले. दि. २२ डिसेंबर २०१० रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे राष्ट्रपती मा. प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते या तिकिटाचे विमोचन करण्यात आले. या निमित्ताने विभागीय केंद्र, औरंगाबादतर्फे दि. २३ डिसेंबर २०१० रोजी देवगिरी महाविद्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंचावर माजी खासदार व ज्येष्ठ विचारवंत श्री. बापूसाहेब काळदाते, विभागीय केंद्र, औरंगाबादचे कोषाध्यक्ष श्री. सचिन मुळे, प्राचार्य प्रदीप जब्दे, प्राचार्य उल्हास शिऊरकर उपस्थित होते. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्वागतानंतर श्री. नीलेश राऊत यांनी भूमिका मांडली. यानंतर सर्व मान्यवरांच्या हस्ते टपाल तिकिटाच्या विक्रीस प्रारंभ करण्यात आला.

६.१३ **संजीवन उपक्रम - पैठण शहरातील नगर परिषद शाळा :-** अभ्युदय फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी दि. २८ डिसेंबर २०१० रोजी पैठण शहरातील नगर परिषदेच्या शाळेमध्ये संजीवन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रा. महेश अचिंतलवार यांचा विद्यार्थ्यांकरिता समुपदेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये नैराश्येतून घडणा-या विविध घटना लक्षात घेता त्यावर विद्यार्थ्यांमध्ये चेतना निर्माण व्हावी.

विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यामध्ये योग्य सुसंवाद निर्माण व्हावा, विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये योग्य समन्वय व सुसंवाद निर्माण व्हावा हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

## १०.७ विभागीय केंद्र लातूर :-

७.१ **ख्रिसमस शुभेच्छा** :- दि. २.४.२०१० रोजी गुड फ्रायडेनिमित्त लातूर शहरातील ख्रिस्ती बांधवांना विभागीय केंद्राच्यावतीने हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

७.२ **डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती :-** दि. १४.४.२०१० रोजी आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली येथे पुस्तक प्रकाशन व स्वातंत्र्यसैनिकांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात हैद्राबाद मुक्ती संग्रामातील सेनानी दिपाजी पाटील यांच्यावर प्रा. महेश मोरे यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन स्वातंत्र्यसेनानी श्री. गंगाप्रसाद अग्रवाल, आ. राजीव सातव, कवी श्री. इंद्रजित भालेराव, श्री. शिवाजी माने (माजी खासदार) यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. विविध वक्त्यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या अडचणी मेळाव्यात मांडल्या. विभागीय केंद्र, लातूर व क्रांतीवीर दिपाजी पाटील वाचनालय यांच्यातर्फे हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. प्रास्ताविक केंद्राचे सदस्य प्रा. उत्तम सूर्यवंशी यांनी कले. आभार प्रा. माधव जाधव यांनी मानले.

७.३ **सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्र दिन - दि. १.५.२०१०** :- विभागीय केंद्राच्यावतीने सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी रेणापूर, जिल्हा लातूर येथील थोर स्वातंत्र्यसेनानी श्री. मुर्गाप्पा खुमसे हे होते. तर प्रमुख पाहुणे विभागीय केंद्राचे अध्यक्ष खा. डॉ. जनार्दन वाघमारे होते. आभार श्री. हरिभाऊ जवळगे यांनी मानले.

७.४ **अंधश्रध्दा निर्मुलन कार्यक्रम** :- घाटंग्री तालुका, जिल्हा उस्मानाबाद येथे स्थानिक अंधश्रध्दा निर्मुलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने अंधश्रध्दा निर्मुलन कार्यक्रम घेण्यात आला.

७.५ **बौध्द पौर्णिमा** :- बौध्द पौर्णिमेनिमित्त दि. २७.५.२०१० रोजी 'गौत्तम बुध्दांचे विचार' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रात प्रा. एस. व्ही. कांबळे, प्रा. ज्ञानराज गायकवाड यांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा. डॉ. जनार्दन वाघमारे हे होते. या कार्यक्रमासाठी बौध्द बांधव उपस्थित होते.

७.६ **जगदगुरु श्री. संत तुकाराम महाराज तिसरी राज्यस्तरीय अभंग व भजन स्पर्धा** :- लातूर येथे दि. ३० मे २०१० रोजी डॉ. व्ही. एन. चिंते यांच्या देखरेखेखाली आयोजित केलेल्या शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान, पुणे आयोजित जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज तिसरी राज्यस्तरीय अभंग व भजन स्पर्धेत विभागीय केंद्राचा मोलाचा सहभाग होता. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सचिव हे होते. या परिषदेच्या स्पर्धेमध्ये लातूर, सोलापूर, उस्मानाबाद येथील स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता.

७.७ **अहिल्यादेवी होळकर यांचा जन्मोत्सव** :- दि. ३१.५.२०१० रोजी प्रा. कुसुमताई मोरे यांच्या अध्यक्षतेखाली लातूर विभागीय केंद्राच्यावतीने औसा येथे महिला मेळावा घेण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे खा. डॉ. जनार्दन वाघमारे हे होते.

७.८ **जिजाऊ माँसाहेबांचा पुणतिथी कार्यक्रम :-** दि. १७.६.२०१० रोजी जिजाऊ भोसले यांची पुण्यतिथी खानापूर, तालुका व जिल्हा हिंगोली येथे साजरी करण्यात आली. या निमित्ताने महिलांचा बचत गट मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याचे संयोजन श्री. संजय टाकळगव्हाणकर यांनी केले. शिक्षक श्री. साळुंके यांनी आभार मानले.

७.९ **छत्रपती शाहू महाराज जयंती संपन्न :-** दि. २६.६.२०१० रोजी श्री रेणुकादेवी महाविद्यालय, माहूर, जिल्हा नांदेड येथे आदिवासी मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात छत्रपती शाहू महाराज यांना आदरांजली वाहण्यात आली.

७.१० **राजमाता जिजाऊ पुण्यतिथी :-** दि. ६.७.२०१० रोजी राजमाता जिजाऊ यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. याप्रसंगी सौ. उषाताई फुलारी, श्रीमती चंद्रकला मोरे इ. भगिनींनी आपला सहभाग नोंदवून जिजाऊबद्दलचे आपले विचार मांडले. प्रसिध्द शिक्षण तज्ज्ञ प्राचार्य नानासाहेब मुसांडे यांचे लातूर विभागीय केंद्राच्या वतीने सततचे सहकार्य लक्षात घेऊन त्यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

७.११ **क्रांतीदिन कार्यक्रम :-** दि. ९.८.२०१० रोजी भारत छोडो या क्रांतीदिनानिमित्त लातूर येथील विभागीय केंद्राच्या कार्यालयात वेगवेगळया क्षेत्रातील तरुणांना एकत्र करुन देशाची एकात्मता, स्वावलंबन इत्यादीबद्दल मौलिक मार्गदर्शन करण्यात आले.

७.१२ **व्यसनमुक्ती व पाणंदमुक्ती शिबीर :-** दि. २९.८.२०१० रोजी पारगाव, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद येथे प्रसिध्द प्रवचनकार श्री. बी. ए. सुरवसे महाराज यांचे व्यसनमुक्ती व पाणंदमुक्ती यावर प्रवचन झाले. यासाठी पारगाव व परिसरातील लोक मोठया संख्येने उपस्थित होते.

७.१३ **मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन :-** दि. १७.९.१९४८ या तारखेस मराठवाडा निजामाच्या तावडीतून मुक्त झाला. या मराठवाडा मुक्तीसंग्रामदिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे दि. १७ सप्टेंबर २०१० रोजी विभागीय केंद्राच्या वतीने मराठवाडा मुक्ती संग्रामातील थोर स्वातंत्र्यसेनानी, संस्कृत भाषेचे भाषा प्रमुख विद्वान, माजी प्राचार्य तथा संस्कृतचे प्रसिध्द लेखक श्री. हरिश्चंद्र रेणापूरकर सर यांचा केंद्राचे अध्यक्ष खा. डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडयातील थोर शिक्षणमहर्षी माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील हे होते. याप्रसंगी रेणापूरकर यांच्या सोबत मराठवाडयातील इतरही स्वातंत्र्यसैनिकांचा याप्रसंगी उचित असा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी उस्मानाबाद, लातूर, नांदेड, हिंगोली जिल्हयातील स्वातंत्र्यसैनिक मोठया उत्साहाने उपस्थित होते.

७.१४ **महाराष्ट्र राज्य स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष २०१० :-** यानिमित्ताने दि. २५ सप्टेंबर २०१० रोजी स्व. वसंतराव काळे प्रतिष्ठान, मराठवाडा विभाग आणि शिक्षण उपसंचालनालय विभाग, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्याध्यापक गुणवत्ता विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्‌घाटक खा. डॉ. जनार्दन वाघमारे यांनी केले तर प्रमुख उपस्थिती आ. विक्रम वसंतराव काळे, डॉ. सौ. सुवर्णा खरात, अवर सचिव, शालेय शिक्षण, मंत्रालय, मुंबई, श्री. भालचंद्र देसले, शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, श्री. गोविंद नांदेडे, शिक्षण उपसंचालक, लातूर, श्री. वसंतराव पाटील, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघ यांची होती. या परिसंवादामध्ये वक्ते व विषय पुढीलप्रमाणे होते. खा. डॉ. जनार्दन वाघमारे - शिक्षणासमोरील आव्हाने, डॉ. सुवर्णा खरात - शिक्षक हक्क कायदा, श्री. राजीव तांबे - सल्लागार युनिसेफ, श्री. वसंतराव देशपांडे (माजी

संचालक, इंडियन इन्स्टियटयूट ऑफ एज्युकेशन, पुणे) - राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा, श्री. प्रकाश परब (माजी शिक्षणाधिकारी, पुणे) - संच / तुकडी मान्यता. वरील गुणवत्ता विकास कार्यशाळेचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे यांनी केले. या उद्‌घाटनप्रसंगी शिक्षक आमदार श्री. विक्रम काळे, डॉ. सौ. सुवर्णा खरात, श्री. भालचंद्र देसले इत्यादींनी आपले मनोगत व्यक्त केले.

७.१५ **महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती ( २ ऑक्टोबर)** :- महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती निमित्त विभागीय केंद्र कार्यालयाच्यासमोर प्रा. एस. पी. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रामचे प्रास्ताविक विभागीय केंद्रांतर्गत काम करणारे युवा नेते श्री. एस. टी. पवार यांनी केले. सर्वांचे आभार विभागीय केंद्राच्या सचिवांनी मानले.

७.१६ **ज्येष्ठ नागरिक आनंद उस्तव मेळावा :-** दि. १० ऑक्टोबर २०१० रोजी मराठवाडयातील प्रसिध्द हिंदी साहित्यिक प्रा. डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरिक आनंद सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे हे होते. या कार्यक्रमासाठी मोठया संख्येने स्त्री - पुरुप ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती होती. यावेळी गणाचार्य स्वामी राम माकणीकर, श्री. सी. एम. जोशी, ॲड. मनोहरराव गोमारे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी ज्येष्ठ नागरिक डॉ. सी. एन. जोशी, डॉ. आर. के. पाटील, लातूरातील उद्योगपती सय्यद जाफर महेमूद या ज्येष्ठ पुरुपांचा व माजी प्राध्यापिका सौ. उपाताई मकदूम, निवृत्त शिक्षिका श्रीमती कमलताई शिंदे इत्यादी ज्येष्ठांचा विभागीय केंद्राच्या अध्यक्षांच्या हस्ते यथोचित गौरव करण्यात आला.

७.१७ **महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण या विषयावर व्याख्यान :-** महाराष्ट्र राज्य स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष २०१०-२०११ या कार्यक्रमांतर्गत लातूर येथे महाराष्ट्रातील थोर विचारवंत मराठी लेखन व संस्कृत भाषेचे गाढे अभ्यासक तथा महाराष्ट्र राज्याचे संस्कृत धोरण या विभागाचे सन्माननीय अध्यक्ष प्रा. डॉ. आ. ह. साळूंके (सातारा) यांचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण या विषयावर दि. १९.१०.२०१० रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रमुख सचिव प्रा. गोविंदराव घार हे होते तर प्रमुख उपस्थिती विभागीय केंद्राचे सदस्य ॲड. मनोहरराव गोमारे, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, प्राचार्या डॉ. कुसूमताई मोरे, प्रा. डॉ. श्रीरात गुंदेकर, प्रा. सौ. साधना जगताप इत्यादींची लाभली होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राच्या सचिवांनी केले.

७.१८ **अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष संपादक श्री. उत्तम कांबळे यांचा विभागीय केंद्राच्या वतीने सत्कार :-** दि. १४.११.२०११ रोजी ठाणे येथे पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष दै. सकाळचे संपादक श्री. उत्तम कांबळे यांचा विभागीय केंद्राच्यावतीने विभागीय केंद्राचे अध्यक्ष खा. डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या शुभहस्ते स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

७.१९ **यशवंतराव चव्हाण यांचा २६ वा स्मृतिदिन :-** दि. २५.११.२०१० रोजी विभागीय केंद्राच्यावतीने महाराष्ट्राचे शिल्पकार, भारताचे उपपंतप्रधान, मा. यशवंतराव चव्हाण यांचा २६ वा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर येथील ज्येष्ठ पत्रकार तथा नामांकित कवी श्री. जयप्रकाशजी दगडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूरच्या मराठवाडयातील जादा खप असलेल्या स्थानिक एकमत या वृत्तपत्राचे अभ्यासू संपादक व मा. यशवंतराव चव्हाण यांचा सहवास

लाभलेले दै. लोकसत्ताचे माजी संपादक श्री. शरद कारखानीस हे होते. कार्यक्रमाचा विषय होता 'यशवंतराव चव्हाण आणि पत्रकार'.

७.२० **महात्मा फुले पुण्यतिथी** :- दि. २८.११.२०१० रोजी महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने महात्मा फुले यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी 'ग्रामीण भागातील शिक्षणाची दिशा व दशा' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रात प्रा. एस. टी. जाधव, मुख्याध्यापक श्री. गोविंद कांबळे, सचिव श्री. हरिभाऊ जवळगे यांनी भाग घेतला.

७.२१ **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन** :- दि. ६.१२.२०१० रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त विभागीय केंद्राचे वतीने अभिवादन करण्यात आले.

७.२२ **शरद कृषि वाचनालयाचे उद्‌घाटन** :- दि. १२.१२.२०१० रोजी भारताचे कृषिमंत्री तथा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. ना. श्री. शरद पवार यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त लातूर येथे सर्व क्षेत्रातील शरदप्रेमी एकत्र येऊन शेतक-यांच्या उपयोगी असे 'शरदकृषि वाचनालयाचे' उद्‌घाटन मराठवाडयातील कृषिभूषण डॉ. व्यंकटराव शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले, तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतीबद्दल जिव्हाळा असलेले महामंडळेश्वर श्री. सुरेंद्रगिरीजी महाराज हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शेतीबद्दल सदैव विचार मांडणारे ज्येष्ठ पत्रकार श्री. महारुद्र मंगनाळे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शरद कृषि वाचनालयाचे अध्यक्ष ॲड. श्रीधरराव जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन या वाचनालयाच्या सचिवांनी मानले.

७.२३ **मोहरम सणानिमित्त मुस्लीम बांधवांना शुभेच्छा** :- दि. १९.१२.२०१० रोजी मोहरम सणानिमित्त मुस्लीम बांधवांना शुभेच्छा देण्यात आल्या.

७.२४ **ख्रिसमस बांधवांना शुभेच्छा** :- दि. २५.१२.२०१० रोजी नाताळ सणानिमित्त लातूर शहरातील सर्व ख्रिसमस बांधवांना विभागीय केंद्राच्यावतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

७.२५ **मा. यशवंतराव चव्हाण यांच्या टपाल तिकीटाचा वितरण सोहळा** :- दि. २८.१२.२०१० रोजी लोकनेते मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पोस्टाच्या तिकिटाचा वितरण सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर विभागीय केंद्राचे सचिव होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय केंद्राचे अध्यक्ष खा. डॉ. जनार्दन वाघमारे हे होते.

७.२६ **३१ डिसेंबर २०१०** :- या दिवशी विभागीय केंद्राच्या वतीने लातूर शहरातील पुरोगामी विचाराच्या इतर संस्थांसोबत २०१० या वर्षाला निरोप व २०११ या वर्षाचे स्वागत लातूर शहरातून भव्य दिव्य अशी मिरवणूक काढून करण्यात आले.

७.२७ **राष्ट्रीय एकात्मतेसाठी प्रबोधनाचे शिबीर** :- दि. १२ जानेवारी २०११ रोजी पीपल्स कॉलेज नांदेड येथे स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने राष्ट्रीय एकात्मता प्रबोधनाचे शिबीर आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी परिवर्तनचे अध्यक्ष श्री. सदाशिवराव पाटील हे होते तर नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे यांची प्रमुख उपस्थिती होती.

७.२८ **दि. २९ व ३० जानेवारी २०११ - विशेष कार्यक्रम :-** नांदेड येथील नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयात डॉ. जनार्दन वाघमारे यांनी 'जागतिकीकरणाचे परिणाम' या विषयावर व्याख्यान दिले. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. सर्जेराव निमसे हे होते.

७.२९ **राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथी :-** दि. ३० जानेवारी २०११ रोजी दिगंबरराव महाविद्यालय, भोकर येथे डॉ. वाघमारे यांचे 'गांधी विचार एक मूल्य' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर हे होते. प्रमुख पाहुणे कुलगुरु डॉ. सर्जेराव निमसे, माजी मंत्री श्री. सूर्यकांता पाटील, डॉ. पारस बोरा, प्रा. उत्तम सूर्यवंशी हे होते.

७.३० **बैठक :-** दि. १३.०२.२०११ रोजी दि. १६.२.२०११ ईद ए मिलाद व दि. १९.२.२०११ छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त घ्यावयाच्या कार्यक्रमाच्या संदर्भात विभागीय केंद्राचे ज्येष्ठ सदस्य लातूरातील प्रसिध्द विधिज्ञ ॲड. मनोहरराव गोमारे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न होऊन वरील दोन्ही कार्यक्रमाचे स्वरुप ठरविण्यात येऊन ईद-ए-मिलाद निमित्त लातूर शहरातील मुस्लीम बांधवांना विभागीय केंद्राच्यावतीने हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच सार्वजनिक छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवात विभागीय केंद्राच्यावतीने आर्थिक मदतीसह सहभाग घेऊन त्यांच्या जयंती उत्सव निमित्तने विनम्र अभिवादन करण्यात आले.

७.३१ **जलसंस्कृतीचे पुजन :-** दि. २७.२.२०११ रोजी नांदेड येथील लालबहादूर शास्त्री सभागृहात जलसंस्कृतीचे जनक मा. शंकररावजी चव्हाण या विषयावर प्रा. डॉ. महादेव मोरे यांनी आपले मौलिक विचार मांडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सदस्य प्राचार्य डॉ. इंगोले हे होते. या कार्यकमात विभागीय केंद्राचे सचिव व प्रा. उत्तमराव सूर्यवंशी यांनीही आपले अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला डॉ. जगदीश कदम, प्रा. प्रभाकरराव जाधव आदी मान्यवर व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. प्रा. शिवाजी जाधव यांनी सर्वांचे आभार मानले.

७.३२ **मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त खास बैठक :-** दि. ०१.३.२०११ रोजी ८.३.२०११ जागतिक महिला दिन व दि. १२.३.२०११ रोजी होणा-या मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ९८ व्या जयंती संदर्भात घ्यावयाच्या कार्यक्रमाची पूर्वतयारी व कामाची विभागणी करण्यात आली.

७.३३ **जागतिक महिला दिन :-** मंगळवार दि. ८.३.२०११ महिलांचे आरोग्य, शिक्षण, स्त्रीभुण हत्या यासंदर्भात चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्रात प्रा. साधनाताई जगताप, प्रा. कुसुमताई जोशी, प्रा. कमलताई कुलकर्णी इत्यादींनी आपले मौलिक विचार मांडले.

७.३४ **मा. यशवंतराव चव्हाण यांची ९८ वी जयंती :-** शनिवार दि. १२.३.२०११ रोजी विभागीय केंद्र लातूरच्या वतीने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार माजी उपपंतप्रधान मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ९८ व्या जयंतीनिमित्त ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या बलदवा सभागृहात आयोजित कार्यक्रमात 'यशवंतराव चव्हाण व आजची व्यावसायिक निती' या विषयी प्रमुख वक्ते म्हणून दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वामन पाटील होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. शिवाजी माडे हे होते. याप्रसंगी श्री. सुधाकररावजी देशमुख, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना करताना लातूर विभागीय केंद्राच्या सचिवांनी विभागीय केंद्राच्या मागील कामाचा आढावा सादर करुन पुढील कार्याची रुपरेषा विशद केली. सूत्रसंचालन

श्री. ढगे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती सावदे यांनी केले. या कार्यक्रमास प्रा. विजयकुमार शिंदे, प्रा. शिवाजी पाटील, श्री. गोविंद हारडे, प्रा. रोहित गायकवाड, ज्ञानेश्वर उच्च माध्यमिक विद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिकतेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व परिसरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

७.३५ **दि. १९.३.२०११** रोजी लातूर येथील अंधश्रध्दा निर्मूलन जिल्हा शाखा व विभागीय केंद्र लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने रात्री ७.०० वाजता लातूर शहरातून धुलिवंदन व रंगपंचमी यामधील अनावश्यक स्वरुप टाळावे म्हणून शहरातून रॅली काढण्यात आली.

७.३६ **दि. २०.३.२०११ धुलिवंदन :-** निष्कारण वृक्षाचे सरपण न जाळता रस्त्यावरील केरकचरा, घाणी दूर करुन त्याला अग्नि पेटवून धुलिवंदन साजरी करण्यात यावी याबद्दल लोकात जागृती करण्यात आली.

मुंबई
दिनांकः सप्टेंबर २०११

**विश्वस्त मंडळ/कार्यकारिणी मंडळ**
**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई**




मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विशेष टपाल तिकिटाच्या उद्घाटन प्रसंगी भाषण करताना, मा. श्री. शरद पवार, केंद्रिय कृषिमंत्री व अध्यक्ष यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.



मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विशेष टपाल तिकिटाच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित महाराष्ट्र राज्याचे मा. मंत्री, मा. खासदार, मा. आमदार व प्रतिष्ठानचे मा. विश्वस्त व मा. सदस्य.

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई

## प्रतिष्ठानची प्रकाशने

| | | किंमत रुपये |
|---|---|---|
| ०१ | यशवंतराव चव्हाण : विधी मंडळातील निवडक मराठी भाषणे भाग-१<br>संकलन : डॉ.व्ही.जी.खोबरेकर | २००.०० |
| ०२ | वाय.बी.चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस-विधीमंडळ भाग-२ संकलन : डॉ.व्ही.जी.खोबरेकर | २५०.०० |
| ०३ | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट--वाय.बी.चव्हाण भाग १ ते ४ संकलन : राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ०४ | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन-ना.धों.महानोर | ३.५० |
| ०५ | सहयाद्रीचे वारे-यशवंतराव चव्हाण | ३०.०० |
| ०६ | म.ज्योतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन-प्रा.गजमल माळी | १२.०० |
| ०७ | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास-संपादक-वि.स.पागे | ३५.०० |
| ०८ | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन-संपादन- अण्णासाहेब शिंदे | १६०.०० |
| ०९ | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन-शरदराव पवार- भाषणसंग्रह-संपादन दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १० | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास संपादन-पी.बी.पाटील | १००.०० |
| ११ | नवभारत : परिवर्तनाची दिशा- संपादन-पी.बी.पाटील | १००.०० |
| १२ | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास-संशोधक/लेखक-लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३ | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिध्दतेकडे वाटचाल-डॉ.नीलम गो-हे | १५.०० |
| १४ | यशवंतराव चव्हाण-चरित्र लेखन-अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५ | शब्दांचे सामर्थ्य-संपादन-राम प्रधान | ३७५.०० |
| १६ | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी)<br>(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७ | बाऊंटीफूल बनियन-डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र खंड- १ ते ४ (इंग्रजी)-बॅ.पी.जी.पाटील | ८००.०० |
| १८ | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९ | अजिंठा-(काव्यसंग्रह) लेखक-ना.धों.महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | ई-बुक (मराठी/इंग्रजी) यशवंत साहित्य/फोटो भाग - १ | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | ई-बुक (मराठी/इंग्रजी) पुस्तके भाग - २ | १५०.०० |

## व्हिडीओ कॅसेटस्

२३. मी एस.एम : एस.एम.जोशी यांचा जीवनपट

२४. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट

२५. प्रवासी पक्षी : सुप्रसिध्द साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट

२६. पु.ल.वृत्तांत : पु.ल.देशपांडे यांचा जीवनपट

या चारही व्हिडीओ कॅसेटसूची निर्मिती यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने केली असून दिग्दर्शनाची जबाबदारी सुप्रसिध्द दिग्दर्शक डॉ.जब्बार पटेल यांनी पार पाडली.

२७. कॉ.केशवराव जेधे : कॉ.केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शक-श्री.राम गबाले.

२८. येस्, आय एम कम्युनिस्ट : कॉ.श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट दिग्दर्शन-विनय नेवाळकर